पाने १ ते ५३

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय : मा. महासभा मूळ ठराव

सत्र - २००७/२००८

दि. १६/४/२००७ ते दि. १४/७/२००७ पर्यंत

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

| सभा दिनांक | प्र. क्र. | विषय | ठराव क्र. | विभाग |
|---|---|---|---|---|
| १६/४/०७ | १ | दि. ०६/१२/२००६ व दि. २१/१२/२००६ (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. | १ | सचिव |
| १६/४/०७ | २ | मनपा क्षेत्रातील कच्चे / पक्के नाले सफाई कामाचे प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. | २ | आरोग्य |
| १६/४/०७ | ३ | भाईंदर (प.) टेंभा व उत्तन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारती व जागा मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महानगरपालिकेकडे हस्तांतर करणे करिता जिल्हापरिषद ठाणे यांना इमारती व जागेची किंमत अदा करणे व भाईंदर (प.) टेंभा येथे अद्ययावत इमारत बांधणे कामी खर्चास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देणे. | ३ | सार्व. बांधकाम |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | ४ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर काशिमिरा नाका येथे शिवाजी महाराज पुतळ्या मागे स्वागत कमान बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | ६ | सार्व. बांधकाम |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | ५ | खारीगांव व घोडबंदर येथील इमारतीमध्ये नविन लायब्ररी चालु करण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. | ७ | वाचनालय |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | ६ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर साई सर्विस सेंटर समोरील दुभाजकात बंद केलेला प्रवेश सुरु करणेबाबत पोलिस अधिक्षक यांचेकडील दि. ०५/०८/२००६ च्या पत्रावर निर्णय घेणे. | ८ | सार्व. बांधकाम |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | ७ | शिक्षण मंडळ सदस्यांना मानधन व सभा (बैठक) भत्ता लागू करणे बाबत. | ९ | शिक्षण |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | ८ | विक्री / साठा / उत्पादन करणाऱ्या आस्थापनेस आरोग्य लायसन्स (Health Licience) देणेसाठी दर निश्चित करणे. | तहकुब | परवाना |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | ९ | महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करार पध्दतीने नेमण्यात आलेल्या कर्मचारी वर्गास मुदतवाढ करणेबाबत. | तहकुब | आरोग्य |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | १० | सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांचे दिनांक ०९/०४/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिकेच्या तज्ञ अधिकाऱ्यामार्फत पाणी पुरवठ्याचे वितरण व्यवस्थित होत नसल्याने यावर पर्याय म्हणून मुंबई महानगरपालिका जलअभियंता व नव्यामुंबईच्या जल अभियंत्यांना आपल्या पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेचे मुल्यमापन करणेबाबत. | प्रस्ताव फेटाळण्यात आले. | पाणीपुरवठा |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | ११ | सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १०/०४/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- आर्थिक व प्रशासकिय मंजुरीबाबत. | | |
| ०३/०५/०७ (१६/४/०७) | १२ | सन्मा. सदस्य श्रीम. सुरेखा गायकवाड यांचे दिनांक १०/०४/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रिक्त असलेल्या उपआयुक्त पदाचा अनुशेष भरणेबाबत. | | आस्थापना |
| १६/४/०७ दु.३.०० वा. | १३ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मिरा भाईंदर महानगरपालिकेस वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेले पत्र व सदर कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेबाबत विचार विनीमय करणे. | ४ | पाणीपुरवठा |
| १६/४/०७ दु.३.०० वा. | -- | दुखःवठा ठराव | ५ | सचिव |
| १७/५/०७ | १४ | दि. २०/०१/२००७ व दि. २०/०१/२००७ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. | कोरम अभावी सभा रद्द करण्यात आली. | सचिव |
| १७/५/०७ | १५ | शववाहिनी व रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत. | | वाहन |
| १७/५/०७ | १६ | सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी जकात देकार रक्कमेला आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. | | जकात |
| १७/५/०७ | १७ | जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (B.S.U.P.) अंतर्गत घरकुल बांधणे करिता मंजुर विकास योजनेत फेरबदल करुन | | नगररचना |

न त्याची देखभाल व दुरुस्ती
स इन्फ्रा लि. यांनी झोपडपट्टी व
सविण्याचे काम बंद केल्याने त्या

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | B.S.U.P. करिता आरक्षण करणे बाबत. | | |
| १७/५/०७ | १८ | झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण योजना मिरा भाईंदर शहरास लागू करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. **(S.R.A)** | | नगररचना |
| १७/५/०७ | १९ | शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे **S.E.Z.** बाबत विचार विनिमय करणे. | | नगररचना |
| १७/५/०७ | २० | मिरा भाईंदर शहरातील विविध विकास कामे जलदगतीने होण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. | | सार्व. बांधकाम |
| १७/५/०७ | २१ | भाईंदर पुर्व - पश्चिम जोडणाऱ्या पादचारी पुलाबाबत विचार विनिमय करणे. | | सार्व. बांधकाम |
| १७/५/०७ | २२ | नागरी संरक्षण समिती गठीत करणे बाबत. | | |
| १७/५/०७ | २३ | महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करार पध्दतीने नेमण्यात आलेल्या कर्मचारी वर्गास मुदतवाढ करणेबाबत. (दि. ०३/०५/२००७ (दि. १६/०४/२००७ रोजीची तहकुब सभा) रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ०९) | | आरोग्य |
| १७/५/०७ | २४ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्धाकृती पुतळा अनावरण समारंभ व मा. कविवर्य श्री. जगदिश खेबुडकर यांच्या अमृत महोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमांना कार्योत्तर मान्यता देणे. | | सामान्य प्रशासन |
| १७/५/०७ | २५ | रस्ते चौकांना नावे देण्याबाबत विचार विनिमय करणे. (मा. स्थायी समिती सभा दि. २२/११/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १४१) | कोरम अभावी सभा रद्द करण्यात आली. | सार्व. बांधकाम |
| १७/५/०७ | २६ | करार पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करणेबाबत. | | शिक्षण |
| १७/५/०७ | २७ | मा. महासभा दि. ०६/१२/२००६ ठराव क्र. ७३ बाबत फेरविचार करुन धोरणात्मक निर्णय घेणे. | | नगररचना |
| १७/५/०७ | २८ | वैद्यकिय खर्चाची प्रतीपुर्ती करणे बाबत. (श्री. वसंत ग. राणे यांचा मुलगा कै. सुहास वसंत राणे यांचे करिता झालेल्या वैद्यकिय खर्चाबाबत.) | | आस्थाप[illegible] |
| १७/५/०७ | २९ | वैद्यकिय खर्चाची प्रतीपुर्ती करणे बाबत. (श्रीम. महानंदा विजय पाटील यांचे करिता झालेल्या वैद्यकिय खर्चाबाबत.) | | आस्थापना |
| १७/५/०७ | ३० | श्री. सुर्यकांत दातीर (लिपिक) यांना पूर्वलक्षी प्रभावाने सेवेत कायम करणे बाबत. | | आस्थापना |
| १७/५/०७ | ३१ | सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचे दिनांक १२/०४/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महानगरपालिका अधिकारी यांच्या नगरसेवक / नागरिक यांना भेटण्याकरिता वेळ निश्चित करून देणेबाबत. | | सामान्य प्रशासन |
| १७/५/०७ | ३२ | सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांचे दिनांक ११/०५/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्या व दलित वस्त्या घोषित करणेबाबत. | | |
| १७/५/०७ | ३३ | सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांचे दिनांक ११/०५/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर अनुसुचित जाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या उपआयुक्त पदाचा अनुशेष भरणेबाबत. | | आस्थापना |
| ०१/६/०७ | ३४ | दि. २०/०१/२००७ व दि. २०/०१/२००७ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. | १० | सचिव |
| ०१/६/०७ | ३५ | जेसल पार्क मलनिःसारण केंद्रामुळे नागरिकांना आकारण्यांत येणाऱ्या विशेष स्वच्छता कराबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०५/२००७ रोजीचे प्रकरण क्र. १५) | ११ | कर |
| ०१/६/०७ | ३६ | रस्ते, चौकांना नावे देण्याबाबत विचार विनिमय करणे. (मा. स्थायी समिती सभा दि. २२/११/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १४१) | नामंजुर | सार्व. बांधकाम |
| ०१/६/०७ | ३७ | शववाहिनी व रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत. | १२ | वाहन |
| ०८/६/०७ | ३८ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व झोपडपट्ट्या घोषित करणेबाबत. | तहकुब | सुवर्ण जयंती |
| ०८/६/०७ | ३९ | जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (B.S.U.P.) | तहकुब | सार्व. |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १६/०४/२००७.**

**प्रकरण क्र. ०१ :-** **दि. ०६/१२/२००६ व दि. २१/१२/२००६ (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ०१ :-**

दि. ०६/१२/२००६ व दि. २१/१२/२००६ (दि. ०६/१२/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. १६/४/२००७

**प्रकरण क्र.** :- ०२

**ठराव क्र.** :- ०२

**विषय :-** **मनपा. क्षेत्रातील कच्चे/ पक्के नाले सफाई कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे.**

महापालिका क्षेत्रातील कच्चे पक्के नाले सफाई/खोदाईची कामे समाधानकारक होण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागामार्फत शहराची आठ गटात विभागणी करून प्रत्येक गटाकरीता भाड्याने जे.सी.बी., पोकलन, बोटीसह पोकलन, आदी मशीनरी पुरवठा करणे कामाच्या निविदा मागविण्यास मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे वॉर्ड साफसफाई कामी कार्यरत निविदाकाराकडून गोषवा-यात नमुद केल्याप्रमाणे नाले सफाई कामी मंजूर दरात मजूर व डंपर घेण्यात यावे. तसेच पावसाळ्या दरम्यान गटारातील, उंच सखल भागातील पाण्याचा निचरा जलदगतीने होण्याच्या दृष्टीने ठिकठिकाणी इमारती, सोसायट्या, संकुलने, आदींच्या प्रवेशद्वारी तसेच काही ठिकाणी रोड क्रॉसिंग करीता आर.सी.सी. पाईप खरेदी करणे आदी कामी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात नालेसफाई कामासाठी केलेली तरतूद अपुरी पडल्यास घनकचरा व्यवस्थापन (प्रक्रीया व विल्हेवाट) या लेखाशिर्षातून करण्यास मान्यता देत आहे. सदरची कामे तातडीने करावयाची असल्याने इतिवृत्तांच्या मंजुरीची वाट न पाहाता तात्काळ अंमलबजावणी करावी.

**सुचक :-** (sd/-) **अनुमोदन :-** (sd/-)

(sd/-)
महापौर
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०४/२००७

**प्रकरण क्रमांक :- ( ०३ )** :- भाईंदर (प) टेंभा व उत्तन येथिल प्राथमिक आरोग्य केंद्र इमारती व जागा मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महानगरपालिकेकडे हस्तांतर करणे करीता जिल्हापरीषद ठाणे यांना इमारती व जागेची किंमत अदा करणे व भाईंदर (प) टेंभा येथे अदयावयत इमारत बांधणे कामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्रमांक :- ( ०३ )**

प्रशासनाने सदर प्रकरणाबाबत सविस्तर गोषवारा दिलेला आहे. त्यानुसार भाईंदर (प) टेंभा प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत व जागा जिल्हापरिषद ठाणे यांच्याकडून हस्तांतर करून घेण्याकरीता नियमानुसार जागेची व इमारतीची किंमत जिल्हापरीषद ठाणे यांच्या सोबत आयुक्त यांनी बैठक घेउन अंतिम होणारी रक्कम सुलभ हप्त्यात प्रदान करण्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहेत. तसेच भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल इमारत, स्टाफ क्वार्टर बांधणे कामी महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. आर्किझम यांनी तयार केलेल्या रू. ८,९१,५१,९८४ /- रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर हॉस्पीटल इमारत कशाप्रकारे बांधून घ्यावी या बाबत आयुक्त यांनी त्यांच्या स्तरावर महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ते निर्णय घेउन कार्यवाही करावी.

सुचक :- श्री हैरल बोर्जिस                अनुमोदन :- श्री प्रेमनाथ पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

DKV/DK/19

(४)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

ठराव क्र. ४ हा प्रकरण क्र. १३ करिता देण्यांत आलेला आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०४/२००७

**प्रकरण क्र. १३ :-** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मिरा भाईंदर महानगरपालिकेस वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेले पत्र व सदर कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेबाबत विचार विनीमय करणे.

**ठराव क्र.०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस अतिरिक्त पाणी पुरवठा मिळणेबाबत शासन स्तरावर पत्रव्यवहार चालू होता. दि. ०३/१०/२००६ रोजी मिरा भाईंदर शहराला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करून देण संदर्भात मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच जलसंपदा विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होउन ठाणे येथील साकेत संकुला जवळील एम.आय.डी.सी. च्या पाईपलाईन मधून ३५ द.ल.लि. जास्तीचे पाणी मिरा भाईंदर शहराला उपलब्ध करून देणेचे ठरले.

तद्नंतर मा. मंत्री (उद्योग व अध्यक्ष महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) यांचेकडील बैठकित झालेल्या निर्णयानुसार व दि. ०९/०४/२००७ रोजी महामंडळाच्या संचालक मंडळाने मंजुर केल्यानुसार मुख्या अभियंता (मुख्यालय) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई - ९३ यांचेकडील पत्र क्र. जा.क्र./मुअ(मु)/५७७/२००७ मुख्य अभियंता यांचे कार्यालय, मऔविम, मुंबई - ९३ दि. ११/०४/२००७ अन्वये मिरा भाईंदर शहरास ३०द.ल.लि. अतिरिक्त पाणी पुरवठा करणेबाबतचे पत्र दिलेले आहे.

सदर कामी मजीप्रातील अधिकारी व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी यांच्यासमवेत केलेल्या कामाच्या तांत्रिक बाबींच्या चर्चेनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याची अंदाजित किंमत रू. ३,८०,८४,२०५/- एवढी होत आहे. सबब सदर खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत न करता महानगरपालिकेमार्फत करणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- ॲड. एस.ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०४/२००७

**दुःखवटा ठराव ०५ :-**

आपल्या राई गावातील प्रतिष्ठित नागरिक कै. सदानंद वामन पाटील, खारीगावातील कै. रजनी द्वारकानाथ पाटील, नवघर गावातील स्वातंत्र सैनिक अनंत रोहिदास पाटील यांची पत्नी भागीबाई अनंत पाटील तसेच भाईंदर पश्चिम येथील जय अम्बे नगर झोपडपट्टी क्र.२ येथील रामचंद्र पेंटर यांचे दुखःद निधन झालेले आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करून दुःखवटा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. संगिता म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०३/०५/२००७

**प्रकरण क्र. ०४ :-** छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर काशिमिरा नाका येथे शिवाजी महाराज पुतळ्या मागे स्वागत कमान बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०६ :-**

वरील संदर्भात महानगरपालिकेने स्वागत कमानी बांधल्या जाव्यात असा मी ठराव मांडत आहे व आणलेला प्रशासकीय विषय रद्द करण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. शुभांगी नाईक.** **अनुमोदक :- श्रीम. प्रियांका करंबेळे.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०३/०५/२००७

**प्रकरण क्र. ०५ :-** खारीगांव व घोडबंदर येथील इमारतीमध्ये नविन लायब्ररी चालु करण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०७ :-**

भाईंदर (पुर्व) खारीगांव शाळा गृह इमारती वरील मजल्यावर तसेच घोडबंदर येथील समाज मंदिरात, बंदरवाडी शाळेत अभ्यासिका/लायब्ररी सुरू करण्यास व त्याकामी फर्निचर, पुस्तक खरेदी इ. येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदक :- श्री. हंसुकुमार पांडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(C)

# मा. महासभा सभा दि. १६/०४/२००७

**प्रकरण क्र. :- ( ०६ )** छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर साई सर्व्हिस सेंटर समोरील दुभाजकात बंद केलेला प्रवेश सुरू करणे बाबत पोलिस अधिक्षक यांचे कडील दि. ५/०८/२००६ च्या पत्रावर निर्णय घेणे.

**ठराव क्र. :- (०८)**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर साई सर्व्हिस सेंटर समोरील दुभाजकातील बंद केलेला प्रवेश सुरू करणे व आवश्यक उपाययोजना करणेस येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर मोठया प्रमाणावर अपघात होत आहेत. तसेच विविध ठिकाणातील प्रवेश सुरू करण्याबाबत मागण्या येत असल्याने प्रशासनाने वाहतुक शाखा, ठाणे, ग्रामिण पोलिस यांच्या समवेत संयुक्त पहाणी करून प्रस्ताव तयार करून घ्यावा व सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**सुचक :-** शशिकांत ज. भोईर

**अनुमोदन :-** सौ. लिला गु. पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**पिठासन अधिकारी**

ठराव वाचून कायम करण्यात आला।

SSS/DK/M/6

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६-०४-२००७

**प्रकरण क्र. : ०७ शिक्षण मंडळ सदस्यांना मानधन व सभा (बैठक) भत्ता लागू करणेबाबत.**

**ठराव :- ०९**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील कलम-४ व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे प्रकरण – दोन अन्वये मा. महासभा दि. ३१/०१/२००६ ने मंजुरी दिल्याप्रमाणे दि. ०४/०५/२००६ पासुन सभापती व उपसभापती या पदाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष निवड होवून शिक्षण मंडळाचा कार्यभार अन्य दहा सदस्यासह त्यात एक शासकिय व एक अशासकिय सदस्य अशाप्रकारे दहा सदस्य व दोन पदाधिकारी मिळून १२ जणांचे शिक्षण मंडळ कार्यरत आहे. त्यांच्या मासीक सभा वेळोवेळी नियमानुसार सुरु आहेत. परंतु सद्यस्थितीत शिक्षण मंडळाचे सदस्यांना सभा (बैठक) भत्ता व मासीक मानधन देण्यांत येत नाही त्यामुळे शिक्षण मंडळाचे सदस्य वारंवार विचारणा करीत असतात म्हणून या महानगरपालिकेच्या शेजारील महानगरपालिकेत अस्तित्वात असलेल्या शिक्षण मंडळाचे सदस्यांना प्रदान करण्यांत येत असलेल्या मासीक मानधन व सभा (बैठक) भत्यांचे माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ | रू. ४०००/- प्रती मासीक मानधन | रू. १००/- प्रती बैठक भत्ता |
| २) | नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळ | रू. ४०००/- प्रती मासीक मानधन | रू. १००/- प्रती बैठक भत्ता |
| ३) | कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण मंडळ | सभापती- रू. २५००/- उपसभापती-रू. २०००/- सदस्य- रू. १५००/-प्रती मासीक मानधन | रू. ७५/- प्रती बैठक भत्ता |

उक्त तपशिलाप्रमाणे ठाणे जिल्हयातील महानगरपालिका शिक्षण मंडळात सदस्यांना सभा (बैठक) भत्ता व मासीक मानधन देण्यांत येते या माहितीच्या आधारे महानगरपालिका शिक्षण मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांना मानधन व सभा (बैठक) भत्ता देण्याबाबत शासन निर्णय क्र. संकिर्ण-२००४/४६८/प्र.क्र ८४/०४/नवि-२० दि. २४/१/२००५ व शालेय शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. एसएसबी-२००१/१३०/०४/प्राशी-२ दि. २३/०६/०४ अंतर्गत तरतूदीनुसार मानधन रू.४०००/- द.म.(दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल खर्च या बाबीवरील खर्च लक्षात घेवून) व बैठक भत्ता रू.१००/- (कमाल मर्यादा रू.४००/- द.म.) अशी कमाल तरतूद असून मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९-अ अंतर्गत तरतुदीस अनुसरून मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांना मानधन व उपस्थिती (बैठक) भत्ता हा महानगरपालिका नगरसेवकाचे मानधन व सभाभत्यापेक्षा अधिक होणार नाही तसेच या मानधनासाठी होणाऱ्या खर्चास शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नाही तर मानधन व बैठक भत्यासाठी येणारा सर्व खर्च हा महानगरपालिका निधीतून करावा लागणार आहे. त्यामुळे सदर प्रकरणी शासननिर्णयानुसार व अन्य महानगरपालिकेतील देण्यांत येत असलेल्या मानधन व बैठक भत्त्याच्या तुलनेत शिक्षण मंडळ, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पदाधिकारी व सदस्य यांना मासिक मानधन रू.२०००/- व सभा (बैठक) भत्ता रू. १००/- या दराने महानगरपालिका शिक्षण मंडळाची रितसर स्थापना झाल्या दिनांकापासून लागू करणेस मंजूरी देण्यांत येत असून या बाबत लेखा विभागाने अर्थसंकल्पात स्वतंत्र लेखा शिर्षका अंतर्गत मानधन व सभा भत्याची आर्थिक तरतूद करावी.

**सुचक : हॅरल बोर्जीस** **अनुमोदन : हंसु कुमार पांडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०३/०५/२००७

**प्रकरण क्र. ०८ :-** विक्री / साठा / उत्पादन करणाऱ्या आस्थापनेस आरोग्य लायसन्स (Health Licience) देणेसाठी दर निश्चित करणे.

**सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशान्वये तहकुब करण्यात आला.**

सही/-
महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०३/०५/२००७

**प्रकरण क्र. ०९ :-** महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करार पध्दतीने नेमण्यात आलेल्या कर्मचारी वर्गास मुदतवाढ करणेबाबत.

**सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशान्वये तहकुब करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०३/०५/२००७

**प्रकरण क्र. १० :-** सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांचे दिनांक ०९/०४/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

---

महानगरपालिकेच्या तज्ञ अधिकाऱ्यामार्फत पाणी पुरवठ्याचे वितरण व्यवस्थित होत नसल्याने यावर पर्याय म्हणून मुंबई महानगरपालिका जलअभियंता व नव्यामुंबईच्या जल अभियंत्यांना आपल्या पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेचे मुल्यमापन करणेबाबत.

श्री. लिओ कोलासो प्रस्तावाच्या चर्चेवेळी सभागृहात उपस्थित नसल्याने मा. महापौरांच्या आदेशान्वये प्रस्ताव फेटाळण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०३/०५/२००७

**प्रकरण क्र. ११ :-** सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १०/०४/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

---

आर्थिक व प्रशासकिय मंजुरीबाबत.

श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल प्रस्तावाच्या चर्चेवेळी सभागृहात उपस्थित नसल्याने मा. महापौरांच्या आदेशान्वये प्रस्ताव फेटाळण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०३/०५/२००७

**प्रकरण क्र. १२ :-** सन्मा. सदस्य श्रीम. सुरेखा गायकवाड यांचे दिनांक १०/०४/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

---

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रिक्त असलेल्या उपआयुक्त पदाचा अनुषेश भरणेबाबत.

श्रीम. सुरेखा गायकवाड प्रस्तावाच्या चर्चेवेळी सभागृहात उपस्थित नसल्याने मा. महापौरांच्या आदेशान्वये प्रस्ताव फेटाळण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

96

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १७/०५/२००७

प्रकरण क्र. १४ ते ३३ :-

कोरम अभावी सभा रद्द झाल्याने प्रस्तावांवर चर्चा होउु शकली नाही.

(१८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ०१/०६/२००७.**

**प्रकरण क्र. ३४ :- दि. २०/०१/२००७ व दि. २०/०१/२००७ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. १० :-**

दि. २०/०१/२००७ व दि. २०/०१/२००७ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** श्री. हॅवल जॉर्ज बोर्जीस **अनुमोदन :-** श्री. परशुराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ०१/०६/२००७**

**प्रकरण क्र. ३५ :- जेसलपार्क मल:निस्सारण केंद्रामुळे नागरिकांना आकारण्यांत येणा-या विशेष स्वच्छता कराबाबत...**

**ठराव क्र. ११ :-**

जेसलपार्क मल:निस्सारण केंद्र मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कार्यान्वीत केले जात आहे. सदरहू मल:निस्सारण केंद्राच्या देखभाल, दुरुस्ती व निगा यासाठी सदर भागातील लाभार्थीकडून करयोग्य मुल्यावर १३% दराने विशेष स्वच्छता कर वसुल करीत आहे. सदरहू विशेष स्वच्छता कर जादा असल्याने त्याचा बोजा जेसलपार्क रहिवाश्यांवर पडत आहे. आरोग्य सेवा, स्वच्छता इत्यादी कामे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्तव्यातील आहेत. सद्या महानगरपालिका जेसल पार्क रहिवाश्यांकडून वसुल करीत असलेला विशेष स्वच्छता कर १३% हा जादा असल्याने सदरहू विशेष स्वच्छता कर ६% दराने आकारण्यांत यावा 'अशी शिफारस करणारा ठराव मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१३, दि.११/०५/२००७ अन्वये पारित करण्यांत आलेला आहे.

मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१३, दि.११/०५/२००७ अन्वये शिफारस केल्याप्रमाणे जेसल पार्क भागातील रहिवाश्यांकडून विशेष स्वच्छता कर ६% दराने सन २००७-२००८ या वर्षापासून आकारणी करुन वसुल करण्यास मा. महासभा मंजुरी देत आहे.

सूचकः-

अनुमोदकः-

ठराव ~~सर्वानुमते~~ बहुमताने मंजुर

मा. महापौर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## महासभा दि. ०१/०६/२००७

**प्रकरण क्र. ३६ :-** रस्ते, चौकांना नावे देण्याबाबत विचार विनिमय करणे. (मा. स्थायी समिती सभा दि. २२/११/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १४१)

सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशान्वये तहकुब करण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका

(२०)

मा.महासभा दि. ७|६|२००७.

**प्रकरण क्र.३७ आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत**

**ठराव क्र. ९२ शववाहिनी व रुग्णवाहिका खरेदी करणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या सद्यास्थितीत सुमारे ८ ते ९ लाख इतकी आहे. तसेच शहराची सीमा ही मुंबई महापालिकेच्या सीमेला लागुन असल्याने शहरात नागरीकरण झपाटयाने होत आहे.

सद्यास्थितीत महानगरपालिकेकडे २ रुग्णवाहिका व २ शववाहिन्या कार्यरत आहेत. मिरा भाईदर महानगरपालिकेत ४ प्रभाग असुन प्रत्येक प्रभागाकरीता एक स्वतंत्र रुग्णवाहिका असणे आवश्यक आहे. परंतु अपु-या रुग्णवाहिके मुळे नागरीकांना वेळीच सेवा उपलब्ध होत नाही व त्यांना खाजगी रुग्णवाहीकेवर अवलंबुन रहावे लागते. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे. महानरपालिकेची सध्याची व पुढील लोकसंख्या तसेच नागरिकरणाचा वेग पाहता नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणुन प्रत्येक प्रभागात रुग्णवाहिका व शववाहीनी उपलब्ध करणे गरजेचे असल्याने ~~तीन~~ एक **रुग्णवाहिका व एक शववाहिनी खरेदी** करणे आवश्यक आहे. परंतु नागरीकांच्या निवासस्थाना पासुन स्मशानभुमी दुरवर असल्याने नागरिकांना प्रेत ब-याच दुरवर आपल्या खांदयावरुन न्यावे लागते मृत पावलेल्या व्यक्तींचे निवास स्थान व स्मशानभुमी यामधील अंतर पाहता नागरीकांना प्रेत खांदयावरुन स्मशानभुमी पर्यंत नेणे कामी नातेवाईकांस त्रास सहन करावा लागतो तरी नागरीकांच्या सोयी करीता महापालिकेमार्फत एक प्रेतवाहू वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. त्यामुळे शववाहिनी ऐवजी प्रेतवाहु वाहन खरेदी करणे आवश्यक आहे.

प्रेतवाहू वाहन व रूग्णवाहिकेकरिता टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडुन टाटा ४०७ एसएफसी मॉडेलची चेसिस खरेदी करून सदर चेसिसवर निविदा मागवुन रूग्णवाहिका व प्रेतवाहु वाहनाची बॉडी बांधण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :-** अॅड. एस. ए. खान

**अनुमोदक :-** ए. इकान भोईर

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**पिठासिन अधिकारी तथा**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०८/०६/२००७

**प्रकरण क्र. ३८ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व झोपडपट्ट्या घोषित करणेबाबत.

सदरचा विषय सविस्तर गोषवारा व परिपुर्ण माहिती नसल्यामुळे मा. महापौर यांच्या आदेशान्वये पुढच्या सभेत घेण्याचे ठरले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८/०६/२००७

**प्रकरण क्र. ३९ :-** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (B.S.U.P.) अंतर्गत घरकुल बांधणे करिता मंजुर विकास योजनेत फेरबदल करुन B.S.U.P. करिता आरक्षण करणे बाबत.

**सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशान्वये तहकुब करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८/०६/२००७

**प्रकरण क्र. ४० :-** झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण योजना मिरा भाईंदर शहरास लागू करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. **(S.R.A)**

**सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशान्वये तहकुब करण्यात आला.**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(२८)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

मा.महासभा दि.०१/०६/०७

प्रकरण क्र. ४७ (दि. ७/६/०७ ची तहकुब सभा)

पिठासन अधिकारी,

ठराव क्र.९३

S.E.Z बाबत याच सभागृहात मी 3 महिन्यापूर्वी वृत्तपत्रात आलेल्या जाहिरातीनुसार सभागृहाचे लक्ष वेधले होते कि,महापालिका हद्दीतील 7 व मुंबई महापालिका हद्दीतील 2 गावे महाराष्ट्राने M.M.R.D कडून M.T.D.C कडे वर्ग केले असून पॅन इंडिया या कंपनीस स्पेशल इकोनॉमिक झोन या स्कीममध्ये विकसित करण्याचे अधिकार देण्याचे जाहिर नोटीस प्रकाशित केली होती व याबाबत सविस्तर माहिती जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिका कार्यालयातील नागरिकांना पहावयास मिळेल असे सुचित केले होते परंतु त्यादिवशी सभागृहात प्रशासनच्या वतीने प्रशासन कोणताही खुलासा करू शकले नाही म्हणून पिठासन अधिका-यांना आम्ही याबाबतीत महासभेत विषयपत्रिकेवर विषय घ्यावा असा आग्रह धरला त्यानुसार महापौरांनी हा विषय आज सभागृहात आणल्याबाबत मी महापौरांना धन्यवाद देतो.

मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो कि,शासनाच्या वतीने 5740 हेक्टर जमीन S.E.Z साठी वापरण्याचे ठरविले आहे त्यात 3300 हेक्टर जमिन सरकारी व 2400 हेक्टर जमिन मालकी म्हणून वापरणार आहेत.शासनाच्या वतीने S.E.Z जाहिर करतेवेळी बोलेले जोते की,शासकीय जमिन संपादन करून विकासकर्ता त्या परिसराचा विकास करणार परंतु आपल्या महापालिका हद्दीतील डोंगरी,तारोडी,चौक,पाली,नवीखाडी,उत्तन,भाटेबंदर,राई,मोर्वा,मुर्धा तसेच गोराई या परिसरातल्या जमीन शासकीय जरी म्हटल्या असल्या तरी त्या या प्रकारात मोडतात 1) शासकीय जमीन जी सुमारे 200 ते 250 वर्षापासून स्थानिक लोकांच्या ताब्यात आहे त्यात त्यांची स्वतःची घरे आहेत,त्यांची आंबे,काजु,फणसाची विविध झाडे आहेत,ज्यावर त्यांचे कुटूंब अनेक वर्षापासून उपभोग घेत आहेत,बागायत करत आहेत,शेती करत आहेत.परंतु या जमिनींची सरकारी दफ्तरी सरकारी जमिन म्हणुन नोंद आहेत.अनेक जमिनीवर मीठागरे आहेत त्यात अनेक वर्षापासून मीठाचे उत्पादन होत आहे.त्यावर शिलोत्री म्हणुन नोंद आहे त्यांचे कुटूंब अनेक वर्ष उपजिवीकेचे साधन म्हणून व्यवसाय करत आहेत तर अनेक मुजरांच्या रोजगार त्यावर अवलंबुन आहे तसेच हजारो मच्छीमार समुद्रकिनारी मच्छीमारी करतात.त्यांच्यावर व्यवसाय म्हणुन त्यांचे उत्पन्न घेत आहेत.हजारो मजूर मच्छीमारीमध्ये

काम करतात तेही बेकार होतील.मच्छीमार,शेतीवाले,बागायतवाले व मीठागर वाले अश्य
लोकांचे करोडो रूपयांचे नुकसान होऊन संपुर्ण उपजीवीकेचे साधनच निघुन जाईल.शासनात
पॅन इंडिया तर्फे असे कोणतेही स्पष्ट निवेदन झाले नाही किंवा फक्त शासकीय जमीन जी
आहे तीच घेणार असे कुठे स्पष्ट केले नाही असे समजते की विकास कर्ता आपली सिक्युरी
त्यासर्व विभागाचा विकास करणार ज्यावेळी स्थानिकांना कोणताही व्यवसाय करता येणार ना
करता येणार नाही किंवा जाणे – येण्यासाठी ओळखपत्र घेऊन प्रवेश करावा लागेल व महा
कोणताही अधिकार राहणार नाही.

हा निर्णय घेतेवेळी प्रशासनाने महापालिकेनेही स्वाहिक्त संस्था असताना महापालिकेने
मत विचारत घेतले नाही.वास्तविकता शासनाच्या वतीने M.M.R.D.A च्या वतीने M.I.D.C च
जन जागृती म्हणून या प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती देणे कर्तव्य होते.ही वस्तुस्थिती अ
s.e.z बाबत देशाच्या कानाकोप–यांतुन शेतक–यांचा,जमिनदारांचा असंतोष प्रकट होऊन
होत आहे हे आपण टिव्हीवर पहात आहोत पेपरमध्ये वाचत आहोत,आपल्या महापालिव
अशी परिस्थिती उदभवू नये म्हणुन ही सभा असा ठराव पारीत करत आहे कि,शासनाने या प्र
सविस्तर माहिती देऊन पुर्नवसनाचे स्पष्ट धोरण जाहिर केल्याशिवाय हा प्रकल्प राबवू नये
ठराव मांडत आहे.

सुचक :- रोहिदास पाटील                                    अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी
मिरा–भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०८/०६/२००७

**प्रकरण क्र. ४२ :-** करार पध्दतीने शिक्षकांची नियुक्ती करणे बाबत.

**ठराव क्र. १४ :-**

जीवनात शिक्षणाचे संस्कार अंत्यत महत्वाचे आहेत. जर शिक्षणाचा स्तर उंचावला तर विकासाची गती वाढते आणि त्याचबरोबर जीवनाचा स्तर देखिल उंचावतो. ही बाब जाणुनच ८६ वी घटना दुरुस्ती करण्यात आली आणि मार्गदर्शक तत्वाएवजी मुलभुत अधिकाराचे २१ अ हे कलम भारतीय राज्य घटनेत नव्याने समाविष्ठ करण्यात आले. या कलमानुसार, ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षणाचा हक्क हा मुलभुत हक्क म्हणुन घटनेने मान्य केला आहे.

मिरा भाईदर महानगरपालिका परिसरात विकास कामे मोठ्या प्रमाणावर होत असुन विकास कामे वेगाने सुरु आहेत. त्याचप्रमाणे लोकसंख्या सुध्दा वाढत आहे. लोकसंख्या झपाट्याने वाढल्यामुळे सहाजिकच शाळेतील मुलांची पटसंख्या वाढत असुन जशी मुलांची पटसंख्या वाढते त्याचप्रमाणे वर्गाचे प्रमाण वाढत आहे. परंतु, पटसंख्या वाढल्यामुळे व वर्ग वाढल्याने शिक्षकांची मंजुर पदसंख्या २०२ पेक्षा अधिक झालेली नाही त्यामुळे सध्या २०२ मंजुर शिक्षक पदापेक्षा अधिक शिक्षकांची आवश्यकता आहे. परंतु, शासन मंजुरी पेक्षा अधिक शिक्षक भरता येत नाही. शासनाजवळ दि. ३०/०९/२००६ च्या पटसंख्येच्या प्रमाणात २६ पदे वाढीव शिक्षकांची मागणी केलेली आहे. परंतु, त्यास मंजुरी येईपर्यंत बराच कालावधी लागेल. त्यामुळे सन २००७ - ०८ या शैक्षणिक वर्षात मुलांच्या पटसंख्येत अजुन वाढ अपेक्षित असुन या वाढीव पटसंख्येत उर्दु व हिंदी माध्यमांच्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे कार्यरत शिक्षकांच्या संख्येत उर्दु व हिंदी माध्यमांच्या शाळेत शिक्षक अनुक्रमे ८ व ७ किमान कमी पडणार आहेत. तसेच मिरा भाईदर महानगरपालिका शिक्षण मंडळ मनपा शाळा क्र. १६, १७, १८ व ३० या भाईदर (प.) च्या शाळेतील शिक्षकांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार तामिळ माध्यमाची शाळ चालु करण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार सन २००७ - ०८ या शैक्षणीक वर्षात तामिळ माध्यमाची शाळा भाईदर (प.) येथे सुरु करण्याचा मानस असुन एक तामिळ शिक्षक सुध्दा लागणार आहे. (उर्दु = ८, हिंदी = ७ व तामिळ = १ एकुण १६) त्यासाठी सन २००७ - ०८ या शैक्षणीक वर्षात मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या नियमानुसार पटसंख्येच्या प्रमाणात वर्गनिहाय एक शिक्षक किमान देण्याचे दृष्टीने व शासनाकडुन पदे मंजुर होउन येईपर्यंत मनपा शाळेतील शैक्षणीक कामकाज सुरळीत सुरु राहण्याचे दृष्टीने महानगरपालिकेने शिक्षण मंडळासाठी किमान १६ शिक्षक करार पध्दतीवर रु. ३०००/- (तीन हजार रुपये मात्र) या शिक्षण सेवकाच्या वेतनावर तात्पुरते करार पध्दतीने नेमणुक करण्यास मंजुरी द्यावी व नेमणुक करण्यात येणाऱ्या शिक्षकासाठी देण्यात येणाऱ्या वेतनाचा खर्च महानगरपालिकेने स्वनिधीतुन करावा असा ठराव मिरा भाईदर महानगरपालिका शिक्षण मंडळाने सभा दि. ३०/०४/२००७ रोजी ची तहकूब सभा दि. २३/०५/२००७ रोजी सर्वानुमते मंजुर करुन पुढील कार्यवाही साठी शिफारस केली आहे. तरी महानगरपालिकेने करार पध्दतीने १६ शिक्षकांची नियुक्तीला येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल का. पाटील.** **अनुमोदक :- श्रीम. नयना ग. म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

(२०)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दि.१४/६/२००७

(दि. ७/६/०७ ची तहकुब सभा)

**प्रकरण :** ( ४३ ) भाईदर पूर्व – पश्चिम यांना जोडणा-या पादचारी पूलाबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्रमांक** ( ९५ )

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत भाईदर पूर्व प्रशांत हॉटेल ते भाईदर पश्चिम बालाजी नगर पर्यत रेल्वे वरुन फुट ओव्हर बांधणे अत्यंत गरजेचे असून सदर फुट ओव्हर ब्रीज बांधणे कामी येणा-या खर्चास व रेल्वे प्रशासनाकडून आवश्यक ती मंजूरी घेउन कामाबाबत पुढील कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री रोहिदास पाटील

अनुमोदन :- श्री धनराज अग्रवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

मिरा-भाईदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०८/०६/२००७

**प्रकरण क्र. ४४ :-** नागरी संरक्षण समिती गठीत करणे बाबत.

सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशान्वये तहकुब करण्यात आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १४/०६/२००७

**अभिनंदन ठराव क्र. १६ :-**

मुंबईमध्ये घेण्यात आलेल्या सी.ई.टी. परिक्षेत मुंबई विभागामध्ये श्री. उदित सराफ, तिसरा मजला, बालाजीधाम, शंकर मंदिराजवळ भाईंदर हे प्रथम आल्याबद्दल ही सभा अभिनंदन करत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शहा.** **अनुमोदक :- श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(३०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## महासभा दि. १४/०६/२००७

प्रकरण क्र. ४५

ठराव क्र. १७

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ७ आरोग्य केंद्र १ फ़िरता दवाखाना व १ आरोग्य उपकेंद्र सुरू आहेत. या आरोग्य केद्रांत दररोज ६०० ते ७०० बाह्य रुग्ण आरोग्य केंद्रातील मोठया प्रमाणात घेत असतात. या बाह्यरुग्णांना आरोग्य केद्रामधुन औषधाचे वाटप करण्यात येते.

सन २००७-०८ या वर्षात महानगरपालिका आरोग्य केंद्राकरिता लागणा-या तसेच राज्य शासनाच्या आर.सी.एच. प्रकल्पांर्तगत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ५ नव्याने सुरु होणा-या आरोग्य केंद्राकरिता मोठ्या प्रमाणावर औषधांची रेबीज प्रतिबंधक लसींची, साहित्य उपकरणांची आवश्यकता आहे.

सन २००७-०८ या आर्थिक वर्षाकरिता महानगपालिका आरोग्य केंद्राकरिता आवश्यक असणारी साहित्य उपकरणे व रेबीज प्रतिबांधक लस, खरेदी करणेस या कामी येणा-या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर. ठराव वाचून कायम करण्यात आला.

सुचक श्री. हेलन गोविंद

अनुमोदक चंद्रकांत मोदी

मा. महापौर

(३७)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०६/२००७

(दि. ७/६/०७ व दि. ८/६/०७ ची तहकूब सभा)

प्रकरण क्रमांक ( ४६ ) भारतरत्न डॉ. बाबासाहेब अर्धाकृती पुतळा अनावरण समारंभ व मा. कविवर्य श्री जगदीश खेबुडकर यांच्या अमृत महोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमांना कार्योत्तर मान्यता देणे.

ठराव क्रमांक (९८ )

मिरा-भाईदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळयाचे अनावरण मा. कविवर्य श्री जगदीश खेबुडकर यांच्या अमृत महोत्सवा निमित्त भाईदर (पू.) नवघर शाळेच्या पटांगणात दि. २४/०३/२००७ रोजी त्यांच्या जाहीर नागरी सत्कार करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात त्यांना स्मृती चिन्ह देण्यात आलेले आहे. सदर दोन्ही कार्यक्रमाना व कार्यक्रमांच्या खर्चास मा. महासभेची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सुचक:- श्री हॅरल बोर्जिस. अनुमोदक:- सौ. रीटा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी
मिरा-भाईदर महानगरपालिका

(३२)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १४/०६/२००७

**प्रकरण क्र. ४७ :-** मा. महासभा दि. ०६/१२/२००६ ठराव क्र. ७३ बाबत फेरविचार करुन धोरणात्मक निर्णय घेणे.

**सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशान्वये तहकुब करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(33)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## महासभा दि.14/6/2007

दि. ७/६/०७ व दि. ८/६/०७ ची तहकुब सभा

प्रकरण क्र.48 :– मिरारोड प्रभागातील 'शांतीनगर गृहसंकुलन' व 'सृष्टी कॉम्पलेक्स' येथील STP प्लांट महानगरपालिकेने ताब्यात घेतल्याने सदर इमारतींना विशेष स्वच्छता कर लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र.( ७९ )

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड प्रभागातील 'शांतीनगर गृहसंकुलन' व 'सृष्टी कॉम्पलेक्स' मधील भुमिगत गटार योजना व STP प्लांट महानगरपालिकेने दि.21/11/05 व दि.26/7/06 रोजी ताब्यात घेतले आहे व त्याची देखभाल,दुरूस्ती,निगा महापालिकेच्या फंडातुन केली जात आहे.या भागांतील रहिवाश्यांसाठी हि विशेष भुमिगत योजना असून त्या योजनेचा लाभ घेण्याचा लाभार्थीकडून खर्चाच्या प्रमाणात विशेष स्वच्छता कर लावणेची तरतुद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 129(ब) मध्ये आहे.अधिनियमातील तरतुदीनुसार संबधित गृहसंकुलनातील मालमत्ताधारकाकडून त्यांच्या करयोग्य मुल्यावर 13% इतका विशेष स्वच्छता कर लावण्याची शिफारस प्रशासनाने केलेली आहे परंतु शांतीनगर गृहसंकुलन व सृष्टी कॉम्पलेक्स मधील रहिवाश्यांना हा कर भरणे डोईजड होईल म्हणून विशेष स्वच्छता कर करयोग्य मुल्यावर 2007–08 या वर्षापासून 6% दराने कर आकारणी करून वसुल करण्यास महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :– रोहिदास पाटील

अनुमोदन :– मदन सिंह

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १४/०६/२००७**

**प्रकरण क्र. ४८ :- मिरारोड प्रभागातील सृष्टी कॉम्प्लेक्स व शांतीनगर गृहसंकुलन येथील भूमिगत गटार योजना बाबत विशेष स्वच्छता कर लागू करणे बाबत...**

**ठराव क्र. १८ :-**

**सदर विषयासंदर्भात मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेला गोषवारा वाचन करण्यांत आले.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड प्रभागातील **"शांतीनगर गृहसंकुलन"** व **"सृष्टी कॉम्प्लेक्स"** मधील भूमिगत गटार योजना एस.टी. पी. प्लांट महानगरपालिकेने अनुक्रमे दि.२१/०५/२००५ व २६/०७/२००६ रोजी ताब्यात घेतला आहे. **"शांतीनगर गृहसंकुलन"** व **"सृष्टी कॉम्प्लेक्स"** या भागातील रहिवाश्यांसाठी ही भूमिगत गटार योजना/एस.टी. पी. प्लांट असून त्या योजनाचा लाभ घेणा-या लाभार्थीकडून विशेष स्वच्छता कर लावण्याची तरतुद आहे. **"मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ (ब)"** मध्ये आहे.

मा. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून प्राप्त झालेला अहवालानुसार खालीलप्रमाणे देखभाल व दुरुस्ती कामी वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | देखभाल दुरुस्ती करीता अपेक्षित खर्च रु. |
|---|---|---|
| १ | सृष्टी कॉम्प्लेक्स | रु. २० लाख |
| २ | शांतीनगर गृहसंकुलन | रु. ६७ लाख |
| | **एकूण** | रु. ८७ **लाख** |

वरीलप्रमाणे भूमिगत गटार योजनेसाठी महानगरपालिकेस वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील खर्चाचा विचार करता संबंधित लाभार्थ्याकडून वसुल करण्याच्या दृष्टीने **"शांतीनगर गृहसंकुलन"** व **"सृष्टी कॉम्प्लेक्स"** मधील मालमत्ता करदात्यांकडून त्यांच्या करपात्र मुल्यावर १३% दराने विशेष स्वच्छता कर प्रशासनाने लागू करण्यास प्रस्तावित केलेले आहे. तो जादा असल्याने व आरोग्य सेवेची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. सबब **"शांतीनगर गृहसंकुलन"** व **"सृष्टी कॉम्प्लेक्स"** यामधील मालमत्ता धारकांकडून ६% दराने विशेष स्वच्छता कर लावण्यांत यावा व सदर कराची वसुली सन २००७-२००८ या आर्थिक वर्षापासून लागू करण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

**सूचक:-** ॲड. एस. ए. खान　　　　**अनुमोदक:-** चन्द्रकांत मोदी

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(३५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**महासभा दि. १४/०६/२००७**

(दि. ७/६/०७ व दि. ८/६/०७ ची तहकूब सभा)

**प्रकरण क्र. ४९** **महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करारपध्दतीने नेमण्यात आलेल्या कर्मचारी वर्गास मुदत वाढ देणे बाबत.**

**ठराव क्र.** २०

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता दि. १९.०४.२००३ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ०५ अन्वये मनपाच्या खालील विभागात आरोग्य केंद्रे सुरू करण्यास मान्यता दिली होती. तसेच सदर केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, प्रसविका, फार्मासिस्ट तथा लिपीक यांची करारपध्दतीने नेमणुकीस मंजूरी दिली होती.

| | |
|---|---|
| भाईंदर पूर्व | २ आरोग्य केंद्रे (नवघर / बंदरवाडी) |
| भाईंदर पश्चिमत | २ आरोग्य केंद्रे (जुने मनपा कार्यालय व गणेश देवलनगर) |
| उत्तन | १ आरोग्य केंद्र |
| मिरारोड | १ आरोग्य केंद्र (नयानगर) |
| काशिमिरा | १ आरोग्य केंद्र (पेणकरपाडा) |
| काशिगाव | १ फिरता दवाखाना |

वरील आरोग्य केंद्रांकरिता वैद्यकीय अधिकारी - ८, परिचारिका (एन. एम.) - ८, प्रसविका (ए.एन.एम) - २१, फार्मासिस्ट कम लिपीक - ८ या पदास करारपध्दतीने मंजूरी देण्यात आली होती. त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये मा. स्थायी समितीने दि. २०.०९.२००५ रोजी ठराव क्र. ४६ अन्वये पाच महिन्यासाठी नेमणुकीस मंजूरी घेण्यात आलेली होती. तसेच महानगरपालिका क्षेत्रात नव्याने ५ आरोग्य उपकेंद्रे सुरू करणे बाबत दि. ३०.०७.२००५ रोजीच्या मा. स्थायी समितीने ठराव क्र. ८८ अन्वये आरोग्य केंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी ५, परिचारिका ५, प्रसविका ५, फार्मासिस्ट तथा लिपीक ५ यांची करारपध्दतीने नेमणूक करण्यास मान्यता दिली होती. त्यापैकी आरोग्य केंद्राकरिता वैद्यकीय अधिकारी १, परिचारिका ३, प्रसविका १, फार्मासिस्ट तथा लिपीक ३ करारपध्दतीने रूजू झाले आहेत. त्यानंतरच्या काळात काही वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी महापालिका सेवा सोडून गेल्यामुळे संबंधित रिक्त पदांवर मा. स्थायी समिती सभा दि. ३१.०८.२००६ च्या ठराव क्र. ९७ अन्वये वैद्यकीय अधिकारी २, परिचारिका २ व प्रसविका ४ यांची पाच महिन्यांकरिता करार पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली आहे.

वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दि. २०.०९.२००५ रोजीच्या मा. महासभेच्या ठराव क्र. ४६ अन्वये एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ५ महिन्याची मुदत वाढ देण्यात आली होती. तसेच मा. महासभा दि. २०.०१.२००६ च्या ठराव क्र. ८४ अन्वये प्रत्येक वैद्यकीय अधिकारी व

कर्मचाऱ्यांना दर ५ महिन्यानंतर तांत्रिक खंड देऊन एक वर्षाची मुदत वाढ देण्यात आलेली होती. सदर मुदत फेब्रवारी २००७ पर्यंत संपलेली असल्यामुळे सर्व वैद्यकीय अधिकरी व कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तरी आरोग्य केंद्रांसाठी व उपकेंद्रासाठी कार्यरत असलेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुदत संपल्यापासून एक दिवस तांत्रिक खंड देऊन १ वर्ष मुदतवाढ देणेस ही महासभा मंजूरी देत आहे.

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रमोद पडवळ | वैद्यकीय अधिकारी |
| २ | डॉ. चंद्रशेखर कांबळे | वैद्यकीय अधिकारी |
| ३ | डॉ. अंजली पाटील | वैद्यकीय अधिकारी |
| ४ | डॉ. बालनाथ चकोर | वैद्यकीय अधिकारी |
| ५ | डॉ. अरविंद काकडे | वैद्यकीय अधिकारी |
| ६ | डॉ. वंदना पाटील | वैद्यकीय अधिकारी |
| ७ | डॉ. नंदकिशोर लहाने | वैद्यकीय अधिकारी |
| ८ | डॉ. अशोक पेडवी | वैद्यकीय अधिकारी |
| ९ | डॉ. ब्रिजेश पटेल | वैद्यकीय अधिकारी |

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | मिना तेरडे | परिचारीका / एन.एम |
| २ | ज्योती सात्वे | परिचारीका / एन.एम |
| ३ | जागृती वेताळे | परिचारीका / एन.एम |
| ४ | रसीका दळवी | परिचारीका / एन.एम |
| ५ | लिटा करवालो | परिचारीका / एन.एम |
| ६ | रेश्मा शेट्टी | परिचारीका / एन.एम |
| ७ | जॉयसी हेन्ड्रीक्स | परिचारीका / एन.एम |
| ८ | चित्रा भोईर | परिचारीका / एन.एम |
| ९ | जेन्वी रॉड्रीक्स | परिचारीका / एन.एम |
| १० | स्मिता करवालो | परिचारीका / एन.एम |

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रीया पागधरे | प्रसविका / ए.एन.एम |
| २ | परिदा पठाण | प्रसविका / ए.एन.एम |
| ३ | सरीता ठाणकर | प्रसविका / ए.एन.एम |
| ४ | अश्वीनी पोतदार | प्रसविका / ए.एन.एम |
| ५ | निलीमा मोकल | प्रसविका / ए.एन.एम |
| ६ | करूणा पागधरे | प्रसविका / ए.एन.एम |
| ७ | दक्षता गमरे | प्रसविका / ए.एन.एम |
| ८ | संधेना पवार | प्रसविका / ए.एन.एम |
| ९ | प्रमिला देसाई | प्रसविका / ए.एन.एम |
| १० | पदमा भोंगाडे | प्रसविका / ए.एन.एम |
| ११ | सिमा चव्हाण | प्रसविका / ए.एन.एम |
| १२ | उर्मिला घेगड | प्रसविका / ए.एन.एम |
| १३ | संध्या शिंगाडे | प्रसविका / ए.एन.एम |
| १४ | सुनिता मोठे | प्रसविका / ए.एन.एम |
| १५ | जयश्री सावंत | प्रसविका / ए.एन.एम |

| क्र. | नाव | पद |
| --- | --- | --- |
| १६ | मनिषा झोरे | प्रसविका / ए.एन.एम |
| १७ | सुधा पाटील | प्रसविका / ए.एन.एम |
| १८ | ज्योती आंधळे | प्रसविका / ए.एन.एम |

| क्र. | नाव | पद |
| --- | --- | --- |
| १ | राहूल भोईर | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| २ | सचिन करंडे | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ३ | सुधीर पवाले | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ४ | वैशाली मोरे | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ५ | धनश्री भोईर | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ६ | योगेश शिंदे | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ७ | संजीव धुमाळे | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ८ | प्रकाश थोरात | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ९ | माधवी क्षत्रिय | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| १० | दिलीप राठोड | फार्मासिस्ट तथा लिपीक |
| ११ | देवयानी घरत | फार्मासिस्ट तथा लिपीक |

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस

अनुमोदक :- सौ. रिटा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(३८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि.१४/०६/२००७
(दि. ७/६/०७ व दि. ८/६/०७ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ५० :-**

**एकात्मीक डास नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत शास्त्रौक्त पध्दतीने फवारणीचे कामे कंत्राट पध्दतीने देणे बाबत...**

ठराव क्र. २९ :-

एकात्मीक डास नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत खाजगीकरणा मार्फत डांस नियंत्रण करण्याचे काम कंत्राट पध्दतीने देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केले होता. दि.३०/०५/२००७ रोजीचे मा. स्थायी समितीने सन २००६-०७ चे मंजुर निविदाकारास सहा महिन्याची मुदत वाढ दिलेली आहे. ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत असुन सन २००७-०८ यावर्षी कंत्राट पध्दतीने डांस नियंत्रण करण्याचे कामाचा प्रस्ताव अगामी महासभेपुढे ठेवण्यात यांवा.

सुचक :- ॲरल कोर्लीस — अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(३९)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.५/६/०७ (दि. १/६/०७ ची तहकुब व ५/६/०७ सभा)**

**प्रकरण क्र.५१ :-** **वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करणे बाबत....**
(अ) श्री. वसंत ग. राणे यांचा मुलगा कै. सुहास वसंत राणे यांचे करीता झालेल्या वैद्यकीय खर्चाबाबत.

**ठराव क्र. २२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर, विशेष कार्य अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री. वसंत गटलू राणे यांचा मुलगा कै. सुहास वसंत राणे यांची तब्येत आकस्मिक बिघडल्याने, त्यांना खाजगी हॉस्पीटल मध्ये दि.०३/०६/२००६ रोजीपासून वैद्यकिय उपचारासाठी हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांना रक्तासंबधी आजार होता. उपचारादरम्यान त्यांच्या मुलाचे दि. १०/०६/२००६ रोजी निधन झालले आहे. वैद्यकीय उपचारासाठी एकुण रु.१,६०,७३५/- खर्च झालेला आहे.

शासन निर्णय क्र. एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि. १९ मार्च २००५ नुसार कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मीक निकडीच्या प्रसंगी झालेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती बाबतची मान्यता आहे. या निणर्यामधील एकूण २७ आकस्मीक आजाराच्या यादीत रक्तासंबधी आजाराचा उल्लेख असून आजाराची प्रतीपुर्ती रु. ४०,०००/- मर्यादेपर्यत अनुज्ञेय आहे. त्याचप्रमाणे मा. महासभा दि.१८/०४/२००६ ठराव क्र. ९ अन्वये स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती मंजुर केलेली आहे.

वरीलप्रमाणे रु. ४०,०००/- पेक्षा जास्त वैद्यकिय खर्चाचे प्रतिपुर्ती करावयाची आहे. याबाबत विहीत तरतुदीत न बसणा-या प्रकरणी काही अपवादात्मक परीस्थितीत विशेष बाब म्हणून वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती करणेसाठी मा. आयुक्त यांना प्राप्त असलेल्या देयक प्रदानाच्या अधिकारा अंतर्गत, श्री. वसंत गटलू राणे यांचे दिवंगत मुलाच्या वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदर बाबतीत मा. आयुक्त यांनी मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडून अभिप्राय मागवून त्यांचे अभिप्रायाप्रमाणे मा. आयुक्त यांनी सदर दोन्हीस वैद्यकिय खर्चाची प्रति- पुर्ती करावी.

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(४०)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.** ८।६।०७ (दि. १।६।०७ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र.** ५२ **:- वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करणे बाबत....**

(ब)श्रीम. महानंदा विजय पाटील यांचे करीता झालेल्या वैद्यकीय खर्चाबाबत.

**ठराव क्र.** २३ **:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर, वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत असलेल्या श्रीम. महानंदा विजय पाटील यांची तब्येत आकस्मिक बिघडल्याने, त्यांना खाजगी हॉस्पीटल मध्ये दि.०१/१०/२००६ रोजीपासून वैद्यकिय उपचारासाठी हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांना लिव्हर अब्सेस, मुत्र पिंडाचा आजार, डायबिटीस मिलीटर (मधुमेह), आघात सलक्षण रक्तामधील आजार व कोमा व याकरीता वैद्यकीय उपचारासाठी एकुण रु.६,१७,२७६/- खर्च झालेला आहे.

शासन निर्णय क्र. एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि. १९ मार्च २००५ नुसार कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मीक निकडीच्या प्रसंगी झालेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती बाबतची मान्यता आहे. या निणर्यामधील एकूण २७ आकस्मीक आजाराच्या यादीत श्रीम. महानंदा विजय पाटील यांचे आजाराचा उल्लेख असून, आजाराची प्रतीपुर्ती रु. ४०,०००/- मर्यादेपर्यंत अनुज्ञेय आहे. त्याचप्रमाणे मा. महासभा दि.१८/०४/२००६ ठराव क्र. ९ अन्वये स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती मंजुर केलेली आहे.

वरीलप्रमाणे रु. ४०,०००/- पेक्षा जास्त वैद्यकिय खर्चाचे प्रतिपुर्ती करावयाची आहे. याबाबत विहीत तरतुदीत न बसणा-या प्रकरणी काही अपवादात्मक परीस्थितीत विशेष बाब म्हणून वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती करणेसाठी मा. आयुक्त यांना प्राप्त असलेल्या देयक प्रदानाच्या अधिकारा अंतर्गत, श्रीम. महानंदा विजय पाटील यांचे उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदर बाबतीत मा० आयुक्त यांनी मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडुन अभिप्राय मागवून त्यांचे अभिप्रायाप्रमाणे मा० आयुक्त यांनी सदर दोन्हीस वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करावी ~~[illegible]~~

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानरगपालिका

## मा. महासभा दि.१४ / ६ /२००७

( दि. ९।६।०७ व दि. ८।६।०७ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. (५३) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना दिलेली पदोन्नती तसेच सरळसेवेने केलेली उमेदवारांची नेमणूक यादीचे अवलोकन करुन मान्यता देणे.**

**ठराव क्र.** २४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी तसेच रिक्त पदांवर सरळ सेवेने भरती करणे करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) नुसार निवडसमिती गठित केलेली होती. त्यानुसार पुढील प्रमाणे कर्मचा-यांना पदोन्नती / सरळसेवेने नेमणुक केलेली आहे.

अ) पदोन्नतीद्वारे नेमणूक :-

| अ.क्र. | नाव | पदाचा संवर्ग | पदाचा प्रवर्ग | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. भारत दोधू जगताप | सहा.नगररचनाकार | अनु. जाती | ६,५००-१०,५०० |
| २ | श्री. किरण मोहन राठोड | उप-अभियंता | खुला | ८,०००-१३,५०० |
| ३ | श्री. नितिन रघुनाथ मुकणे | उप-अभियंता | अनु. जाती | ८,०००-१३,५०० |
| ४ | श्री. शरद गोरखनाथ नानेगांवकर | उप-अभियंता | खुला | ८,०००-१३,५०० |
| ५ | श्री. हेमचंद्र मनोहर किणी | उप-अभियंता | खुला | ८,०००-१३,५०० |
| ६ | श्री. राजकुमार कांबळे | सहा. सार्व. आरोग्य अधिकारी | खुला | ५,५००-९,००० |
| ७ | श्री. संदिप शिंदे | वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक / मुख्य स्वच्छता निरिक्षक | खुला | ५,०००-८,००० |
| ८ | श्री. नागेश रामा इरकर | उद्यान अधिक्षक | खुला | ५,५००-९,००० |
| ९ | श्री. हंसराज मेश्राम | उद्यान अधिक्षक | खुला | ५,०००-८,००० |

ब) सरळसेवेने नेमणूक :-

महापालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदांवर सरळसेवेने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पदाचा संवर्ग | पदाचा प्रवर्ग | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम. सीमा कैलासनाथ दुबे | सिस्टीम मॅनेजर | खुला | ६५००-२००-१०५०० |
| २ | श्री. राजकुमार घरत | संगणक ॲनालिस्ट | खुला | ५०००-१५०-८००० |
| ३ | श्रीम. मनस्वी मंगेश म्हात्रे | संगणक प्रोग्रामर | खुला | ४५००-१२५-७००० |
| ४ | श्री. जितेश काशीनाथ मोरे | लिपिक | (अपंग) एस.सी. | ३०५०-४५९० |
| ५ | श्री. कैलास चंद्रकांत सातपुते | लिपिक | (अपंग) एन.टी. | ३०५०-४५९० |
| ६ | श्री. राजीव आनंदराव चव्हाण | लिपिक | (अपंग) एन.टी. | ३०५०-४५९० |
| ७ | श्री. मोहन कृष्णा सावंत | लिपिक | (अपंग) खुला | ३०५०-४५९० |
| ८ | श्री. मचीगर अर्जुन मामलप्पा | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | श्री. योगेश अरुण पाटील | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १० | श्री. मंगेश दामोदर पाटील | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ११ | श्रीम.कैलास मुरलीधर शर्मा | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १२ | श्री. विजय नोयेल मुनीस | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १३ | श्री. आगुस्तीन डेव्हीड मेंडोसा | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १४ | आरेकर अनिरुद्ध विठ्ठल | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १५ | श्री. अविनाश शांताराम गावंड | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १६ | श्री. एकनाथ पांडूरंग साळूंखे | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १७ | श्री. संदिप लक्ष्मण पवार | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १८ | श्री. मनिष पांडूरंग जाधव | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| १९ | श्री. प्रल्हाद शिवराम तांडेल | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २० | श्रीम. मिलन मदन पाटील | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २१ | श्री. घरत योगेश लडकू | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २२ | श्री. शिंदे मनोहर बसाप्पा | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २३ | श्री. अब्दार वजीर शेख | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २४ | श्री. राकेश सुधाकर पाटील | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २५ | श्री. श्यामराव दादासाहेब | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २६ | श्री. प्रभाकर कृष्णा माने | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २७ | श्री. बालाजी इंद्रजित शिंदे | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २८ | श्री. नायजल जोसेफ फर्नांडीस | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| २९ | श्री. मोळावडे कृष्णन बाबुराव | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३० | श्री. नितिन ओंकार बर्नवाल | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३१ | श्री. मधु दत्तु देवकाते | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३२ | श्री. प्रविण श्याम दिवे | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३३ | श्री. देसले राजेंद्र गजानन | सफाई कामगार | (अपंग) खुला | २५५०-३२०० |
| ३४ | डॉ. चंद्रशेखर मधुकर कांबळे | वैद्यकीय अधिकारी | अनु.जाती | ८०००-२७५-१३५०० |
| ३५ | डॉ. अशोक दामू पाडवी | वैद्यकीय अधिकारी | अनु.जमाती | ८०००-२७५-१३५०० |
| ३६ | डॉ. वंदना रामचंद्र पाटील | वैद्यकीय अधिकारी | विजाभज | ८०००-२७५-१३५०० |
| ३७ | डॉ. अंजली भालचंद्र पाटील | वैद्यकीय अधिकारी | इमाव | ८०००-२७५-१३५०० |
| ३८ | डॉ. प्रमोद विठ्ठलराव पडवळ | वैद्यकीय अधिकारी | खुला | ८०००-२७५-१३५०० |
| ३९ | डॉ. बाळनाथ दिलीप चकोर | वैद्यकीय अधिकारी | खुला | ८०००-२७५-१३५०० |
| ४० | डॉ. अरविंद हरिश्चंद्र काकडे | वैद्यकीय अधिकारी | खुला | ८०००-२७५-१३५०० |
| ४१ | डॉ. नंदकिशोर रामराव लहाणे | वैद्यकीय अधिकारी | खुला | ८०००-२७५-१३५०० |
| ४२ | श्रीम. ज्योती संतोष सातवे | परिचारिका | अनु.जाती | ५०००-१५०-८००० |
| ४३ | श्रीम. कमल गंगा महाले | परिचारिका | अनु.जमाती | ५०००-१५०-८००० |
| ४४ | श्रीम. भारती भानुदास राऊत | परिचारिका | अनु.जमाती | ५०००-१५०-८००० |
| ४५ | श्रीम. ज्योती देसाई लोहार | परिचारिका | विजाभज | ५०००-१५०-८००० |
| ४६ | श्रीम. मीना राजेश तेरडे | परिचारिका | खुला | ५०००-१५०-८००० |
| ४७ | श्रीम. रसिका राजेंद्र दळवी | परिचारिका | खुला | ५०००-१५०-८००० |
| ४८ | श्रीम. जागृती गणपत वेताळे | परिचारिका | खुला | ५०००-१५०-८००० |
| ४९ | श्रीम. लिटा एलिस करवालो | परिचारिका | खुला | ५०००-१५०-८००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५० | श्रीम. वैशाली रमेश मोरे | फार्मासिस्ट तथा लिपिक | अनु.जाती | ४५००-१२५-७००० |
| ५१ | श्री. सुतार विशाल दिलीप | फार्मासिस्ट तथा लिपिक | अनु.जमाती | ४५००-१२५-७००० |
| ५२ | श्री. ठाकूर प्रसाद रमेश | फार्मासिस्ट तथा लिपिक | अनु.जमाती | ४५००-१२५-७००० |
| ५३ | श्रीम. माधवी गणेश क्षत्रिय | फार्मासिस्ट तथा लिपिक | विजाभज | ४५००-१२५-७००० |
| ५४ | श्री. राहुल गजानन भोईर | फार्मासिस्ट तथा लिपिक | खुला | ४५००-१२५-७००० |
| ५५ | श्री. सचिन महादेव करंडे | फार्मासिस्ट तथा लिपिक | खुला | ४५००-१२५-७००० |
| ५६ | श्री. सुधिर रामभाऊ पावले | फार्मासिस्ट तथा लिपिक | खुला | ४५००-१२५-७००० |
| ५७ | श्री. योगेश चिंतामण शिंदे | फार्मासिस्ट तथा लिपिक | खुला | ४५००-१२५-७००० |
| ५८ | श्रीम. पद्मा साधुजी भोंगाडे | प्रसविका | अनु.जाती | ४०००-१००-६००० |
| ५९ | श्रीम. जयश्री हेमंत वनमाळी | प्रसविका | अनु.जाती | ४०००-१००-६००० |
| ६० | श्रीम. उर्मिला रामू घेगड | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६१ | श्रीम. संध्या रामचंद्र शिंगाडे | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६२ | श्रीम. सरिता देवजी ठाणकर | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६३ | श्रीम. प्रतिभा हिरामण आवारी | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६४ | श्रीम. रेखा श्रावण कुवरा | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६५ | श्रीम. सिता नवश्या चौधरी | प्रसविका | अनु.जमाती | ४०००-१००-६००० |
| ६६ | श्रीम. प्रिया कृष्णा पागधरे | प्रसविका | विमाप्र | ४०००-१००-६००० |
| ६७ | श्रीम. दिप्ती रत्नाकर चिनके | प्रसविका | विजाभज | ४०००-१००-६००० |
| ६८ | श्रीम. ज्योती प्रशांत आंधळे | प्रसविका | विजाभज | ४०००-१००-६००० |
| ६९ | श्रीम. बेबी सुभाष पवार | प्रसविका | विजाभज | ४०००-१००-६००० |
| ७० | श्रीम. मनिषा मनोहर झोरे | प्रसविका | इमाव | ४०००-१००-६००० |
| ७१ | श्रीम. निलीमा शं. मोकल | प्रसविका | इमाव | ४०००-१००-६००० |
| ७२ | श्रीम. चित्रा तुकाराम भोईर | प्रसविका | इमाव | ४०००-१००-६००० |
| ७३ | श्रीम. फरिदा जमीरखान | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७४ | श्रीम. अश्विनी अजित पोतदार | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७५ | श्रीम. सुधा नानु पाटील | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७६ | श्रीम. करुणा भालचंद्र पागधरे | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७७ | श्रीम. सुनिता बाबुराव मोटे | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७८ | श्रीम. जयश्री बाळासाहेब | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ७९ | श्रीम. संदेना सखाराम पवार | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८० | श्रीम. प्रमिला मारुती देसाई | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८१ | श्रीम. जॉयसी जॉन हेन्ड्रीक्स | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८२ | श्रीम. दक्षता शिवराम गमरे | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८३ | श्रीम. रेश्मा बाळकृष्ण शेट्टी | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८४ | श्रीम. स्मिता एलिस करवालो | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८५ | श्रीम. जेन्वी अजय रॉड्रीक्स | प्रसविका | खुला | ४०००-१००-६००० |
| ८६ | श्री. दिनेश रामचंद्र आमनेकर | शिपाई तथा सफाई कामगार | अनु.जाती | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ८७ | श्री. धनगर निवृत्ती नाथु | शिपाई तथा सफाई कामगार | अनु.जमाती | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ८८ | श्री. श्याम गंगाधर बांबळे | शिपाई तथा सफाई कामगार | अनु.जमाती | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८९ | श्री. पवार संतोष रामराव | शिपाई तथा सफाई कामगार | विजाभज | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९० | श्रीम. ललिता पोपटराव मयेड | शिपाई तथा सफाई कामगार | खुला | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९१ | श्री. माधव नागोराव होकार्णे | शिपाई तथा सफाई कामगार | खुला | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९२ | श्री. स्वप्निल प्रकाश गायकवाड | शिपाई तथा सफाई कामगार | खुला | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९३ | श्री. भटू भाऊराव कठरे | शिपाई तथा सफाई कामगार | खुला | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ९४ | शोभा अशोक सातवे | बालवाडी शिक्षिका | अनु.जाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९५ | वीणा वामन सरोदे | बालवाडी शिक्षिका | अनु.जाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९६ | भारती मधुकर मोकाशी | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९७ | भावना शंकर शनवार | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९८ | विजया लक्ष्मण गवळी | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९९ | सविता हिरु लेणे | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०० | संगिता प्रकाश बच्छाव | बालवाडी शिक्षिका | अनु.जमाती | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०१ | सुवर्णा वसंत महागांवकर | बालवाडी शिक्षिका | विजाभज | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०२ | संख्ये दिपीका मनोहर | बालवाडी शिक्षिका | विजाभज | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०३ | संख्ये राजेश्री रजनिकांत | बालवाडी शिक्षिका | विजाभज | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०४ | रंजना हेमंत पाटील | बालवाडी शिक्षिका | विमाप्र | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०५ | अनिता अरुण धुरी | बालवाडी शिक्षिका | इमाव | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०६ | रेखा हेमराज पाटील | बालवाडी शिक्षिका | इमाव | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०७ | संगिता श्रीरंग पाठक | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०८ | ग्लोरीया मनवेल गोन्सालविस | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १०९ | पूनम रामकिशन माली | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११० | सुनिता सुहास लोकेगांवकर | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १११ | शैलजा संतोष म्हात्रे | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११२ | रविंद्रकौर गुरुदेवसिंग बिरदी | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११३ | माधवी विनायक राऊत | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११४ | अलका मदन पाटील | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११५ | वर्षा सतिश तांबे | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११६ | आकांक्षा अरुण सावे | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११७ | भारती अशोक हिंगू | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११८ | कुंदा जयकुमार पाटील | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ११९ | चंचला कैलाश रोहणे | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १२० | जुलेखा शफी शेंदुले | बालवाडी शिक्षिका | खुला | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |

प्रशासनाने गोषवाऱ्यात नमुद केल्यानुसार संगणक विभाग, अपंग अनुशेष भरती, बालवाडी शिक्षिका, आरोग्य विभागातील पदे भरताना व पदोन्नत्या देतांना रितसर पद्धतीने कार्यवाही केल्याने यादीचे अवलोकन करुन सदर नेमणूकांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १४/०६/२००७**

**(दि. ०१/०६/०७ व दि. ०८/०६/०७ रोजीची तहकुब सभा)**

**प्रकरण क्र. ५४ :-** शांतीनगर (मिरा रोड) येथील (शांतीस्टार विकासक वसाहतीतील) पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करून घेणेबाबत.

**ठराव क्र. २५ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत मिरारोड येथे शांतीनगर नावाची वसाहत मे. शांतीस्टार बिल्डर्स यांनी विकसीत केली आहे. सदर संकुलासाठी स्वतःची पाणी पुरवठा योजना शांतीस्टार बिल्डर्स सुमारे २० ते २२ वर्षापासून राबवीत आहे. सदर संकुलासाठी सरासरी ५.०० द.ल.लि. इतका ठोक पाणी पुरवठा शांतीस्टार बिल्डर्सला मनपामार्फत करण्यात येत आहे. सदर ठोक पाणी पुरवठा शांतीस्टार विकासकामार्फत तेथील वसाहतीस वितरीत करण्यात येतो.

शांतीनगर वसाहतीतील वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने तसेच मिरा-भाईदर महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा करावा म्हणून शासनाने वेळोवेळी बैठका होऊन काही ठोस व निर्णायक निर्णय घेऊन शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे दि. ३१/०३/२००४ रोजी मिरा-भाईदर महानगरपालिका व शांतीस्टार विकासक यांच्यामध्ये व्दिपक्षीय करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनाम्यातील अटी क्र. १ नुसार शांतीस्टार विकासकर्त्यांने शांतीनगर येथे ११ लक्ष क्षमतेचे उंच जलकुंभ बांधावयाचा असून त्याचा अंदाजित खर्च ५०-५५ लक्ष असेल व त्यापैकी १०.४० लक्ष इतकी रक्कम मिरा-भाईदर महानगरपालिकेने अदा करावयाची आहे.

सदर जलकुंभाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पुर्णत्वाचा व यशस्वीरित्या हायड्रॉलीक टेस्टींग केल्याचा दाखला महानगरपालिकेस द्यावयाचा आहे व तद्नंतर उंच जलकुंभातील एस्. के. स्टोन ते भाईदर पर्यंतची शांतीनगर वसाहतीची संपूर्ण पाणी पुरवठा योजना सर्व उपांगासहीत सुस्थितीत मिरा-भाईदर महानगरपालिकेत विनामोबदला कायमस्वरूपी हस्तांतरीत करणेत यावे असे करारनाम्यातील अट क्र.३ मध्ये नमुद करण्यात आले आहे.

शांतीस्टार विकासक यांनी संदर्भिय पत्र क्र. १ ने ११ लक्ष उंच- जलकुंभाचे काम पूर्ण झाले असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सदर जलकुंभाची पाहणी करून सदर जलकुंभ पूर्ण झालेला असून चालू करणेबाबत शांतीस्टार बिल्डर्स यांना दिलेल्या पत्रात कळविले आहे. करारनाम्यातील अट क्र. ३ व ५ नुसार शांतीस्टार विकासकर्त्याने संपूर्ण वितरण व्यवस्था सुस्थितीत महानगरपालिकेस विनामोबदला हस्तांतरीत करावयाची आहे.

सद्यस्थितीत शांतीस्टार वसाहतीमध्ये अंदाजे ३३ कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था आहे. त्यामध्ये ८० मि.मी. व्यासाची ते ३०० मि.मी व्यासाच्या जलवाहिन्या आहेत तसेच सदर वसाहतीमध्ये ६६२ इतक्या इमारती असून त्यामध्ये ५२४ एवढया नळजोडण्या आहेत. वितरण व्यवस्थेसाठी शांतीस्टार विकासक यांच्याकडे असलेल्या कर्मचारी वर्गाची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. सय्यद अझर मोहिमुद्दीन | कनिष्ठ अभियंता |
| २ | श्री. दिपक विठ्ठल जाधव | कनिष्ठ अभियंता |
| ३ | श्री. आनंद किसन दाभाडे | लिपीक |
| ४ | श्री. परमेश्वर महादेव गाडे | लिपीक |
| ५ | श्री. गणेश कांतीलाल गोडगे | लिपीक |
| ६ | श्री. विजय मोहन गायकवाड | लिपीक |
| ७ | श्री. नारायण ज्ञानदेव जाधव | सफाई कामगार |
| ८ | श्री. मधुकर पांडु सुर्यवंशी | सफाई कामगार |
| ९ | श्री. सतीश होनावरे | सफाई कामगार |
| १० | श्री. रामदास डोंबरे | सफाई कामगार |
| ११ | श्री. रामनीहार गोस्वामी | सफाई कामगार |
| १२ | श्री. मधुकर बाबुलाल सोनावणे | सफाई कामगार |
| १३ | श्री. भिमराव शंकर शेरे | सफाई कामगार |
| १४ | श्री. रामा कांबळे | सफाई कामगार |
| १५ | श्री. शंकर शिंदे | सफाई कामगार |
| १६ | श्री. बारको दांगडे | सफाई कामगार |
| १७ | श्री. शंकर सातीसप्पा पोतदार | सफाई कामगार |
| १८ | श्री. भागवत गंगा साळवे | सफाई कामगार |
| १९ | श्री. वासुदेव सीताराम धनगेकर | सफाई कामगार |
| २० | श्री. पॅरेलाल श्रीवास्तव | सफाई कामगार |
| २१ | श्री. गणेश रंगडी | सफाई कामगार |
| २२ | श्री. विलास लक्ष्मण गायकवाड | सफाई कामगार |
| २३ | श्री. सचिन उत्तम खरात | सफाई कामगार |
| २४ | श्री. सुरेश भोईर | सफाई कामगार |
| २५ | श्री. फुलबदन जगन्नाथ यादव | सफाई कामगार |
| २६ | श्री. जर्नादन पाटील | सफाई कामगार |
| २७ | श्री. शशीकांत ठाकुर | सफाई कामगार |
| २८ | श्री. भगवान मानकर | सफाई कामगार |
| २९ | श्री. बाबु नामदेव जाधव | सफाई कामगार |

| अ.क्र | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| ३० | श्री सुरेश सरनाप्पा सोनकांबळे | सफाई कामगार |
| ३१ | श्री. महादेव कदम | सफाई कामगार |
| ३२ | श्री. किरण तुकाराम गायकवाड | सफाई कामगार |
| ३३ | श्री. महेश शांताराम तामोरे | सफाई कामगार |
| ३४ | श्री. नागरे ताराचंद दिनकर | सफाई कामगार |
| ३५ | श्री. सिंग अतुल रामदेव | सफाई कामगार |
| ३६ | श्री. विलास रामचंद्र बागड | सफाई कामगार |
| ३७ | श्री. भुषण भागवत अहिरे | सफाई कामगार |
| ३८ | श्री. सुनिल दगडू गागुर्डे | सफाई कामगार |
| ३९ | श्री. माने चिंतामणी महादेव | सफाई कामगार |
| ४० | श्री. महेश बाबूराव डावाले | सफाई कामगार |
| ४१ | श्री. संदीप श्याम सावंत | सफाई कामगार |
| ४२ | श्री. वाघमारे जय विजय | सफाई कामगार |
| ४३ | श्री. मंडगे शिवाजी नारायण | सफाई कामगार |
| ४४ | श्री. तांबोळी इक्बाल गुलाब शेख | सफाई कामगार |
| ४५ | श्री. फारूक अली मेमन | सफाई कामगार |
| ४६ | श्री. भास्कर कृष्णा माने | सफाई कामगार |
| ४७ | श्री. अशोक लक्ष्मन माने | सफाई कामगार |
| ४८ | श्री. विलास दिनकर धिवर | सफाई कामगार |
| ४९ | श्री. विनोद गंगाधर जमदाडे | सफाई कामगार |
| ५० | श्री. मंगेश हरेश्वर राऊत | सफाई कामगार |
| ५१ | श्री. संतोष माणिक खरटमोल | सफाई कामगार |
| ५२ | श्री. हेमंत गोरेकर | सफाई कामगार |
| ५३ | श्री. जयेश कमळाकर म्हात्रे | सफाई कामगार |
| ५४ | श्री. भरत यशवंत म्हात्रे | सफाई कामगार |
| ५५ | श्री. विजय शिवाजी पाटील | सफाई कामगार |
| ५६ | श्री. भुषण अनंत पाटील | सफाई कामगार |
| ५७ | श्री. देवेंद्र वसंत मोरे | सफाई कामगार |
| ५८ | श्री. अर्जुन जयसिंग गायकवाड | सफाई कामगार |
| ५९ | श्री. विलास श्रीपती टेळे | सफाई कामगार |
| ६० | श्री. भैरव भिमा नाईक | सफाई कामगार |
| ६१ | श्री. राजेंद्र केशव नाईक | सफाई कामगार |
| ६२ | श्री. सचिन संगीत साळुंखे | सफाई कामगार |
| ६३ | जसिता सायमन पाटील | सफाई कामगार |
| ६४ | श्री. अजय रामचंद्र पाटील | सफाई कामगार |
| ६५ | श्री. विजय प्रकाश पाटील | सफाई कामगार |
| ६६ | श्री. संतोष परब | सफाई कामगार |
| ६७ | श्री. प्रशांत बळवंत पाटील | सफाई कामगार |
| ६८ | श्री. संदिप दत्तात्रेय मोरे | सफाई कामगार |
| ६९ | श्री. योगेश मोहन गायकवाड | सफाई कामगार |

संपूर्ण वितरण व्यवस्था महागनरपालिकेकडे हस्तांतरीत करावयाची असल्यास कर्मचारी वर्गही महानगरपालिकेत समाविष्ट करून घ्यावा लागेल. तसेच शांतीस्टार मध्ये सर्वच इमारतीमध्ये भूमीगत टाक्या आढळून

आलेल्या नाहीत. वसाहतीमधील या इमारतींना भुमिगत टाक्या नाहीत त्यांना भुमिगत टाक्या बांधणे बंधनकारक करावे लागणार आहे. तसेच इमारतींना १" व्यासाच्या नळ जोडण्या दिसून येत आहेत, तसेच इमारतीला असलेल्या नळजोडणीची मीटर रिडींगप्रमाणे बिल काढण्यासाठी आपल्या दप्तरी नोंद घ्यावी लागणार आहे.

मनपा आस्थापनेवर रिक्त असलेल्या पदावर त्या पदाच्या वेतनश्रेणीवर सामाविष्ट करून घेण्यास ही सभा मंजुरी देत आहे. याकामी येण्याऱ्या खर्चासही ही सभा मंजुरी देत आहे तसेच कायम कर्मचाऱ्याप्रमाणे देण्यात येणारे सर्व फायदे व सुविधा त्यांना देण्यास ही सभा मान्यता देत आहे तसेच मनपाने पाणी पुरवठा वितरणा संबंधी जे धोरण ठरवले असेल ते या विभागास लागू करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

ठराव वाचून कायम करण्यात आला.

सुचक श्री. ट्रेव्ह बोर्जीस

अनुमोदक श्री. चंद्रकांत मोदी

पिठासन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १४/०६/२००७
## (दि.१/६/२००७ व दि. ८/६/२००७ ची तहकुब)

**प्रकरण क्र. ५५ :-** श्री. सुर्यकांत दातीर (लिपिक) यांना पूर्वलक्षी प्रभावाने सेवेत कायम करणे बाबत.

**ठराव क्र. २६ :-**

तत्कालीन नगरपालिकेत १ फेब्रुवारी १९८६ पासून जकात विभाग सुरू करण्यात आला त्यावेळी लिपिक कर्मचारी वर्ग कमी होता. त्या कमी कर्मचाऱ्यांकडून नगरपालिका जास्त वेळ काम करून घेत असे. दरम्यान दि. १७/३/१९८७ व दि. ४/५/१९८८ रोजीचे आदेशान्वये लिपिक पदांना शासनाकडून मंजुरी मिळाल्यामुळे नगरपालिकेने जकात विभागासाठी आवश्यकता असल्यामुळे लिपिक पदे तातडीने भरण्याचे ठरविले. परंतू सन १९८८ मध्ये लिपिक पदे नगरपालिकेने भरावयाची असल्यास प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ त्यावेळी नव्याने अस्तित्वात आलेले असल्यामुळे त्यांचेकडून यादी मागवून लिपिक पदे भरणे अपेक्षित होते. परंतु, जकात विभागासाठी लिपिक कर्मचारी तातडीने भरणे आवश्यक असल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून सेवायोजन कार्यालयाकडून लिपिक पदाच्या उमेदवारांची यादी मागवून उमेदवाराची मुलाखतीद्वारे निवड करून निवड केलेल्या लिपिकांची तात्पुरता नेमणूकीने पदे भरण्यात आली. त्यात एकुण २० लिपिक होते. त्यापैकी श्री. दातीर यांना आदेश क्र. ८८०/८८-८९ दि. ३०/५/१९८८ अन्वये लिपिक पदावर नेमणूक करण्यात आली होती. त्या आदेशानुसार दि.८/६/१९८८ पासुन श्री. दातीर हे लिपिक पदावर रूजू झाले होते. श्री. दातीर व अन्य लिपिक यांना दिलेल्या आदेशात विभागीय निवड मंडळाकडून पात्र उमेदवारांची यादी प्राप्त झालेनंतर नेमणूक रद्द समजण्यात येईल असे स्पष्ट आदेशात नमुद केले होते. त्यामुळे श्री. दातीर व अन्य लिपिक यांची नेमणूक ही तात्पुरती लिपिक पदावर असल्यामुळे त्यांना सहा महिन्याची प्रथम नेमणूक देण्यात येउन विभागीय निवड मंडळाकडून उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे व नगरपालिकेस जकात विभागासाठी लिपिकाची आवश्यकता असल्याने सहा महिन्यांनी काही वेळा तीन महिन्यांनी त्यांना तांत्रिक एक ते दोन दिवसाचा सेवा खंड करून पुन्हा कामावर ठेवून घेण्यात येत असे.

अशाप्रकारे त्यांना माहे सप्टेंबर - ९० पर्यंत त्यांची सेवाखंडीत करून कामावर ठेवून घेण्यात येत होते. परंतु, सदर कर्मचारी यांनी एकाच कॅलेंडर वर्षात २४० दिवस भरल्याने व डिसेंबर - ९० मध्ये पुन्हा सेवा खंड नगरपालिका देणार या अपेक्षेने संभाव्य सेवाखंड देण्यापूर्वी श्री. दातीर व अन्य लिपिक यांनी सेवेत कायम होण्याच्या दृष्टीने मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांचेकडून नगरपालिकेने सेवाखंड करू नये म्हणून स्थगिती आदेश प्राप्त केला. त्यानंतर लिपिकांना न्यायालयाचे आदेशाप्रमाणे सेवाखंड देणे नगरपालिकेने बंद केले. दरम्यान श्री. सुर्यकांत दातीर यांनी नगरपालिकेची रितसर परवानगी घेउन मा. प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, कोकण भुवन, नवि मुंबई यांचे कडील परिक्षा उत्तीर्ण केली. परिक्षा उत्तीर्ण केल्यामुळे त्यांना नगरपालिका सेवेत कायम करावे अशी श्री. दातीर यांनी विनंती केली. परंतु, श्री. दातीर यांचा दावा औद्योगिक न्यायालयात प्रलंबित होता. दावा औद्योगिक न्यायालयात असल्यामुळे तो त्यांनी प्रथम मागे घ्यावा असे तत्कालीन नगरपालिकेने कायम करण्यापूर्वी अट घातल्यामुळे दि.६/९/१९९१ रोजी श्री. दातीर यांनी वैयक्तीक दावा मागे घेतल्यानंतर श्री. दातीर यांना लिपिक पदावर दि.८/१/१९९३ पासून रूजू करून घेतले आहे. श्री. दातीर यांना लिपिक पदावर दि.८/१/१९९३ पासून रूजू करून घेतले. परंतु, दि.८/६/१९८८ चे आदेशातील अटीशर्तीनुसार नगरपालिकेत निवड मंडळाची परिक्षा उत्तीर्ण केल्यामुळे दि. ८/६/१९८८ पासून म्हणजेच प्रथम नेमणूकीच्या दिनांकापासून कायम करणेत यावे यासाठी मा. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचे जवळ विनंती अर्ज केला होता. त्या अर्जास अनुसरून मा. उप संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचेकडील

दि.३/९/१९९६ रोजीचे प्राप्त पत्रानुसार श्री. सुर्यकांत दातीर यांना दि. ८/६/१९८८ या प्रथम नेमणूकीचे दिनांकापासून सेवेत कायम करणेबाबत नगरपालिका तयार असल्यास तसा ठराव पारित करून पाठविण्यास कळविले होते. त्यानुसार श्री. दातीर यांना सेवेत पुर्वलक्षी प्रभावाने कायम करणेबाबत तत्कालीन नगरपालिकेच्या मा. स्थायी समिती सभा दि. २६/११/१९९७ ठराव क्र.९७ अन्वये प्रस्ताव मा. कौन्सीलचे मंजूरीने पाठविण्यास मंजूरी दिली होती. दरम्यान नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम सुरू असल्याने सभा होण्यास विलंब होणार असल्याने निवडणूकीनंतर होणाऱ्या सभेस विषय घेउन पारित ठरावानुसार विहित नमुन्यात प्रस्ताव पाठविण्यांत येईल. असे दि. २६/१२/१९९६ रोजी मा. संचालक, नगरपालिका प्रशासन, संचलनालय, मुंबई यांना कळविले होते. परंतू, अद्याप तसा ठराव पारित न झाल्याने प्रस्ताव पाठविला नाही. त्यामुळे त्यांचे प्रकरण अद्याप प्रलंबित आहे.

श्री. दातीर यांचे प्रमाणेच सन १९८८ पासून लिपिक पदावर नगरपालिकेत तात्पूरते काम करणारे अविनाश जाधव हे श्री. दातीर व अन्य लिपिक मा. औद्योगिक न्यायालयात जाण्यापुर्वी हंगामी स्वरूपात कामावर होते. परंतू, श्री. जाधव नोव्हेंबर १९९० अखेर दुय्यम सेवा निवड मंडळाची परिक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांना न्यायालयात जाणेची आवश्यकता भासली नाही. तत्पुर्वी त्यांना दि.१/१२/१९९० पासून लिपिक या पदावर नगरपालिकेने प्रथम हजर करून घेतले. त्यानंतर त्यांनी केलेल्या अर्जानुसार त्यांना तत्कालीन नगरपालिकेने ठराव पारित करून मा. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे पारित ठरावास अनुसरून केलेल्या पत्र व्यवहाराचे अनुषंगाने दि. २९/९/१९९८ रोजी पत्राने मा. संचालक, नगरपालिका प्रशासन, संचालनालय, मुंबई यांनी पुर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच श्री. अविनाश जाधव यांना प्रथम नेमणूकीचे दिनांकापासून (दि.१/९/१९८८) कायम नेमणूक देण्यांस मंजूरी दिली. ज्याप्रमाणे श्री. जाधव यांना नगरपालिकेने नेमणूक व सेवाजेष्ठता दिलेली आहे. त्याप्रमाणे तुलना करता श्री. जाधव व श्री. दतीर योचे नेमणूकीबाबत वस्तुस्थिती सारखी आहे. परंतू, श्री. दातीर यांनी यापूर्वी मागणी करून सुद्धा सेवाजेष्ठता दिलेली नाही. त्यांना सेवाजेष्ठता न दिल्याने त्यांनी २००३ रोजी प्रसिद्ध प्रारूप सेवाजेष्ठता यादीस आक्षेप घेतला होता. त्या आक्षेपाचे अनुषंगाने तात्कालीन आयुक्त सो., यांनी मा. आयुक्त सो., यांनी श्री. दातीर व श्री. अविनाश जाधव यांचे नेमणूकीबाबत तुलना करता प्रकरण सारखेच असल्यामुळे श्री. दातीर यांचेवर अन्याय झाल्याचे दिसून येत असून ह्या प्रकरणी श्री. दातीर यांना कोणत्याही प्रकारे थकीत रकमेचा फरक न देता, सेवाजेष्ठता बाबत प्रकरण मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरीता ठेवावे असे निर्देश दिलेले होते. त्यानुसार उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता श्री. दातीर यांचेवर सेवाजेष्ठता अन्याय झाल्याचे दिसुन येत असून त्यांची नमणूक ही वेतनश्रेणीवर असल्याने व प्रथम ओदशातील अटीशर्तीची पुर्तता त्यांनी केलेली असून श्री. दातीर व जाधव यांची नगरपालिका प्रशासन, मुंबई यांनी दिलेल्या प्रथम नेमणूकीच्या आदेशाप्रमाणेच श्री. सुर्यकांत दातीर, लिपिक यांना प्रथम नेमणूकीच्या म्हणजेच दि.८/६/१९८८ पासून नेमणूक देउन, त्याप्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने त्यांची वेतन निश्चिती करून रक्कम देय फरकासह व सेवाजेष्ठतेसह सेवालाभ देण्यास तसेच मा. महासभा दि. २१/१२/२००६ रोजीचा ठराव क्र. ७९ नुसार ५३८ कर्मचाऱ्यांना दि. १/३/१९९३ पासुन सेवाजेष्ठतेबाबतचा पारित करण्यात आला होता. या ठरावावर देखिल कार्यवाही करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्रीम. शुभांगी नाईक.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(५२)

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा
## दि.१४/०६/२००७

**विषय क्र.(५६) :- मिरा भाईदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या उपआयुक्त पदाचा अनुषेश भरणे करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूचित प्रकरण २ नियम १ (ज)अन्वये प्रस्ताव घेणे बाबत.**

**ठराव क्र. २७ :-**

मिरा भाईदर महानगरपालिकच्या आस्थापनेवर शासन निर्णय क्र एम.बी.एम.सी/२०००/१७७३/प्र.क १६३/नवी-२५/दि.३१ ऑक्टोबर २००२ अन्वये. "उपआयुक्त" या पदनामाची रू. ८०००/१३५०० या वेतन श्रेणीतील ०३ पदे मंजूर आहेत. त्यातील एक पद अनुसूचित जातीतील उमेदवाराकरीता राखीव आहे. आज पर्यंत रिक्त असलेल्या "उपायुक्त" पदाचा अनुषेश भरलेला नाही. म्हणून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांनी रिक्त पदाचा मुद्दा उपस्थित करून त्वरीत "उपआयुक्त" या रिक्त पदावर अनुसूचित जातीतील कर्मचाऱ्याची नेमणूक देण्यांचे निर्देश मा.आयुक्त मिरा भाईदर महानगरपालिका यांना दिला आहे.

३१ ऑक्टोबर २००२ च्या परिपत्रकानुसांर एकूण ३ उपायुक्त पदावर शासन सेवेतून प्रतिनियुक्तीने आलेले दोन उपायुक्त आहेत व अनुसूचित जातीकरीता राखीव असलेल्या उपायुक्त पदावर खुल्या वर्गातील सरळ सेवेत पद भरले आहे.

मिरा भाईदर महानगरपालिकेचे वर्गीकरण "ड" वर्गात झालेले असल्याने उपायुक्त संवर्गातील फक्त दोनच पदे अनूदेय आहेत. त्यात एक पद शासन सेवेतील प्रतिनियुक्तीचे भरावयाचें आहे. व एक पद अनुसूचित जातीकरीता राखीव आहे. महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांनी निर्देश केल्याप्रमाणे अनुसूचित जातीकरीता राखीव असलेले उपायुक्त पद भरण्याकरीता आपण खुल्या वर्गातील उपायुक्त म्हणून सरळ सेवेने केलेली नेमणूक चुकीची झाल्याचे दिसून येते. त्यामुळे आपण खुल्या वर्गातील उपायुक्त म्हणून सरळ सेवेने केलेली नेमणूक दि. ४ मे २००६ रोजीच्या शासन निर्णय आकृतीबंधाप्रमाणे त्यांची नमेणूक "ड" वर्गातील महापालिकेच्या समान वेतनश्रेणी ८०००/१३५०० च्या पशुशल्यचिकित्सक या पदावर करावी जेणे करून खुल्या वर्गातील सरळ सेवेने नमेणूक केलेल्या अधिकाऱ्यांवर अन्याय होणार नाही. त्यामुळे अनुसूचित जातीकरीता राखीव असलेले उपायुक्त हे पद रिक्त होईल.

रिक्त झालेल्या उपायुक्त या पदावर मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या आस्थापने वरील अनुसूचित जातीच्या वर्ग – २, च्या अधिकाऱ्यामधून ज्याचा कार्यकाल एक वर्षापेक्षा जास्त झाला आहे. व शैक्षणिक पात्रता पदवीधर व एल.जी.एस. परिक्षा प्रथम उत्तीर्ण असले तसेच मागील तीन वर्षाचा गापेनिय अहवाल तपासून त्वरीत पदोन्नती देण्यांत ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे तसेच मा. सचिव साहेबांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९९४ अनुसूचित प्रकरण क्र. २ नियम -१, प्रारूप नियम २००२ कलम(न-ब) अन्वये कारवाई करून त्वरीत अंमलबजावणी होणेस हि सभा मंजुरी देत आहे.
तसेच उपायुक्त संवर्गातील जुनी तीन पदे व एक नवीन पद निर्मितीस मंजुरी देण्यात येत आहे.

सूचक:- (सौ. ज्योत्स्ना हसनाळे)

अनुमोदक:- (सौ जेन्वी अल्मेडा)

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १४/०६/२००७

**प्रकरण क्र. ५७ :-** सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांचे दिनांक २८/०५/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ नुसार विकास योजना मंजुर झाल्यापासून दहा वर्षाच्या आत आरक्षणाची जागा ताब्यात न घेतल्याने आरक्षण व्यपगत झाल्यास कारवाई होणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. २८ :-**

मी असा ठराव मांडतो की जी राहिलेली आरक्षणे आहेत. महापालिकेने त्यांच्या कायद्यातील योजने अंर्तगत बसत असतील तर ती आरक्षणे लवकरात लवकर ताब्यात घ्यावीत. त्याचा विकास करावा. त्या विकासामार्फेत महिपालिकेचे उत्पन्न वाढावे म्हणुन ही जी राहिलेली आरक्षणे आहेत. ती महापालिकेने ताब्यात घ्यावीत असा मी ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदक :- सौ. शुभांगी नाईक.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

पाने १ ते ७०

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय : मा. महासभा मूळ ठराव
सन - २००७/२००८
नविन बॉडी

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. २८/०८/२००७

**प्रकरण क्र. ०१:-** मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक माहे ऑगस्ट २००७ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे '' महापौर '' पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे.

ठराव क्र. ०१ :- दिनांक :- २८/०८/२००७

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी दोन उमेदवार शिल्लक राहीले. ते १) श्री. मेहता नरेंद्र एल. व २) श्री. वैती चंद्रकांत सिताराम.

श्री. मेहता नरेंद्र एल यांच्या बाजूने उपस्थित सदस्यांपैकी एकूण ४१ सदस्यांनी हात वर करून मतदान केले.

श्री. वैती चंद्रकांत सिताराम यांच्या बाजूने उपस्थित सदस्यांपैकी एकूण ३८ सदस्यांनी हात वर करून मतदान केले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) मधील तरतुदीनुसार मी पिठासिन अधिकारी तथा विभागीय आयुक्त कोकण विभाग श्री. मेहता नरेंद्र एल. यांची महापौर पदी बहूमताने निवड झाल्याचे घोषित करीत आहे.

पिठासिन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. २८/०८/२००७

**प्रकरण क्र. ०२:-** **मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक माहे ऑगस्ट २००७ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे '' उपमहापौर '' पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे.**

**ठराव क्र. ०२ :-** दिनांक :- २८/०८/२००७

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदासाठी दोन उमेदवार शिल्लक राहीले. ते १) श्री. कुरेशी याकुब इस्माईल व २) श्री. मेंन्डोन्सा स्टिव्हन जॉन.

श्री. कुरेशी याकुब इस्माईल यांच्या बाजूने उपस्थित सदस्यांपैकी एकूण ३९ सदस्यांनी हात वर करून मतदान केले.

श्री. मेंन्डोन्सा स्टिव्हन जॉन यांच्या बाजूने उपस्थित सदस्यांपैकी एकूण ४० सदस्यांनी हात वर करून मतदान केले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) मधील तरतुदीनुसार मी पिठासिन अधिकारी तथा विभागीय आयुक्त कोकण विभाग श्री. मेंन्डोन्सा स्टिव्हन जॉन यांची उपमहापौर पदी बहूमताने निवड झाल्याचे घोषित करीत आहे.

(स्वाक्षरी) 28/08/07

पिठासिन अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/१०/२००७

**अभिनंदन ठराव ०३ :-**

आपल्या देशाला स्वतंत्र्य मिळून ६० वर्ष पुर्ण झाली. लोकशाही देशात उशीरा का होई ना पण तेरावे राष्ट्रपती म्हणून एका महिलेला संधी मिळाली. महाराष्ट्र राज्यात जन्मलेल्या प्रतिभाताई पाटील यांची सर्वोच्च पदावर निवड झाल्याबाबत देशातल्या प्रत्येक महिलेला अभिमान व गौरव आहे.

महिलांना समृद्ध करून व त्यांना संधी देउन देशाला प्रगतीपथावर नेण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. देशात असंख्य महिला शक्ती उभी ठाकली आहे. तिच्यावर लक्ष केंद्रीत करून देशाला सर्वांगसुंदर बनविण्यासाठी त्यांचा उपयोग करून घेणेदेखिल गरजेचे आहे.

मिरा भाईंदर येथील सर्व जनतेच्या वतीने विशेष करून महिलांच्यावतीने मी त्यांना मनःपुर्वक शुभेच्छा देत आहे असे अभिनंदनाचा ठराव ठेवत आहे.

**सुचक :- श्रीम. नयना म्हात्रे.** **अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १७/१०/२००७

**प्रकरण क्र. ०३ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

**ठराव क्र. ०४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. निवडणूक २००७ मध्ये एकूण ७९ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले आहेत. महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती मान्यताप्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक पक्षबळ विचारात घेउन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळावर स्थायी समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. संयुक्त लोकशाही आघाडी - ०८
२. भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस - ०५
३. भारतीय जनता पार्टी - ०२
४. शिवसेना - ०१

याप्रमाणे स्थायी समितीवर खालील १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. शानु गोहिल | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्रीम. सुनिता कैलास पाटील | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | ॲड. शफिक अहमद सादत खान | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तात्रेय | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ८. | श्री. म्हात्रे मिलन वसंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ९. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्री. पाटील शरद केशव | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्री. पालांडे प्रशांत भगवंतराव | शिवसेना |
| १२. | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकुर | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १३. | श्री. टेरी परेरा | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १४. | श्रीम. जोत्स्ना हसनाळे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १५. | श्री. भोईर राजू | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १६. | श्री. ध्रुवकिशोर पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. महासभा दि. १८/१०/२००७.

(६)

प्रकरण क्र. ४

**विषय:- मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करणेबाबत.**

ठराव ०५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक १२.०८.२००७ रोजी होऊन नव्याने महानगरपालिका अस्तित्त्वात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० मधील तरतुदीनुसार नव्याने विशेष समित्यांच्या नेमणूका करावयाच्या आहेत. प्रकरण क्र. ४ नुसार महिला व बालकल्याण समिती गठित करावयाची आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने यापुर्वी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची २ मधील कामकाजविषयक नियमात सुधारणा करून नवीन प्रारूप नियम तयार केले होते. या प्रारूप नियमाच्या नियम क्र. ४ (ब) नुसार महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची संख्या ९ ठरविली होती. परंतु नियम ४ (क) नुसार महिला बाल कल्याण समितीची रचना व मुदती संदर्भात ठराव करण्यास महासभेच्या अधिकारास बाधा आणलेली नाही. सदरचे नियम प्रारुप नियम असून, त्यास अजून अंतिम मंजूरी दिलेली नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (७) नुसार महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल अशी तरतूद आहे.

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सदर समितीची सदस्य संख्या ९ दर्शविण्यात आली आहे. सदर संख्येबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार अशाप्रकारे अशी कोणतीही विशिष्ट संख्येची नोंद कायद्यामध्ये नाही. याउलट कलम ३०(७) नुसार महासभेस सदर समितीची रचना कोणत्याही वेळेस बदलता येईल अशा तरतुद आहे. त्यामुळे सदर गोषवारा चुकीचा असल्याने तो फेटाळण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मागील ५ वर्षात गठित केलेल्या महिला व बालकल्याण समितीचे कायदेशीर विसर्जन झाल्यामुळे ती समिती पुन्हा नव्याने गठित करणे व तिची पुनर्रचना करणेबाबतचा विषय आजच्या महासभेपुढे ठेवण्यात आला आहे.

ज्या अर्थी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) नुसार वरील समितीचे नेमणूक करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत असे नमूद केले आहे, त्या अर्थी हे अधिकार महासभेचे आहेत.

महिला व बालकल्याण समितीमध्ये महानगरपालिकेतील गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांची नामनिर्देशन करण्याची तरतुद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) चा (१) मध्ये केलेली आहे. तसेच कलम ३१ (अ) चा (३) अन्वये पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत मा. महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल असे नमूद केले आहे.

महानगरपालिकेत संयुक्त लोकशाही आघाडी गटाचे ४०, राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे २५, भारतीय जनता पक्षाचे ९, शिवसेनेचे ५ असे संख्या बळाबळ आहे.

महिला व बालकल्याण समिती गठित करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० (१अ) अन्वये त्यामध्ये किमान ७५% महिला पालिका सदस्या असाव्यात अशी तरतुद आहे. याचा अर्थ महिला पालिका सदस्यांची संख्या कमाल १०० % असू शकते.

वर्तमान स्थितीत महिलांना ३३ टक्के आरक्षण असल्यामुळे एकूण ७९ सदस्य संख्येच्या ३३% म्हणजे २७ महिला निवडून आल्या आहेत. साधारण प्रभागातून ६ महिला सदस्या अशाप्रकारे एकूण ३३ महिला पालिका सदस्या निवडून आलेल्या आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१अ) व (७) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीची नव्याने रचना करण्यात येऊन त्यामध्ये कमाल १०० % महिलांची नेमणूक करण्यात येत आहे व एकूण सदस्यांची संख्या २१ करण्यात येत आहे. असा ठराव मांडण्यात येत आहे.

N.B. Samle

सदरचा ठराव प्रशासनाने शासनाकडे पाठवावे व त्याची रीतसर मंजूरी घ्यावी N.G.M.
आणी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक
(सौ. निर्मला सावळे)

अनुमोदक
(सौ. नयना ग. म्हात्रे)

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

6

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १७/१०/२००७

**प्रकरण क्र. ५ :-** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ०६ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. संयुक्त लोकशाही आघाडी - ०७

२. भारतीय राष्ट्रवादी कॉंग्रेस - ०४

३. भारतीय जनता पार्टी - ०१

४. शिवसेना - ०१

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. शशिकांत भोईर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. मिलन वसंत म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्री. मधुसुधन पुरोहीत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्रीम. कंचन पुजारी | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. नयना गजानन म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. हरिश्चंद्र म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्री. झुबेर इनामदार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ८. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | शिवसेना |
| ९. | श्री. मिलन गोविंदराव पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १०. | सौ. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ११. | सौ. हेमा रविंद्र माळी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १२. | सौ. वंदना मंगेश पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १३. | सौ. पांडे स्नेहा शैलेश | भारतीय जनता पार्टी |

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १७/१०/२००७

7

**प्रकरण क्र. ०६ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत चार प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

**ठराव क्र ०७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) (१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील संलग्न असलेल्या प्रभांगाच्या प्रभाग समित्या गठित करण्याचे अधिकार महानगरपालिकेस म्हणजेच मा. महासभेस दिलेले आहेत. कलम २९ अ (१) मध्ये दिलेल्या सुचीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्यांची संख्या निश्चित केलेली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ५,२०,३०१ असल्याने २९ अ (१) च्या सुचीनुसार ४ प्रभाग समित्या स्थापन करावायच्या आहेत. प्रभाग समित्या स्थापन करताना प्रत्येक समितीमध्ये समाविष्ट होणाऱ्या व एकमेकाशी संलग्न असणाऱ्या प्रभागांना एकत्रित करुन भौगोलिकदृष्टया सोयीस्कर व जवळपास समान लोकसंख्या असलेल्या एकत्रित प्रभागांच्या समित्या गठित करावयाच्या आहेत.

भाईंदर (पश्चिम) व मिरारोड (पश्चिम) विभागात लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार १,४८,४३२ इतकी असून, या विभागासाठी १ प्रभाग समिती गठित करता येईल.

भाईंदर (पूर्व), मिरारोड (पूर्व) तसेच काशीमिरा गावठण लक्ष्मीबाग, घोडबंदर, चेणे वर्सोवा, काजूपाडा या सर्व विभागांची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ३,७१,८६९ असून या विभागांना एकूण ३ प्रभाग समित्या गठित करता येतील.

वरीलप्रमाणे ३ प्रभाग समित्या गठित करताना प्रत्येक प्रभाग समितीस सरासरी १,२३,९५६ इतकी लोकसंख्या धरुन त्यानुसार संलग्न असलेल्या प्रभागांची प्रभाग समिती गठित करणे आवश्यक आहे. सन २००१ ची जनगणना करीत असताना तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेचे एकूण ४७ वॉर्ड अस्तित्वात होते. अशा १ ते ४७ वॉर्डांचे वार्डनिहाय जनगणनेची आकडेवारी उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक वार्डाच्या हद्दी निश्चित केलेल्या असून त्याची माहिती प्रशासनाकडे उपलब्ध आहे.

सार्वत्रिक निवडणुकीसाठी नवीन प्रभाग रचना करताना जनगणनेची आकडेवारी विचारात घेउन आकडेवारी सम प्रमाणात ठेवून प्रभागरचना केली जाते. अशा आकडेवारीतील तफावत ही त्या प्रभागातील लोकसंख्येच्या १०% पेक्षा कमी किंवा जास्त प्रमाणात असता कामा नये. परंतु ही बाब भौगोलिकदृष्टया मोठया प्रमाणात बदल होत असल्यास किंवा नैसर्गिक हद्दीस बाधा येत असल्यास लागू होत नाही.

प्रशासनाने प्रभाग समित्यांची रचना स्थापन करणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवला आहे. सदर प्रस्तावाचे अवलोकन करता असे स्पष्ट दिसून येते की, प्रभाग समिती क्र. ३ व ४ ची रचना करतांना सदर प्रभाग समितीमध्ये समाविष्ट होणाऱ्या प्रभागांची सन २००१ च्या जनगणनेनुसार होणारी लोकसंख्या विचारात घेतलेली नाही. त्यामुळे प्रभाग क्र. ३ व प्रभाग क्र. ४ ची लोकसंख्या सन २००१ च्या लोकसंख्येच्या तुलनेत विषम प्रमाणात आहे. त्यामुळे ही सभा प्रशासनाच्या गोषवाऱ्यानुसार मा. महासभेपुढे आलेल्या प्रस्तावामध्ये दुरुस्ती सुचवीत आहे.

भाईंदर पश्चिम व मिरारोड पश्चिमेकडील सर्व प्रभागांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. भाईंदर- पूर्वेकडील संलग्न प्रभागांसाठी व सरासरी लोकसंख्येच्या जवळपास असलेल्या लोकसंख्येसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. मिरा रोड पूर्वेकडील काही प्रभागांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. भाईंदर-पूर्व येथील उर्वरित, मिरा रोड येथील उर्वरित व काशी, मिरा गावठण, घोडबंदर, चेणे, वर्सोवा, काजूपाडा या क्षेत्रांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे समित्या गठित केल्याने त्या समित्यांची भौगोलिकदृष्टया व नैसर्गिक हद्दीची रचना न बदलता तसेच प्रभाग समितीमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रभागाच्या हद्दी कलम २९ अ (१) च्या अन्वये संलग्न असतील.

खालीलप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणे कायदेशीर व रचनात्मकदृष्टया योग्य आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्र. | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणुक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | १ | १, २, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९ | २२ |
| २ | २ | ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १४, १५, १६, १७, १८, १९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४७, ४८, ४९ | २३ |
| ३ | ३ | १२, १३, ४५, ४६, ५१, ६१, ६३, ६४, ६८, ६९, ७०, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९ | १९ |
| ४ | ४ | ५०, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६२, ६५, ६६, ६७, ७१ | १५ |

वरीलप्रमाणे प्रभाग समित्यांच्या रचनेमध्ये केलेल्या दुरुस्तीस ही सभा मान्यता देत आहे. असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव बहुमताने मंजुर**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी ज्या ठरावाचे वाचन केले आहे आणि अनुमोदक व सुचक दिलेले आहे. त्या ठरावास मंजुरी देत आहे आणि जी दुरुस्तीस अनुमोदक न दिल्याने ती फेटाळत आहे.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

९

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/१०/२००७

**प्रकरण क्र. ०७ :-** परिवहन समितीमधील एक पद (सदस्या सौ. सुनिता पाटील) रिक्त झाल्यामुळे त्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(५) चा पोटकलम ३ अन्वये उर्वरित कालावधीसाठी एका सदस्याची निवड करणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन समिती यापुर्वीच गठीत करण्यात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ (५) नुसार महानगरपालिकेने नेमणूक केलेल्या परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य प्रत्येक दुसऱ्या वर्षी पोटकलम २ मध्ये निर्दिष्ट केलेली सभा ज्या महिन्यात भरली असेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस निवृत्त करणेची तरतुद आहे. परंतु, पोटकलम ३ मध्ये परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या सदस्यांपैकी पालिका सदस्याच्या बाबतीत त्याच्या निवृत्तीच्या तारखेपुर्वी कोणत्याही वेळी तो पालिका सदस्य असल्याचे बंद होईल तर तो परिवहन समितीचा सदस्य असल्याचे बंद होईल अशी तरतुद आहे. परिवहन समिती सदस्यांपैकी सौ. सुनिता कैलास पाटील यांची पालिका सदस्य म्हणून मुदत संपल्याने त्यांच्या जागी नविन सदस्य नेमणूक होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलानिक पध्दतीनुसार गटनिहाय प्रत्येक गटाच्या संख्येचा तौलनिक संख्याबळातुन अपुर्णांकाच्या आधारे संयुक्त लोकशाही आघाडी प्रथम क्रमांकावर असल्याने परिवहन सदस्य पद हे संयुक्त लोकशाही आघाडी मार्फत नेमणूक होणेस प्रस्तावित आहे.

याप्रमाणे परिवहन समितीवर **श्री. रतीन दत्ता** (संयुक्त लोकशाही आघाडी) यांची रिक्त झालेल्या जागी उर्वरित कालावधीसाठी नियुक्ती करण्यांत येत आहे.

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/१०/२००७

**प्रकरण क्र. ०७ :-** परिवहन समितीमधील एक पद (सदस्या सौ. सुनिता पाटील) रिक्त झाल्यामुळे त्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(५) चा पोटकलम ३ अन्वये उर्वरित कालावधीसाठी एका सदस्याची निवड करणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन समिती यापुर्वीच गठीत करण्यात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ (५) नुसार महानगरपालिकेने नेमणूक केलेल्या परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य प्रत्येक दुसऱ्या वर्षी पोटकलम २ मध्ये निर्दिष्ट केलेली सभा ज्या महिन्यात भरली असेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस निवृत्त करणेची तरतुद आहे. परंतु, पोटकलम ३ मध्ये परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या सदस्यांपैकी पालिका सदस्याच्या बाबतीत त्याच्या निवृत्तीच्या तारखेपुर्वी कोणत्याही वेळी तो पालिका सदस्य असल्याचे बंद होईल तर तो परिवहन समितीचा सदस्य असल्याचे बंद होईल अशी तरतुद आहे. परिवहन समिती सदस्यांपैकी सौ. सुनिता कैलास पाटील यांची पालिका सदस्य म्हणून मुदत संपल्याने त्यांच्या जागी नविन सदस्य नेमणूक होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलानिक पध्दतीनुसार गटनिहाय प्रत्येक गटाच्या संख्येचा तौलनिक संख्याबळातुन अपुर्णांकाच्या आधारे संयुक्त लोकशाही आघाडी प्रथम क्रमांकावर असल्याने परिवहन सदस्य पद हे संयुक्त लोकशाही आघाडी मार्फत नेमणूक होणेस प्रस्तावित आहे.

याप्रमाणे परिवहन समितीवर **श्री. रतीन दत्ता** (संयुक्त लोकशाही आघाडी) यांची रिक्त झालेल्या जागी उर्वरित कालावधीसाठी नियुक्ती करण्यांत येत आहे.

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १७/१०/२००७

**दु:खवटा ठराव ०८अ :-**

सन्मा. नगरसेवक राजेश म्हात्रे यांच्या आई हंसाबाई हरिश्चंद्र म्हात्रे यांचे निधन झाले आहे. तसेच माजी नगरसेविका लिलाताई पाटील यांच्या बधुंचे निधन झाले. त्याचप्रमाणे जितेंद्र चांडक यांचे सुध्दा निधन झाले तसेच मच्छिंद्र कांबळी, नाट्य कलाकार त्यांचे ही निधन झाले. तसेच बाबुभाई जमनादास मेहता यांचेसुध्दा निधन झालेले आहे. या सर्वाचा शोकप्रस्ताव मी या सदनापुढे मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

12

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/११/२००७

**अभिनंदन ठराव ०९ :-**

सन्मा. नगरसेवक जयंत पाटील यांना सभागृह नेता म्हणून घोषीत केले म्हणून मी त्यांचे आमच्या संयुक्त लोकशाही आघाडीतर्फे अभिनंदन करतो.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

३१/१/२००७

मा. महासभा दि. ३१/१/२००७

१३

ठराव क्र. ९ अ

मि. भा. म. न. पा. च्या अक्षदीप व सुरजप्रकाश ह्या दैनिकात प्रसिद्ध आलेल्या संगणकचालक व लिपिक पुरवठा कामी मानधनावर करावयाच्या नियुक्त्यां (नेमणूकांबाबत) दि. २८/१०/०७ च्या जाहिरातीनुसार मी असा ठराव मांडीत आहे की -

मागील महासभा दि. २०/६/२००६ च्या ठरावाअन्वये ७ संगणकचालक व ४ लघुलेखक ह्यांची नेमणूक केली होती. त्यानुसार हे सर्व कर्मचारी ह्या पदावर कार्यरत आहेत. आजच्या महासभेत त्याच सर्व कर्मचाऱ्यांना यापुढे देखील कायम कार्यरत ठेवून दि. २८/१०/०७ च्या जाहिरात रद्द करून पुढील कारवाई थांबविण्यात यावी व त्या कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करावा असा मी ठराव मांडीत आहे.

ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

सूचक

अनुमोदक

1/11/07

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/११/२००७

**प्रकरण क्र. :-** श्री. गोविंद परब, सहा. आयुक्त आस्थापना विभाग यांनी मा. महासभेमध्ये नियमबाह्य, खोटे निवेदन केले व उध्दटपणे वागून गैरवर्तन केल्यामुळे त्यांची आस्थापना विभागातून त्वरीत बदली करणेबाबत.

**ठराव क्र. ९ब :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर पदे भरण्याकरिता मनपा/आस्था/१८८५/४५६/०७-०८ दिनांक २२/१०/२००७ अन्वये जाहिर नोटीस प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये मानधनावरील पदे आरक्षणातून भरण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

मानधनावरील पदे भरण्याकरिता आरक्षण लागू करावे असे कोणसाठी नियमात नसताना आज दि. १/११/२००७ रोजीच्या सभागृहात या विषयावर झालेल्या चर्चेत आस्थापनेवरील श्री. गोविंद परब यांनी मध्येच येउन सदर विषया संदर्भात खोटी माहिती दिली. तसेच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उद्धट उत्तरे दिली त्यांचे सदर जाहिर नोटीस मधील भरतीबाबत केलेले खोटे, नियमबाह्य निवेदन व उध्दटपणे वागणे, गैरवर्तन करणे, त्यांच्याकडे असलेल्या खात्याचा कार्यभार योग्यरितीने न सांभाळणे या कारणास्तव त्यांची आस्थापना विभागातून त्वरीत बदली करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील.** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा दि. ०१/११/२००७

प्रकरण क्र.८ :- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

ठराव क्र. :- ९७

राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना गेले काही वर्षापासुन बोनस देण्याचे बंद केलेले असुन महानगरपालिका कर्मचारी बोनस ॲक्ट नुसार बोनस मिळणेस पात्र नाही. त्यामुळे महानगरपालिका कर्मचाऱ्याना बोनस शासनाच्या निर्णयाशिवाय देता येत नाही. शासनाकडुन शासकीय/ निमशासकीय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत कोणताही निर्णय जाहिर झालेला नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन/१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिकांनी सानुग्रह अनुदान देणेबाबत आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा व त्यासाठी शासनाची पुर्वपरवानगी घेण्याची गरज नाही असा निर्णय झाला आहे.

गेल्यावर्षी मा.महासभा दि.१२/१०/२००६ ठराव क्र.६१ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग १ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रू. ४,८००/- महापालिका शिक्षकांना रू. ३,०००/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती कर्मचारी ठोक वेतन व मानधनावरील कर्मचारी यांना रू.२,८००/- बालवाडी शिक्षकांना रू.१३००/- या प्रमाणे सानुग्रह अनुदान अदा केलेले आहे.

सन २००६-०७ या वर्षात महानगरपालिका अस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी ह्यांना सदरचे अनुदान देय आहे. त्यानुसार सन २००७-०८ च्या मंजूर अल्पसंकल्पीय अंदाजपत्रकात सानुग्रह अनुदानाकरीता लेखाशिर्ष "संकीर्ण" "फ" (१८) मध्ये रु. एक कोटीची तरतूद आहे.

सन २००६-०७ या वर्षाकरीता महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी ह्यांना रु. ...५३००/-... मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग रु. ..३५००/-.. बालवाडी शिक्षक रु. ३३००/-.... सुर्वण जयंती कर्मचारी, रोजंदारी कर्मचारी, ठोक वेतन व मानधनावरील कर्मचारी ह्यांना रु.३६००/- ह्या प्रमाणे दिवीळीपुर्वी सानुग्रह अनुदान अदा करण्यात यांवे, असा ठराव मी महासभेपुढे मांडत आहे. कर्मचाऱ्यांनी प्रमाणे मागणी केलेले दिवसांच्या रकमेच्या प्रमाणात रक्कम वाटप करावे.

सुचक :-
ॲड. शफीक अहमद साहेब खान

अनुमोदक :-

ठराव बहुमताने मंजूर

१/११/०७

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

**मा. महासभा दि. ०१/११/२००७**

**प्रकरण क्र. ०९ :- महानगरपालिका हद्दीत मोकळया जागेवर कर आकारणी करणेस मंजुरी मिळणे बाबत.**

**ठराव** ९१:-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मोकळया जागांवर (बीनशेती झालेल्या व बीनशेतीसाठी ना हरकत दाखला मिळालेल्या) मालमत्ता कर आकारणी करणे बाबतचा प्रस्ताव महासभेपुढे प्रकरण ९ नुसार ठेवण्यात आला आहे.

प्रकरण क्र. ९ बाबत महानगरपालिका प्रशासनाने गोषवारा सादर केलेला आहे. सदर गोषवाऱ्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकळ्या जागांचे वर्गीकरण रहीवास क्षेत्र, औद्योगीक क्षेत्र, विविध आरक्षणाखालिल क्षेत्र, ना विकास क्षेत्र, सी.आर.झेड बाधित क्षेत्र, पाण्याखालील क्षेत्र, अनधिकृत बांधकाम झालेले क्षेत्र ह्याबाबत कोणतेही विवरण प्रशासनाने महासभेपुढे सादर केलेले नाही.

तसेच गोषवाऱ्यानुसार मोकळ्या जागांवर (बीनशेती झालेल्या व बीनशेतीसाठी ना हरकत दाखला मिळालेल्या) मालमत्तांवर कर प्रस्तावित करुन त्याद्वारे अंदाजे रु. १.५ कोटी ते २ कोटी उत्पन्न अपेक्षित धरले आहे.

वास्तविकतः बीनशेती झालेल्या जमिनींचे व बीनशेतीसाठी ना हरकत दिलेल्या जमिनींचे संपुर्ण तपशील प्रशासनाकडे उपलब्ध असतानाही प्रशासनाने तो तपशील सादर केलेला नाही. ज्याअर्थी रु. १.५ कोटी ते २ कोटी उत्पन्न अपेक्षित धरले आहे त्याअर्थी असा तपशील महानगरपालिकेने प्रत्यक्ष सर्व्हे करुन आजच्या महासभेपुढे सादर करावयास पाहिजे होता. त्यामुळे सदरचा गोषवारा सदोष आहे.

आपल्या महानगरपालिकेमध्ये मालमत्ता कर आकारताना करमुल्य निर्धारण अधिकाऱ्यांनी विविध क्षेत्रासाठी करपात्र मुल्य ठरविले आहे. त्याचाही तपशील गोषवाऱ्यामध्ये दिलेला नाही.

गोषवाऱ्यामध्ये खरेदी विक्रीचे दस्ताऐवज नोंदणी करताना शासनाने मुद्रांक शुल्कासाठी सर्व्हे निहाय जमिनीचा दर निच्छित केला आहे, तो दर मोकळ्या जमिनीची किंमत ठरविण्यासाठी लागू होईल असे नमुद केले आहे. या दरांची तुलना करमुल्य निर्धारण अधिकाऱ्याने विविध क्षेत्रासाठी निच्छित केलेल्या वार्षीक भाडे मुल्य व करपात्र मुल्यांशी होणे आवश्यक आहे. व त्यामध्ये तफावत येत असल्यास कोणता दर लागू करावा ह्याबाबत गोषवाऱ्यांमध्ये स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेता प्रशासनाने सादर केलेला गोषवारा सदोष असुन त्याशिवाय वरील प्रमाणे अनेक बाबींच्या तपशिलाचा अभाव असल्याचे प्रत्यक्ष निदर्शनास येते.

तरी प्रशासनाने वरील सर्व तपशिलांच्या बाबींची पुर्तता करुन त्याप्रमाणे सर्व समावेशक बाबींसह असलेला तपशिल व बीनशेती झालेल्या व बीनशेती साठी ना हरकत दाखला मिळालेल्या परंतु जागेवर प्रत्यक्ष बांधकाम न झालेल्या मालमत्तांच्या सर्व्हेचे विवरण गोषवाऱ्यामध्ये देऊन पुन्हा सदरचा विषय महासभेपुढे आणावा. तसेच शैक्षणिक संस्थांना करसवलत देणेबाबतचा प्रस्ताव सोबत आणावा.

प्रकरण क्र. ९ नुसार महानगरपालिका हद्दीत मोकळ्या जागांवर कर आकारणी करणेबाबतचा प्रस्ताव गोषवाऱ्यातील सदोष बाबी व वरील प्रमाणे आवश्यक तपशिल नमुद केलेले नसल्यामुळे फेटाळण्यात येत आहे. असा मी ठराव मांडत आहे

| | |
|---|---|
| [signature] | उमा श्याम पाटील |
| **सुचक :-** | **अनुमोदक :-** |
| शशिकांत जगन्नाथ भोईर | उमाताई श्याम पाटील |

[signature]

17

**प्रकरण क्र.१० :- मिराभाईंदर महानगरपालिकेचे मिरारोड येथील हॉस्पीटल करीता कर्मचारी आकृतीबंधास मंजुरी देणे.**

**ठराव :-** ९२

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखडयात आरक्षण क्र.१९१/१९२ मध्ये हॉस्पीटल, वाचनालय, शवागृह व रक्त पेढी साठी प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर आरक्षण विद्यमान आमदार मुझफ्फर हुसेन यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन अधिकारी व लोक प्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने आरक्षण क्र.१९१/१९२ प्रस्तावित करण्यात आले. सदर जागेत आमदार निधीतुन हॉस्पीटल, रक्तपेढी, वाचनालय, आणि शवगृहाची इत्यादी सिव्हील कामे अजुन पर्यंत सुरु आहेत. त्याशिवाय विद्युतीकरण, फर्निचर, वातानुकुलीकरण, रंगकाम, अंतर्गत व बाह्य सुशोभीकरणाची कामे प्रलंबीत आहेत. त्यामुळे आजमितीस ही इमारत रुग्णालयाच्या वापरासाठी सुसज्ज झालेली नाही.

इमारत वापरण्याजोगी तयार झाल्यानंतर सदर इमारतीमध्ये रुग्णालय, रक्तपेढी, वाचनालाय आणि शवगृह सुरु करणे प्रस्तावित आहे.

रूग्णालय सुरु करावयाचे झाल्यास सदर रुग्णालयांमध्ये किती खाटा असतील ह्याबाबतची बिनचुक माहिती प्रशासनाकडे नाही. तसेच रुग्णालयामध्ये कोणत्या वैद्यकीय सेवा पुरविण्यात याव्यात तसेच कोणते वैद्यकीय कक्ष असावेत ह्याबाबत माहनगरपालिकेचे धोरण निश्चित झालेले नाही. तसेच गोषवाऱ्यांमध्ये सुद्धा कोणत्या प्रकारच्या रुग्ण सेवा सुरु करावयाच्या किंवा त्यामध्ये संबंधीत कोणते वैद्यकीय कक्ष असावेत त्याबाबतची माहिती दिलेली नाही. विशेष म्हणजे मा. महासभा सुचना क्र. ३ मधील प्रकरण क्र. १० मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मिरारोड येथील हॉस्पीटल करीता कर्मचारी आकृतीबंधास मंजूरीदेणे बाबतचा विषय व या प्रकरणासाठी प्रशासनाने दिलेल्या गोषवारा हा मिरारोड येथील रुग्णालय व रक्तपेढी साठी कर्मचारी वर्गाची नेमणूक करणेबाबतचा आहे. त्यामुळे सदर गोषवारा हा सदोष असून लोकप्रतिनीधींची दिशाभूल करणारा आहे असे स्पष्ट होते.

वरील प्रमाणे धोरण ठरविण्यापुर्वी कर्मचारी वर्गाचे नेमणूक करण्यास प्रशासन अतिउत्साही असल्याचे दिसून येते.

रुग्णालय/ रक्तपेढी सुरु करणेसाठी शासनाकडून लागणाऱ्या परवानग्या किंवा त्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे किंवा नाही. तसेच प्रस्ताव सादर केला असल्यास त्याची मंजूरी मिळाली आहे किंवा नाही ह्याबाबतचा कोणताही तपशिल गोषवाऱ्यामध्ये दिलेला नाही.

आजमितीस महानगरपालिकेमध्ये आरोग्य अधिकारी हे पद रिक्त असून ते भरण्यात आलेले नाही.

रुग्णालयासाठी ११२ पदे व रक्तपेढी साठी १४ पदे अशा एकूण १२६ पदांवर कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव गोषवाऱ्यानुसार मा. महासभेपुढे ठेवण्यात आलेला आहे. परंतु विषयाप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रस्ताव सेवाप्रवेश नियमांसह तयार करुन प्रथम प्रशासनाने महासभेपुढे आणावयास पाहिजे होता. व त्यानंतर शासनाकडे मंजूरीसाठी पाठवून मंजूरी आल्यानंतर नेमणूकी करण्याबाबतचा गोषवारा महासभेपुढे ठेवावयास पाहिजे होता.

गोषवाऱ्यातील नमुद केलेली पदे ही १०० खाटांच्या रुग्णालयासाठी प्रस्तावित केली असल्याचे निदर्शनास येते. परंतु १०० खाटांचे रुग्णालय मंजूर किंवा परवानगी असल्याबाबतची कोणतीही माहिती नमुद केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणामधील प्रशासनाने दिलेला गोषवारा सदोष व लोकप्रतीनिधींची दिशाभूल करणारा आहे.

रुग्णालय प्रत्यक्षात सुरु करणे, त्यामध्ये देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवा निश्चित करणे व वैद्यकीय सेवा देण्यासाठी वैद्यकीय कक्ष सुरु करणे ह्या बाबींची पुर्तता न करता गोषवाऱ्यानुसार थेट कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करणे बाबतचा प्रस्ताव महासभेपुढे आणणे हे अकालिक तसेच उतावळेपणाचे लक्षण आहे.

रुग्णालय व रक्तपेढीच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण होऊन वापरण्यायोग्य झालेले नाही. तसेच रुग्णालयामध्ये कोणत्या वैद्यकीय सेवा देण्यात याव्यात, व त्या सेवा देण्यासाठी कोणते वैद्यकीय कक्ष सुरु करावेत ह्यापैकी कोणतेही महानगरपालिकेचे धोरण ठरलेले नसताना, तसेच लोकप्रतिनीधींची दिशाभूल करणारा व सदोष गोषवारा देऊन रुग्णालय व रक्तपेढीसाठी अनावश्यक पदे दर्शवून त्यावर कर्मचारी वर्गाची नेमणूक करणारा गोषवारा प्रकरण क्र. १० मध्ये सादर केल्याने सदर प्रकरणातील प्रस्ताव ही सभा फेटाळून लावत आहे.

सदोष गोषवारा सादर करुन लोकप्रतिनीधींना चुकीची माहिती देऊन हेतुपुरस्पर लोकप्रतिनीधींची दिशाभूल करुन सक्षम अधिकाऱ्यांच्या अधिकारांचा गैरवापर करुन, आरोग्य अधिकारी ह्या पदाचा कार्यभार सांभाळीत असलेले प्रभारी आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद विठ्ठलराव पडवळ, मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) अन्वये त्यांनी केलेल्या नियमांचा भंग, निष्काळजीपणा आणि कर्तव्यातील हयगय ह्या प्रकरणी डॉ. प्रमोद विठ्ठलराव पडवळ ह्यांना दोषी ठरविण्यात येऊन त्वरीत निलंबीत करण्यात येत आहे असा ठराव मांडीत आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार डॉ. प्रमोद विठ्ठलराव पडवळ ह्यांच्या निलंबना नंतर सदर कलम ५६ खालिल पुढील कारवाई मा. आयुक्तांनी करावी व तसा अहवाल महासभेपुढे सादर करावा.

त्याचप्रमाणे सदर प्रभारी आरोग्य अधिकारी ह्यांची नेमणूक महानगरपालिकेत कंत्राटी तत्वावर करण्यात आली होती त्यानंतर त्यांना ज्यापद्धतीने महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी नेमणूक करण्यात आली. ह्या नेमणूकीबाबत संशकता असल्याने मा. आयुक्तांनी त्याबाबत चौकशी करुन रीतसर अहवाल महासभेपुढे ठेवावा. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** (अनिल दि. २१/९/ ) **अनुमोदक :-** (राजेश शंकर केनोस्कर)

19 (२०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/११/२००७

**प्रकरण क्र. ११ :-** मिरारोड येथील हॉस्पीटल करीता लागणारे आवश्यक साहित्य खरेदी बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. ९३

(सदर विषय मा. महापौर सो. यांच्या आदेशाने नामंजूर करण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/११/२००७

**प्रकरण क्र. १२ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या गटनेत्यांना सोईसुविधा देणेबाबत धोरण ठरविणे.**

**ठराव क्र. — :-**

सन २००७ चे महाराष्ट्र अध्यादेश क्र. २ मधील प्रकरण १ मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका सुधारणा अध्यादेश व प्रकरण तीन मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये सुधारणा केल्याप्रमाणे नवनिर्वाचीत पालिका सदस्यांनी एकत्र येवून आघाडी किंवा फ्रंट तयार करणे व अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी संबंधीत विभागीय आयुक्त यांचेकडे निवडणूकीचा निकाल अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत करण्याच्या तरतूदीप्रमाणे मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी वेगवेगळ्या आघाडया स्थापन केलेल्या आहेत. व त्याची नोंदणी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग ह्यांच्या कार्यालयात केली आहे.

मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग ह्यांचे क्र. साशा/का-३/नपा/पक्षनोंद/मिभामनपा/०७ दि. २७/०९/२००७ च्या पत्रानुसार पक्षनिहाय नगरसेवक संख्या त्यांचे गटनेते व ज्या पक्षाला पाठींबा दिला त्या पक्षांच्या नावांची माहिती दिलेली आहे. सदर पत्रानुसार एकुण १० गटनेत्यांच्या नावांची माहिती दिलेली आहे.

प्रकरण १२ मध्ये प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार गटनेत्यांना दालन, वाहन, भ्रमणध्वनी इत्यादी व्यवस्था उपलब्ध करण्याची मागणी गटनेत्यांनी केलेली आहे. महापालिकेकडे आजमितीस एकूण ५ दालने उपलब्ध आहेत. व एकूण १० गटनेते आहेत.

वरील प्रमाणे १० गटनेत्यांना प्रत्येकी एक दालन, वाहन, भ्रमणध्वनी, संगणक, प्रिंटर, संगणक चालक व कार्यालयीन ~~शिपाई~~ (कर्मचारी व शिपाई) इत्यादी सुविधा देण्यात याव्यात. उपलब्ध असलेल्या दालनाचे आकारमानानुसार प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकाच्या संख्याबळाप्रमाणे तुलना करुन मोठे संख्याबळ असलेल्या पक्षास मोठे दालन ह्या प्रमाणे दालनांचे वाटप करण्यात यावे. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- मधुसूदन एम. पुरोहित

अनुमोदक :- धनेश परशुराम पाटील

(१२)

५

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०१/११/२००७

**प्रकरण क्र. १३ :-** **राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर मिरा गावठण महाजनवाडी, मिरागाव, मुन्शी कंपाउंड, कृष्णस्थळ, अमिषपार्क भागातील पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरिता आर.सी.सी. नाला बांधणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.**९४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्नरुस्थान अभियाना अंतर्गत शहर विकास आराखड्यात एकात्मिक नाले विकास प्रकल्प अंतर्गत मिरा भाईंदरच्या सर्व नाल्यांचा समावेश केला आहे. त्यास मा. महासभा दि. १७/११/२००६ मधील प्रकरण ८६ परिशिष्ठ 'अ' अनुक्रमांक १५ नुसार एकात्मिक नाले प्रकल्पासाठी रु. २२२.२६ कोटी इतकी रक्कम खर्च करावयाची आहे.

शहर विकास आराखड्यातील सर्व प्रकल्पाकरिता केंद्रशासनाकडून ३५ टक्के, राज्यशासनाकडून १५ टक्के व उर्वरित ५० टक्के महानगरपालिकेस करावयाचा आहे.

प्रकरण क्र. १३ मधील विषय हा एकात्मिक नाले प्रकल्पाअंतर्गत येत असून सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासनाने राज्य शासनाकडे पाठवलेला आहे. परंतु, त्याची प्रत सदर गोषवाऱ्या सोबत दिलेली नाही.

गोषवाऱ्यानुसार मिरा गावठण महाजनवाडी, मिरागाव, मुन्शी कंपाउंड, कृष्णस्थळ, अमिषपार्क ह्या भागातील पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरिता नाल्यांचे पक्के आर.सी.सी. बांधकाम, छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील कलवर्टची रुंदी वाढविणे इ. कामे करण्यासाठी रु. ५,२९,७४,०००/- च्या खर्चास मंजुरी मागितलेली आहे.

वरील विभागांसाठी आर.सी.सी. नाला बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्याठिकाणी पूर्वापार नैसर्गिक नाले होते. परंतु, सदर नैसर्गिक नाल्यांचे रेखांकन विकास आराखड्यामध्ये रहिवास क्षेत्राखाली दाखविल्यामुळे अनेक इमारत विकासकांना ह्या नैसर्गिक नाल्यांच्या जागेवर अतिक्रमण करुन नाले बंद केलेले आहेत.

शहर विकास आराखड्यामध्ये नैसर्गिक नाल्यांचे रेखांकन करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये तत्कालीन नगरपरिषदेने तसेच महानगरपालिकेने ठराव पारित केला होता. ह्या ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्याचे काम प्रशासनाचे होते. त्या संदर्भात कोणताही तपशिल प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये दिलेला नाही.

विषयानुसार प्रस्तावित केलेला नाला प्रत्यक्षात पक्क्या स्वरुपाचा बांधावयाचा झाल्यास त्य जागेवर काय वस्तुस्थिती आहे ह्याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम खात्याने दिलेला नाही.

एकात्मिक नाले प्रकल्पामध्ये शहरातील सर्व नाले समाविष्ट असताना व त्यापैकी काही नैसर्गिक नाले प्रत्यक्ष आहेत त्याच स्वरुपात असताना त्या नाल्यांचे पक्के बांधकाम करण्याचे प्रशासनाने प्रस्तावित न करता विशिष्ठपणे वरील नाल्यांचे बांधकाम प्रस्तावित का केले आहे ह्याचे स्पष्टीकरण होत नाही.

गोषवाऱ्यानुसार जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्नरुस्थान अभियाना अंतर्गत तयार केलेली योजना २०३१ सालापर्यंत राबवायाची असल्या कारणाने या योजनेस विलंब होईल हे कारण पुढे करुन वरील कामास प्राधान्य दिल्याचे नमुद केले आहे. प्रत्यक्षात सदरच्या योजनेस मंजुरी मिळाली असून निधी वर्ग झाल्यास त्वरीत या योजने अंतर्गत येणारी विकास कामे पुढील आर्थिक वर्षात हाती घेता येतील अशी वस्तुस्थिती असतानाही ती योजना २०३१ सालापर्यंत होईल असे गोषवाऱ्यात नमुद करुन प्रशासन लोकप्रतिनिधींची दिशभूल करित आहे.

गोषवाऱ्यात दिलेल्या माहितीनुसार महानगरपालिका सदर कामासाठी निधी हा सन २००८-०९ आर्थिक वर्षातील तरतुदीनुसार खर्च करण्याचे प्रस्तावित करत आहे. परंतु, सदर कामाची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी चालु आर्थिक वर्षात मागत आहे.

चालु आर्थिक वर्षात प्रशासकीय व आर्थिक मंजुरी द्यावयाची झाल्यास चालु वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तशी तरतुद असणे आवश्यक आहे. ह्याची माहिती प्रशासनास नाही काय? किंवा त्यांनी विधी सल्लागाराकडून किंवा अंतर्गत लेखा परिक्षकाकडून सल्ला घेतलेला दिसत नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर विषयाच्या कामासाठी येणाऱ्या एकूण ५,२९,७४,०००/- या रक्कमेपैकी महानगरपालिकेच्या निधीतुन करावयाचा खर्च त्या खर्चासाठी चालु आर्थिक वर्षात असलेली शिल्लक आर्थिक तरतुद राज्य शासनाकडून मिळणारी रक्कम व केंद्र शासनाकडून मिळणारी रक्कम ह्याचा पतशिल किंवा शासनाकडून आजमितिस निधी उपलब्ध झालेला आहे किंवा नाही ह्याची माहिती दिलेली नाही.

सन २००८-०९ ह्या आर्थिक वर्षात ह्या बांधकामाला सुरुवात करावयाची आहे त्यासाठी त्या वर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्राकात तरतुद करावी लागेल. सन २००८-०९ चे अंदाजपत्रक तयार झालेले नाही. सन २००७-०८ च्या अंदाजपत्रकात त्या लेखाशिर्षाखाली तरतुद नाही किंवा गोषवाऱ्यामध्ये तशी नोंद नाही. पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या तरतुदीस अधिन राहून पुढील वर्षामध्ये हाती घ्यावयाच्या कामास चालु वर्षात आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे बेकायदेशीर व नियमबाह्य असल्यामुळे ही सभा प्रकरण क्र. १३ मधील आर.सी.सी. नाला व कलवर्टच्या बांधकामाला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी नाकारत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सदर ठरावामध्ये सुचक श्री. शशिकांत भोईर व अनुमोदन श्रीम. प्रभात पाटील ह्यांनी उपसुचना मांडली ती खालीलप्रमाणे.

सदर प्रकरणत दोषी अधिकारी शहर अभियंता मा. श्री. मिलिंद वाणी यांनी अर्थ संकल्पात तरतुद नसताना प्रस्तावाला तांत्रिक मंजुरी दिली आहे. तसेच लेखापरिक्षक मा. श्री. बनसोडे यांनी मंजुरी दिली आहे. तरतुद नसतानासुध्दा प्रशासनामार्फत लोकप्रतिनिधींची दिशाभूल करणारे अधिकारी शहर अभियांता श्री. मिलिंद वाणी व लेखापरिक्षक मा. श्री. बनसोडे यांनासुध्दा कार्यमुक्त करावे अशी उपसुचना मांडत आहे. व यापुढे अर्थसंकल्पीय तरतुद असलेशिवाय कोणतेही प्रस्ताव मा. महासभेपुढे आणू नये.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्रीम. नयना गजानन म्हात्रे**

**उपसुचनेसह**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

२५

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/१२/२००७

**प्रकरण क्र. १४ :-** भाईंदर (पू.) क्वीन्स पार्क, केनवुड पार्क, रामदेव पार्क, श्रीराम नगर भागातील पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरीता आर.सी.सी. नाला बांधणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**(सदर विषय मा. महापौर सो. यांच्या आदेशाने नामंजूर करण्यात आला.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

२८ (२३)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/१२/२००७

(ठ प्रस्ताव)

**प्रकरण क्र. १५ :-** सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचे दिनांक २६/१०/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व इमारती, घरे, चाळींना दैंनदिन कचरा जमा करण्याकरिता फायबर मुव्हेबल डस्टबीन बसविणेबाबत चर्चा व विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

**(सदर विषय मा. महापौर सो. यांच्या आदेशाने पुढील सभेत घेण्याचे ठरले.)**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

26 (378)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/१२/२००७

**दु:खवठा ठराव १५ :-**

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री त्याचबरोबर भटका भ्रमंतीचे संपादक ह्यांचे दु:खद निधन झालेले आहे. तसेच भाईंदरचे स्वातंत्र सैनिक राजाराम पाध्ये, सन्मा. नगरसेविका ग्रिटा फॅरो यांची नणंद ॲना जॉर्जी अल्फान्सो व दलित साहित्य आणि प्राध्यापक केशव मेश्राम यांचे सुद्धा दु:खद निधन झालेले आहे. यांचा ही शोकप्रस्ताव मी या ठिकाणी मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनंत रा. पाटील** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

४९

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०/१२/२००७.

प्रकरण क्र. १६ :- दि. २०/०२/२००७, दि. १७/०३/२००७, दि. १६/०४/२००७, दि. १६/०४/२००७, दि. ०३/०५/२००७ व दि. १७/०५/२००७ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. १६ :-

दि. २०/०२/२००७, दि. १७/०३/२००७, दि. १६/०४/२००७, दि. १६/०४/२००७, दि. ०३/०५/२००७ व दि. १७/०५/२००७ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मो. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत ~~येत आहे~~ द्यावा. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :-

अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १९/०१/२००८**

(दि. २७/१२/०८ ची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. १७ :- महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर काम करित असलेल्या संगणकचालक व लघुलेखकांबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. १७ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर काम करित असलेले संगणक चालक व लघुलेखक यांना मा. महासभा दि. २०/०६/२००६ रोजी ठराव क्र. २९ अन्वये ठेका पद्धतीने काम करणेस मान्यता दिली होती. सदर कर्मचाऱ्यांची मुदत दि. ३१ डिसेंबर २००७ रोजी संपत आहे. आस्थापनेवर मोठ्या प्रमाणात नियुक्त्या व पदोन्नत्या झाले आहेत. त्यामुळे आस्थापना खर्च ४२ टक्केवर गेला आहे. आस्थापनेवर संगणक चालक व लघुलेखक ही पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव मान्य करता येणार नाही. या पदावरती बाह्य मार्गाने काम करून घेणे अपेक्षित आहे. (आउट सोर्सिंग) अशा अशायाचे पत्र क्र. मि.भा.न.प.-११०६/१३९०/नवि-२८/नगरविकास विभाग दि. ०९/११/२००६ रोजी कक्ष अधिकाऱ्यामार्फत प्राप्त झाले. सदर संगणक चालक व लघुलेखक यांच्या कामाबद्दल काही शंका घेण्यात आलेला आहेत. यांच्या कामाची क्षमता व शैक्षणिक पात्रता व त्यांची जबाबदारी यांची माहिती घेणेसाठी महापालिकेच्या सभागृहातील विविध पक्षाचे सदस्यांची एक समिती मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ अन्वये बनविण्यांत यावी. ही समिती एक आठवडयात गठित करण्यांत यावी. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाले नंतर पुढील महासभेत या प्रकरणी निर्णय होईपर्यंत मानधनावर काम करीत असलेल्या संगणक चालक व लघुलेखक यांना मुदतवाढ देत आहे. असा मी ठराव मांडीत आहे.

**सदर ठरावात सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक :- सौ. प्रभात पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना केली.**

वरील प्रकरणामध्ये सादर झालेल्या ठरावास अनुसरुन खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात येत आहे. ठरावानुसार गठित करावयाची समिती ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अन्वये फक्त प्रकरणातील विषयापुरतीच करण्यांत यावी. सदर प्रकरणातील विषयानुसार मानधनावर कार्यरत असलेल्या संगणक चालक व लघुलेखक यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(७) अन्वये ६ महिन्याकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील प्रकरणी गठित केलेली कमिटीचे कामकाज फक्त वरील विषयापुरतीच मर्यादित असून सदर समितीने आपला अहवाल ३ महिन्यांच्या आत महासभेस देण्यात यावा अशी मी सुचना मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- प्रेमनाथ पाटील**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

9-1-08

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ८/७/२००८

२९

**प्रकरण क्र. १८** (जा प्रस्ताव) (दि. २०/७/०७ ची तहकुब सभा)

**ठराव क्र.** —

मिरा भाईंदर महापालिकेत उत्पन्नाच्या विविध स्त्रोता पैकी विविध उद्योगांना व व्यापारांना ना हरकत दाखला देणे, नुतनीकरण करणे कामी आकारण्यांत येणारी फी चे दर सुधारीत करणे बाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. वास्तविक २००२ साली प्रशासकीय कारकिर्दी मध्ये उपविधी तयार केली असून त्यास शासनाची मंजूरी असल्याचे संदर्भीय आहे. सन २००२ पासून आतापर्यंत अस्तित्वात असलेल्या सोबतचा तपशिल अपुरा असून त्यानंतर व्यवसायिकांत वाढ झाली आहे. त्या व्यवसायिकांना यादीत समाविष्ट करून परिपुर्ण माहितीसह प्रशासनाने तातडीने माहिती करावी. भविष्यात महापालिकेला शहराच्या विकास कामासाठी लागणारा निधी असाच उत्पदन्नांच्या स्त्रोतातून उपलब्ध करावा लागणार आहे. म्हणून आजच्या महासभेने जेष्ठ नगरसेवकांची पदाधिकाऱ्यांची सर्व पक्षीय समिती गठीत करून माहिती उपलब्ध करून घ्यावी. समंतीने केलेली चर्चा व सर्व व्यवसायाचा परिपुर्ण माहितीसह पुढील सभेपुढे सादर करण्यांत यावा. असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :-** Shanu Gohil      **अनुमोदे :-** [signature]

Shanu Gohil      सौ. निर्मला सावळे - कांबळे.

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०९/०१/२००८

## (दि. २०/१२/२००७ रोजीची तहकुब सभा)

(उप्रस्ताव)

**प्रकरण क्र. १९:-** **मिरा भाईदर महानगरपालिकेत प्रशासकीय शिस्त लावणेबाबत.**

(30)

**ठराव क्र. १८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत सध्या उपआयुक्त पदनामाची तीन पदे मंजूर आहेत. त्यापैकी एक पदावर महानगरपालिकेचे स्वतःचे उपआयुक्त व उर्वरित दोन पदावर राज्य शासनाकडील दोन अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४ दि. ०४ मे २००६ नुसार शासनाने निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 'ड' वर्गात समावेश असल्याने फक्त उपआयुक्त पदानामाची दोन पदे अनुज्ञेय आहेत. सदर शासन निर्णयानुसार मा. आयुक्त यांच्याकडे एक उपआयुक्तास कार्यमुक्त करणेबाबत कळविले असता त्यांनी दि. १५/०१/२००७ च्या पत्रान्वये दोन उपआयुक्त राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असल्याने त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होईपर्यंत परत पाठवता येणार नाही असे कळविलेले होते. तथापि आयुक्तांनी एक उपआयुक्त (श्री. शेख) कार्यमुक्त झाल्यानंतर त्यांच्या जागी दुसऱ्या उपआयुक्तांची नेमणुक केली. वास्तविक राज्य शासनाला आयुक्तांनी नवीन शासन निर्णयानुसार तिसरा उपआयुक्त पाठवू नये असे कळवून तिसऱ्या नविन उपआयुक्तांची नेमणूक करावयास नकार द्यायला पाहिजे होता. परंतु महासभेची मान्यता न घेता आयुक्तांनी कार्यवाही केली आहे. दि. ०४ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार फक्त दोनच उपआयुक्त अनुज्ञेय आहेत. एक उपआयुक्त महानगरपालिकेचा व एक उपआयुक्त राज्यशासनाचा असे प्रमाण ठेवणे बंधनकारक आहे. दोन्ही पदे एकाकी होत असल्याने त्यास आरक्षण लागू नाही. तथापि महानगरपालिकेतील अधिकारी महासभेत (ज) खाली आलेला प्रस्ताव दाखवून महापालिकेची दिशाभूल करुन कार्यवाही करित आहेत. अशाप्रकारे मा. महासभा दि. ०१/०६/२००७ विषय क्रमांक ५६ अन्वये केलेला ठराव रद्द करण्यांत येत आहे. अशा ठरावावर कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कारवाई करावी.

तसेच दि. ०४ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार दोनच उपआयुक्त अनुज्ञेय असल्याने प्रतिनियुक्तीवरील एक अधिकाऱ्यास कार्यमुक्त करुन शासनाकडे परत पाठविण्यांत यावे असा ठराव मांडत आहे.

**सदर ठरावात सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक :- श्री. याकूब कुरेशी यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर पदे भरण्याकरिता मनपा/संस्था/१८८५/४५६/०७-०८ दिनांक २२/१०/०७ अन्वये जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये मानधनावरील पदे आरक्षणातून भरण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

मानधनावरील पदे भरण्याकरिता आरक्षण लागू करावे असे कोणत्याही नियमात नसताना आज दि. १/११/२००७ रोजीच्या सभागृहात या विषयावर झालेल्या चर्चेत आस्थापनेवरील श्री. गोविंद परब यांनी मध्येच येउन सदर विषयासंदर्भात खोटी माहिती दिली. तसेच, सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उद्धट उत्तरे दिली. त्यांचे सदर जाहिर नोटीस मधील भरतीबाबत केलेले खोटे, नियमबाह्य निवेदन व उद्धटपणे वागणे, गैरवर्तन करणे, त्यांच्याकडे असलेल्या खात्याचा कार्यभार योग्यरितीने न सांभाळणे या कारणास्तव त्यांची आस्थापना विभागातून त्वरित बदली करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचकः- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदक :- श्रीम. नयना गजानन म्हात्रे.**

sd/-

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(४४०)
९२

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०९/०१/२००८

(उपप्रस्ताव)

**प्रकरण क्र. २० :-** निश्चित केलेल्या पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूका न करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (१) नुसार नेमणूका करणेबाबत.

**(मा. महापौर सो. यांच्या आदेशाने सदर प्रस्ताव पुढील सभेत घेण्याचे ठरले.)**

सही/-
मा. महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

33

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०९/०१/२००८

**दु:खवठा ठराव १९ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील नवघर गांव, भाईंदर (पूर्व) येथील आपल्या मिरा भाईंदरचे कर्मचारी श्री. संतोष भाउराव पाटील यांचे पिताश्री श्री. भाउराव नारायण पाटील यांचे दु:खद निधन झालेल आहे. त्याचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१८२)
३५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १८/०१/२००८.

**प्रकरण क्र. २१ :-** दि. ०१/६/२००७, दि. ०८/०६/२००७ (दि ०१/०६/२००७ ची तहकुब सभा), दि. १४/०६/२००७ (दि ०१/०६/२००७ व ०८/०६/२००७ ची तहकुब सभा), दि २८/०८/२००७, दि. १७/१०/२००७, दि ०१/११/२००७, दि. ०१/१२/२००७ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र.** २० **:-**

दि. ०१/६/२००७, दि. ०८/०६/२००७ (दि ०१/०६/२००७ ची तहकुब सभा), दि. १४/०६/२००७ (दि ०१/०६/२००७ व ०८/०६/२००७ ची तहकुब सभा), दि २८/०८/२००७, दि. १७/१०/२००७, दि ०१/११/२००७, दि. ०१/१२/२००७ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. जयंत पाटील          अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/१/२००८

183
35

**प्रकरण क्र. २२ :-** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण धर्तीवर मनपा परिवहन व्यवस्थेकरिता स्वतंत्र्य स्थापन होणाऱ्या प्राधिकरणाबाबत विचार विनिमय करणे. (मा. परिवहन समिती सभा दि. २०/१०/२००७ प्रकरण क्र. १९ नुसार शिफारस केलेला ठराव क्र. १९.)

**ठराव क्र. २१ :-**

ठाणे जिल्ह्याची १९९१ ची लोकसंख्या ५५ लाखापर्यंत होती. २००१ च्या जनगणनेप्रमाणे ही संख्या एक कोटी आहे व २००८ साली १ कोटी २५ लाख झाली आहे. ठाणे जिल्ह्याचा समावेश एमएमआरडीए क्षेत्रात असून त्यामध्ये मिरा भाईदर महानगरपालिकेचाही समावेश आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (जेएनएनयुआरएम) अंतर्गत एमएमआरडीए च्या माध्यामातून शहरांचा विकास करण्याचा केंन्द्र शासन व राज्य शासन यांचा उद्देश आहे. मिरा भाईन्दर महापालिका विकास करण्यासाठी रु. १९२५ करोड ची योजना मंजूर असून त्यात मिरा भाईन्दर शहराला मेट्रोलिंक ने जोडण्याचाही समावेश आहे. महाराष्ट्र राज्यातल्या सर्वात जास्त महानगरपालिका व नगरपालिका ठाणे जिल्ह्यात आहेत. त्यांची एकत्रित परिवहन सेवा असावी असा प्रस्ताव आहे. विद्यमान स्थीतीत मिरा भाईन्दर क्षेत्रात महानगरपालिकेची परिवहन, बेस्ट, एस.टी. व टि.एमए.टी. च्या बसेस प्रवासी वाहतूक करीत असतात. म.न.पा. ची परिवहन सेवा खाजगी तत्वावर घेतलेल्या बसेसवर सुरु असल्या कारणाने ती ठाणे, नवि मुंबई व मुंबई मध्ये वाहतूक करु शकत नाही असे मत आर.टी.ए. कडून सांगण्यात येते. राज्य शासनाची पाउले विकासाच्या दिशेने टाकली जात आहेत. मुंबईला शांघाई बनविण्याचे केंन्द्र व राज्य शासनाचे धोरण आहे, मुंबईला लागून असलेल्या ठाणे जिल्ह्यातील लोकसंख्या वाढी बरोबरच उद्योग धंदयांचीही वाढ होत आहे. जनतेला होणारा प्रवासाचा त्रास कायमस्वरुपी दूर व्हावा व प्रवासी वाहतूकीत सुसुत्रता यावी या दृष्टीकोनातून ठाणे जिल्ह्यात एका शहरातून दुसऱ्या शहरात जाण्यासाठी एक संयुक्त परिवहन सेवा विकसीत व्हावी व त्यात बस सेवेबरोबर मेंट्रोलिंकचाही सेवेचा समावेश असावा अशी मागणी आ.मुझफ्फर हुसेन यांनी डि.पी.डी.सी., एम.एम.आर.डी.ए. व राज्य शासनाला सादर केलेली आहे. व त्याचा सातत्याने पाठपुरावाही केलेला आहे.

राज्य शासनाने दि.१/१०/२००७ रोजी मिरा भाईन्दर महानगरपालिकेला पत्र पाठविले आहे. त्या पत्रामध्ये वरील खालील ३ बाबींचा समावेश आहे.

१. पी.एम.टी. व पी.सी.एम.टी. पुणे यांच्या धर्तीवर एमएमआरडीए क्षेत्रातील महानगरपालिका परिवहन उपक्रमांचे एकत्रिकरण.
२. परिवहन उपक्रमांनी सध्याच्या पद्धतीप्रमाणे विभक्त राहून लोकांच्या गरजेप्रमाणे मार्ग निश्चित करणे व सेवा पुरविणे.

३. एमएमआरडीए क्षेत्रातील परिवहन उपक्रमांनी एकमेकांच्या क्षेत्रात व्यवसाय करण्यास संपूर्ण मुभा राहील.

या मुद्दावर विचार विनिमय करुन महानगरपालिकेला अभिप्राय दयायचा आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या दि.२०/१०/२००७ रोजी झालेल्या सभेत "पर्याय क्र.२ परिवहन उपक्रमांनी सध्याच्या पद्धतीप्रमाणे विभक्त राहून लोकांच्या गरजेप्रमाणे मार्ग निश्चित करणे व सेवा पुरविणे" तसेच संपूर्ण एम.एम.आर. (मुंबई मेट्रो पोलेटीयन रिजन) करता एकच आर.टी.ए. असावा असा ठराव झाला आहे.

परिवहन समितीने पारित केलेला ठराव अपूर्ण आहे व त्यामुळे मिरा भाईंदर मधील जनतेला चांगली परिवहन सेवा पुरविण्याचा मानस पूर्ण होउ शकत नाही म्हणून या प्रस्तावावर पूर्ण विचार केल्यानंतर या महासभेपुढे मी असा ठराव मांडत आहे.

"महाराष्ट्र शासनाच्या पत्रातील मुद्दा क्र. १ पी.एम.टी. व पी.सी.एम.टी. पुणे यांच्या धर्तीवर एमएमआरडीए क्षेत्रातील महानगरपालिका परिवहन उपक्रमांचे एकत्रिकरण". मिरा भाईंदर महापालिकेची परिवहन सेवा भाडे तत्वावर घेतलेल्या बससेवेव्दारे चालू आहे. गेल्या ४ वर्षामध्ये या परिवहन सेवेला तोटाच झालेला आहे. मिरा भाईंदर ची वाढती लोकसंख्या लक्षात घेता चांगली परिवहन सेवा देणे महापालिकेचे कर्तव्य आहे. म्हणून मिरा भाईंदर महापालिका परिवहन सेवेचे ठाणे जिल्ह्यातील एमएमआरडीए क्षेत्रातील महापालिका परिवहन उपक्रमामध्ये एकत्रीकरण करावे.

महाराष्ट्र शासनाच्या पत्रातील मुद्दा क्र. २ परिवहन उपक्रमाने सध्याचे पद्धतीप्रमाणे विभक्त राहून लोकांच्या गरजेप्रमाणे मार्ग निश्चित करणे व सेवा पुरविणे..

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र उत्तन ते काजूपाडा पर्यंत पसरलेले आहे. जास्तीत जास्त लोक आज मिरा भाईंदर महापालिकेच्या परिसरामध्ये स्थलांतरीत होत आहेत. या लोकांना चांगली सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाचीच सेवा पुरविणे व लोकांच्या गरजेप्रमाणे मार्ग निश्चित करणे ज्यायोगे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकांना त्या सेवेचा लाभ होईल.

महाराष्ट्र शासनाच्या पत्रातील मुद्दा क्र. ३ एमएमआरडीए क्षेत्रातील परिवहन उपक्रमांना एकमेकांच्या क्षेत्रात व्यवसाय करण्यास संपूर्ण मुभा राहील.

मिरा भाईंदर महापालिकेच्या परिवहन सेवेला अजूनपर्यंत मिरा भाईंदर क्षेत्राबाहेर परवानगी मिळालेली नाही. बेस्ट आणि टि.एम.टी. यांच्या परिवहन सेवा मात्र मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये चालू आहेत व त्या दोन्ही सेवा यामार्गावर जास्तीत जास्त फायद्यात आहेत. राज्य शासनाच्या प्रस्तावामुळे मिरा भाईंदर महापालिका परिवहन सेवेला इतर क्षेत्रामध्ये परिवहन सेवा चालू करण्यास परवानगी मिळणार आहे म्हणून एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रातील परिवहन उपक्रमांना एकमेकांच्या क्षेत्रात प्रवासी वाहतूक करण्यास संपूर्ण मुभा देण्यात यावी व वेळोवेळी प्राधिकरणाकडून घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वी मिरा भाईंदर मनपाशी

विचार विनिमय करावा व मान्यता घ्यावी, तसेच कोणतीही भाडेवाढ करण्यापूर्वी महापालिकेशी संबंधित प्रस्तावावर एकमत करावे.



| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) गोहिल शानु जोरावरसिंग | १) तिवारी दिव्या अशोक | १) सिंह मदन उदितनारायण |
| २) पाटील उमाताई शाम | २) वैती नर्मदा यशवंत | २) म्हात्रे कल्पना महेश |
| ३) वेतोस्कर राजेश शंकर | ३) पाटील जयंत महादेव | ३) पाटील शरद केशव |
| ४) सुनिता कैलास पाटील | ४) म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | ४) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर |
| ५) पाटील प्रभात प्रकाश | ५) पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ५) बाविघर सिसिलीया विजय |
| ६) रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | ६) पाटील मिलन गोविंदराव | ६) सिंग श्रीप्रकाश जिलेदार |
| ७) सावळे निर्मला बाबुराव | ७) गोविंद हेलन जॉर्जी | ७) पांडे स्नेहा शैलेश |
| ८) कुरेशी याकुब ईस्माईल | ८) डिमेलो बर्नड आल्बर्ट | ८) दुबे रामनारायण सदानंद |
| ९) भोईर शशिकांत जगन्नाथ | ९) परेरा कॅटलीन ॲन्थोनी | ९) यादव मिरादेवी रामलाल |
| १०) सुनिता शशिकांत भोईर | १०) मेन्डोन्सा स्टीवन जॉन | |
| ११) पाटील प्रफुल्ल काशीनाथ | ११) शर्मा भगवती तुगनचंद | |
| १२) म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १२) चक्रे वंदना रामदास | |
| १३) शेख मुसरर्तबानु इब्राहिम | १३) माळी हेमा रविंद्र | |
| १४) जंगम लक्ष्मण गणपत | १४) हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | |
| १५) सपार उमा विश्वनाथ | | |
| १६) जुबेर अब्दुल्ला इनामदार | | |
| १७) श्रीमती.पुजारी कांचन शेखर | १५) मेहता नरेंद्र लालचंद | |
| १८) श्री.वासुदेव भास्कर मुंज | १६) वर्षा गिरधर भानुशाली | |
| १९) श्रीमती.सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | १७) भोईर राजू यशवंत | |
| | १८) जाधव मोहन महादेव | |
| २०) शफीक अहमद सादत खान | १९) पाटील प्रविण मोरेश्वर | |
| २१) भाटकर प्रेरणा प्रमोद | २०) पाटील अनंत रामचंद्र | |
| २२) मर्लिन मर्विन डिसा | २१) पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| २३) वैती विजया हेमचंद्र | २२) गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| २४) सौ.ठाकूर कल्पना हरिहर | २३) म्हात्रे मोहन गोपाळ | |
| २५) चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | |
| २६) मोदी चद्रकांत भिकालाल | | |
| २७) भट दिप्ती शेखर | | |
| २८) वैती चंद्रकांत सिताराम | | |
| २९) अनिल दिवाकर सावंत | | |
| ३०) शेख सलिम दाउद | | |
| ३१) हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | |
| ३२) शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ३३) पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | | |
| ३४) व्यास सुधा वासुदेव | | |
| ३५) पाटील प्रेमनाथ गजानन | | |
| ३६) मिलन वसंत म्हात्रे | | |
| ३७) नयना गजानन म्हात्रे | | |
| ३८) धनेश परशुराम पाटील | | |

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- याकूब कुरेशी**

**ठराव बहुमताने मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

जावक क्र. ____________ मा. महासभा दि. १८।१।२००८ दिनांक : १८/०१/०८

# ठराव

(३४)

**प्रकरण:- २३ भाईंदर (प.) बालाजी नगर वसाहत रेल्वे पादचारी पूलाचा दक्षिण-पश्चिम खुली जागा रेल्वे विभागास नवीन टिकट खिडकी इमारत बांधण्यास परवानगी देणेबाबत.**

ठराव क्र. २२

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रेल्वे विभागाने नुकत्याच चौपदीकरण मार्ग सुरु केला आहे. त्या अनुषंगाने नवीन प्लेटफार्म बांधणी करुन त्यातले दोन प्लेटफार्म बालाजी वसाहतीला लागून असून त्या ठिकाणी दोन रेल्वे पदचारी पूल आहेत. त्यातून लाखो नागरीक सदर पदचारी पूलातून येणे जाणे करत असतात. सध्या भाईंदर (प.) नागरीकासाठी छत्रपती शिवाजी महाराज मार्ग रेल्वे प्लेटफार्मला लागून एक रेल्वे टिकट घर आहे. भाईंदर (प.) वाढत्या लोकसंख्या तसेच रेल्वे समांतर विनायक नगर ते राणी लक्ष्मीबाई उदयान या रस्त्याहून हजारो लोक रेल्वेने प्रवास करण्यासाठी येत जात असतात. त्यांना टिकट घेण्याकरिता सध्या असलेल्या टिकीट खिडीकीकडे जाण्यासाठी फार लांब जावे लागते.

बालाजी वसाहतला लागून असलेल्या पदचारी पूलाच्या खाली नागरीकांच्या सोयीसाठी रेल्वे टिकीट बुकींगची मागणी आमदार मा. संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली धरणा व हस्ताक्षर अभियन करुन दि.५/११/२००७ रोजी केली होती. सदर आंदोलनानंतर रेल्वे प्रशासनाने आम्हांस दि.१२/११/०७ पत्र पाठवून कळविले की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने जर दक्षिण-पश्चिम बाजूस असलेली खुली जागा दिल्यास आम्ही त्या ठिकाणी नागरीकांच्या सोयीसाठी टिकीट खिडकी उघडण्यास तयार आहोत. या सदर जागेचे मागणीचे पत्र व जागेचे प्लॅनची कॉपी मा.आयुक्त सो. यांनी दि.३/१२/०७ रोजी रेल्वे विभागाने पाठविलेली आहे. सदरची जागा भविष्यकाळात रस्ता रुंदीकरण किंवा गटार कामी बाधीत होणार नाही. तसेच रस्त्याला त्या ठीकाणी वाट नाही. बालाजी नगर पदचारी पूलाच्या लागून असलेली दक्षिण-पश्चिम खुली जागा रेल्वे प्रशासनाला देण्यात यावी. तसेच जागा दिल्यामुळे महापालिकेचा कोणताही आर्थिक नुकसान होणार नाही व नागरीकांची मोठी सोय होणार आहे. तरी रेल्वे विभागानी मागणी केलेली जागा रेल्वे विभागास देण्यात यावी, असा मी ठराव मांडत आहे.

सूचक Omprakash Agarwal
अग्रवाल ओमप्रकाश ग.

अनुमोदन Banghar
बाविस्कर रितिलीया विजय

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

(signature)
१८/१/०८

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

[illegible]

जावक क्र. ____________ मा. महासभा दि. १८/९/२००८ दिनांक : १८/०९/०८

३९

# ठराव

प्रकरण:- २४ **एम.आय.डी.सी. कडून ३५ एम.एल.डी. पाणी पुरवठा कामी राखीव निधी ठेवीतून रु. २ कोटी ५२ लाख अनामत रक्कम मुदतपूर्व काढणेबाबत.**

ठराव क्र. २३

मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या सतत वाढत चालली आहे. त्यामुळे आत्ता मिळणारे पाणी अपुरे पडणार आहे त्यामुळे एम.आय.डी.सी. कडून मिळणारे ~~एम.एल.डी. पाणी कमी पडत आहे~~. त्यासाठी अतिरिक्त एम.आय.डी.सी. कडून अतिरिक्त ३५ एम.एल.डी. पाणीपुरवठा होणार आहे. त्या कामी लागणारी अनामत रक्कम रु.२ कोटी ५२ लाख ही भरावी लागणार आहे. जर राखीव निधी ठेवी मुदतपूर्व काढून रु.२ कोटी ५२ लाख भरली तर महापालिकेचे रु. ५ लाखांचे नुकसान होणार आहे. पण लोकांची अत्यंत निकडीची पाण्याची गरज पाहता महापालिकेला हे कलम ९२ अनुसार ~~नुकसान~~ करायला काहीच हरकत नाही.

तरी एम.आय.डी.सी. कडून ३५ एम.एल.डी. पाणीपुरवठा कामी राखीव निधी ठेवी मुदत पूर्व काढून अनामत रक्कम रु. २ कोटी ५२ लाख भरणेस मी ठराव मांडत आहे.

Sharad. Patil
सूचक शारद केशव पाटील

R. Dubey
अनुमोदन रामनारायण दुबे

18/1/08

(४०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०१/२००८

**प्रकरण क्र. २५ :-** सन्मा. सदस्य श्री. अनंत रामचंद्र पाटील यांचा दि. ११/०१/२००८ चा प्रस्ताव -- मनपा कार्यालयात कोर्ट चालू करणेबाबत.

(मा. महपौरांच्या आदेशाने सदर विषय पुढील सभेत घेण्याचे ठरले.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

४ए

4)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०१/२००८

**दुखवठा ठराव २४ :-**

मा. नगरसेविका सौ. दिव्या अशोक तिवारी यांचे दिर कै. विजय शंकर तिवारी यांचे निधन झाले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा    अनुमोदन :- श्री. जयंत पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(५२) (५००)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००८.

प्रकरण क्र. २६ :- दि. २०/१२/२००७ व दि. ०९/०१/२००८ (दि. २०/१२/२००७ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २५ :-

दि. २०/१२/२००७ व दि. ०९/०१/२००८ (दि. २०/१२/२००७ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- भगवती शर्मा

अनुमोदन :- श्री शफीक अहमद सादत खान

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००८

**प्रकरण क्र. २७ :-** शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करात सवलत देणेस मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. २६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सध्या शाळा, कॉलेज या शैक्षणिक संस्थेच्या इमारती आहेत. त्यापैकी काही शैक्षणिक संस्थेच्या इमारती ग्रामपंचायत, नगरपालिका काळापासून कार्यरत आहेंत. नगरपालिका कालावधीमध्ये शैक्षणिक संस्थेच्या इमारती पुर्णत शैक्षणिक उद्देशासाठी वापरण्यांत येत होत्या. अशा शैक्षणिक संस्थेच्या इमारतीवर ''महाराष्ट्र नगरपालिका एकत्रित मालमत्ता कर अधिनियम १९६९ नियम १० (२)'' तरतुदीनुसार मालमत्ता करामध्ये ५०% सूट देण्यांत येत असे. तात्कालिन नगरपालिका काळामध्ये असलेल्या शैक्षणिक संस्थेच्या मालमत्तांना ''महाराष्ट्र नगरपालिका (एकत्रित मालमत्ता कर) नियम १९६९ मधील नियम १० (२)'' तरतुदीनुसार तात्कालिन नगरपालिकेने ५०% सवलत देण्यांत आली होती. तशीच आजपर्यंत चालू ठेवण्यांत आली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका दि. २८/०२/२००२ पासून अस्तित्वात आली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस करासाठी ''मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९'' लागू करणेत आला आहे. सदरहू अधिनियमात शैक्षणिक संस्थेला सूट/ सवलत देण्याची तरतुद नाही. त्यामुळे महानगरपालिका स्थापना झाल्यानंतर अस्तित्वात आलेल्या शैक्षणिक संस्थेच्या मालमत्तांना बिगर निवासी दराने सर्वसाधारणपणे कर आकारणी करण्यांत आली असून कोणतीही सवलत देण्यांत येत नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या शैक्षणिक संस्था आहेत. त्या शहराची शैक्षणिक सेवा करीत असून अशा शैक्षणिक संस्थेस सक्रीय सहकार्य करणे महानगरपालिकेचे देखील कर्तव्य आहे. नगरपालिका कालावधीत "महाराष्ट्र नगरपालिका (एकत्रित मालमत्ता कर) नियम १९६९ मधील नियम १० (२)" प्रमाणे शैक्षणिक संस्थेच्या मालमत्तेस मालमत्ता करामध्ये ५०% इतकी सवलत देण्यांत येत होती. त्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील शैक्षणिक संस्थेच्या मालमत्तेस (सध्या लागू असलेल्या दराच्या) ५०% इतका मालमत्ता कर आकारण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच शैक्षणिक संस्थाच्या मालमत्तेचा वापर शैक्षणिक कामासाठी होत असल्याने इमारतीच्या कर आकारणीसाठी वार्षिक भाडेमूल्य निवासी दराने काढण्यांत यावे.

(५५)

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शैक्षणिक संस्था या शैक्षणिक सेवा करीत आहेत. खालील बाबीची पुर्तता करणाऱ्या शैक्षणिक संस्था मालमत्ता करात सवलत मिळण्यांस पात्र राहतील.

१) शैक्षणिक संस्थेची इमारत स्वतंत्र असावी.

२) शैक्षणिक संस्थेची नोंदणी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० खाली केलेली असावी.

३) शैक्षणिक संस्थेची नोंदणी मुंबई सार्वजनिक विश्वस्त ॲक्ट १९४९ खाली केलेली असावी.

४) शाळा, महाविद्यालय, उच्च महाविद्यालय इत्यादी कामी आवश्यक ती शिक्षण विषयक परवानगी देण्यांस सक्षम असणाऱ्या प्राधिकरणाची मंजूरी असणे आवश्यक आहे.

५) मालमत्तेचा वापर पूर्णत फक्त शैक्षणिक वापरासाठी असावा.

६) सवलत दिलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थी प्रवेशासाठी महानगरपालिकेचा २० टक्के कोटा असावा.

७) ज्या शैक्षणिक संस्था विद्यार्थ्याकडून मोठया प्रमाणात डोनेशन घेवून फायद्यात चालतात त्यांना अशा प्रकारची सवलत देण्यांत येवू नये.

८) वरीलप्रमाणे सवलत दिलेल्या शाळांनी गरीब / गरजू विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत द्यावी.

वरील ठरावाची अंमलबजावणी सन २००८-२००९ या आर्थिक वर्षापासून करण्यांत यावी.

**सुचकः- श्री. भगवती शर्मा.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००८

**प्रकरण क्र. २८ :-** हॉटेल त्यामध्ये असलेले लॉजींग-बोर्डीग, सार्व. हॉल व मंगल कार्यालय व त्या लगतच्या मोकळ्या जागेचा व्यावसायीक वापर होत असल्याने त्यावर कर आकारणी करणेसाठी वार्षिक भाडे मुल्य दरास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. २७ :-**

महानगरपालिका हद्दीत मालमत्तांना कर आकारणी करणेसाठी (करयोग्य मुल्य ठरविणेसाठी) भाडेमुल्याचे वाजवी दर महासभा ठराव क्र. ४३ दि. २१/०८/२००६ अन्वये मंजूर करण्यांत आलेले आहेत. या मंजूर दरामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात घराच्या वेगवेगळया प्रकारानुसार दर मंजूर केले आहेत. महानगरपालिका हद्दीत लॉजींग-बोर्डीगसह हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालये इत्यादी मालमत्ता आहेत. या मालमत्ता दैनंदिन भाडयाने दिल्या जातात. मात्र यावर कर आकारणी मालकी हक्काच्या (स्वतः वापरातील) दराप्रमाणेच सर्वसाधारण मालमत्ता धारकांना ज्या दराने कराची आकारणी केली जाते त्या दराने कर आकारणी केली जाते. वास्तविकतः लॉजिंग-बोर्डीग, हॉल भाडयाने देऊन मालमत्ता धारक उत्पन्न मिळवितात. असे उत्पन्न कमवून देखील सर्वसाधारण मालमत्ता धारकाप्रमाणेच त्यास कराची आकारणी केली जाते. वास्तविक सदर मालमत्ता भाडे रुपाने उत्पन्न मिळवीत असल्याने अशा मालमत्तांना जादा दराने कर आकारणे आवश्यक आहे.

तसेच सार्व. हॉल, मंगल कार्यालय, हॉटेल, क्लब इत्यादी अन्य लगत असलेल्या मोकळया जागेचा *व्यावसायीक वापर करण्याऱ्या मोकळया जागेवर कर आकारणी केली जात नाही. अशा मालमत्तापासून मालमत्ता* धारक उत्पन्न मिळवित असल्याने त्यावरही कर आकारणी करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे लॉजींग-बोर्डीगसह हॉटेल, सार्व.हॉल, मंगल कार्यालये व व्यावसायिक कामांसाठी वापरत असलेल्या मोकळया जागेवर खालील प्रमाणे मालमत्तेचे वार्षिक भाडेमूल्य ठरविण्यासाठी दर लागू केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

| अ. क्र. | मालमत्तेचा तपशिल | वार्षिक भाडे मुल्यासाठी सध्याचा दर (प्र. चौ. फुट., प्र. महिना) | वार्षिक भाडे मुल्यासाठी प्रस्तावित दर (प्र. चौ. फु., प्र. महिना) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | हॉटेलसह लॉजिंग बोर्डींग, सार्व. हॉल, मंगल कार्यालये. | रु. ३.०० प्र. चौ. फुट (आर. सी. सी.) | रु. ५.०० प्र. चौ. फुट |
| | | रु. २.५० प्र. चौ. फुट (लोड बेरींग, सिमेंट पत्रे व कौलारु) | रु. ४.०० प्र. चौ. फुट |
| २ | हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, मोकळया जागा व अन्य व्यावसायिक वापर करणाऱ्या जागा. | सध्या कर आकारणी करत नाही. | रु. १.०० प्र. चौ. फुट |
| ३ | मोठी-मोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, मॉल्स, शॉपिंग सेंटर, वाणिज्य वापर करीता असेल | ---- | रु. ५.०० प्र. चौ. फुट |

वरील प्रमाणे (कॉलम ४ नूसार) भाडेमूल्याच्या दरास ही सभा मंजूरी देत आहे..

**सुचक :- श्री. भगवती शर्मा. अनुमोदक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.**

सदर ठरावात सुचक :- श्री. शशिकांत भोईर व अनुमोदक :- श्री. मधुसुधन पुरोहित ह्यांनी उपसुचना मांडलेली आहे ती खालील प्रमाणे.

सदर मुळ ठरावात हॉटेल लॉजिंग बोर्डिंग सार्व. हॉल, मंगल कार्यालय लगतच्या मोकळ्या जागेच्या व्यावसायिक वापरावर भाडेमुल्यांचे दर निश्चित करताना या सोबत शहरात उभे राहणारे मॉल व क्लबचा समावेश करावा. मॉलची जागा भाड्याने दिली असल्यास संबंधित मालमत्ता धारकांवर मालमत्ताकर भाडे तत्वावर असलेल्या जागेवर भाडे दर मुल्य दराने लावावा. तसेच आरक्षणात बांधित असलेल्या अनाधिकृत बांधकाम किंवा व्यावसायिक वापर होत असलेल्या जागा मोकळ्या करण्यात याव्या.

**उपसुचनेसह ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

46 (108)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००८

**प्रकरण क्र. २९ :-** मिरा भाईंदर निर्मल अभियान अंतर्गत जुन्या सार्वजनिक शौचालयाची पुर्नबांधणी व नवीन शौचालयाचे बांधकाम करणेबाबत.

**ठराव क्र. २८ :-**

केंद्र शासनाच्या निर्मल भारत अभियानाच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी एम.एम.आर. क्षेत्रामध्ये 'निर्मल एम.एम.आर. अभियान' राबविणेचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. या योजनेचा मुख्य उद्देश एम.एम.आर क्षेत्रातील शहरे हगणदारी मुक्त करणेचा आहे. त्यामुळे शहर उद्देशपूर्तीकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये उक्त योजनेअंतर्गत सार्वजनिक शौचालये, सार्वजनिक मुता-या व लो कॉस्ट सॅनिटेशन कार्यक्रम राबविणेसाठी १०० टक्के अर्थसहाय्य एम.एम.आर.डी.ए. पुरविणार आहे. या योजनेअंतर्गत मिरा-भाईंदर शहरासाठी आवश्यक असणा-या नविन सार्वजनिक शौचालये, नविन सार्वजनिक मुता-या अस्तित्वातील जीर्ण झालेल्या सार्वजनिक शौचालये / मुता-या यांची पुर्नबांधणी व लो कॉस्ट सॅनिटेशन अंतर्गत वैयक्तिक शौचालये याबाबतचा सविस्तर तपशिल सादर करणेकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महानगरपालिकेस कळविले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी उक्त कार्यक्रम हा लोकसहभागातून राबविणेबाबत प्रस्तावित केलेले असून, जागतिक बँकेच्या झोपडपट्टी स्वच्छता योजनेचे स्वरुप व मार्गदर्शन तत्वे तसेच शासनाचे दि. ३० ऑगस्ट २००१ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे विचारात घेणेबाबत सूचित केलेले आहे. त्याचप्रमाणे सदर योजना राबविणेकरीता महानगरपालिका आयुक्त यांना संपूर्ण अधिकार प्राधिकरणाने दिलेले आहेत. त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आवश्यक असलेल्या सार्वजनिक शौचालयाबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

प्राथमिक सर्व्हेक्षण अहवालानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अस्तित्वातील जिर्ण झालेली ए.पी. युनिट पध्दतीची अंदाजे २८०० शौचालये यांची पुर्नबांधणी प्रस्तावित करणेत येत आहे. त्याचप्रमाणे शासनाचे ४० व्यक्ती प्रती सिटस् या निकषानुसार आवश्यक असलेल्या सिटस्ची संख्या विचारात घेतल्यास सुमारे अंदाजे ५०० सिटस्ची नविन शौचालये बांधण्याची आवश्यकता दिसून येते. त्यामूळे इतक्या सिटस् आवश्यक त्या ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. च्या घोषित योजनेअंतर्गत नव्याने बांधण्याबाबत प्रशासनातर्फे प्रस्तावित करणेत येत आहेत. महानगरपालिका आयुक्त यांचे प्रस्तावानुसार सदरहू योजनेअंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधणे कामाच्या संपुर्ण खर्चाकरीता एम.एम.आर.डी.ए. मार्फत अर्थसहाय्य देण्यात येणार असून याकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिकेने जमिन, विजपूरवठा व पाणी पूरवठा द्यावयाचा आहे. (लो कॉस्ट सॅनिटेशन कार्यक्रमातंर्गत काही ठिकाणी वैयक्तिक जागेवर वैयक्तिक शौचालय अनुदान अंतर्गत बांधण्यात येतील.) रेल्वे स्टेशन, बस स्थानक तसेच बाजारपेठ इ. ठिकाणी मोबाईल शौचालये ही ठेवणयांत येणार आहेत.

उपरोक्त पुर्नबांधणी / नव्याने बांधणी प्रस्तावित केलेल्या सार्वजनिक शौचालयांकरीता यु.जी.टॅक, ओव्हरहेड टॅक, प्लंबिंग, विद्युतीकरण, डॅडो, बाहय डॅडोकरीता टाईल्स, केअर टेकर

पार्टस्, मुतारी इ. सुविधा पुरविणे प्रस्तावित आहेत. शौचालय पूर्ण झाल्यानंतर देखभाल, दुरुस्तीसाठी NGO (Non Government Organisation) मार्फत CBO (Community Block Organisation) स्थापन करायची आहे. CBO (Community Block Organisation) मार्फत देखभाल, दुरुस्ती करायची आहे.

एम.एम.आर.डी.ए यांनी प्रस्तावित केलेल्या निर्मल एम.एम.आर अभियान या महत्वकांक्षी योजनेअंतर्गत निर्मल एम.एम.आर अभियान योजना मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राबविणे व सार्वजनिक शौचालये बांधणे / पुर्नबांधणी करणे कामास शिफारस आहे. एम.एम.आर.डी.ए यांच्या तर्फे १०० टक्के अर्थसहाय्याने मिळणार आहे व सदर शौचालयाकरीता जमीन, विद्युतपूरवठा व पाणी पूरवठा मिरा-भाईंदर महानगरपालिकेने करण्यात यावे. निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शौचालय / मुतारीची कामे घेण्यास हि महासभा मान्यता देत आहे. तसेच एम.एम.आर.डी.ए यांचे संयुक्त विद्यमाने योजनेच्या अनुषंगाने पत्र व्यवहार करणे, पी.एम.सी. नेमणे, करारनामा करणे तसेच करारनाम्यातील अटी / शर्तीनुसार काम करणे. त्याचप्रमाणे सदरची योजना एम.एम.आर.डी.ए मार्फत राबविणे व NGO (Non Government Organisation) मार्फत CBO (Community Block Organisation) ची निवड करणे बाबतचे सर्वाधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करण्यास ही महासभा मान्यता देत आहे. व मा. आयुक्त, एम.एम.आर.डी.ए यांनी केलेली करारनामाची सत्यप्रत सर्व सन्माननीय नगरसेवक यांना माहितीसाठी पाठवावा.

सदर ठरावात श्रीम. नुसरत बानो इब्राहीम व श्रीम. सय्यद नुरजहॉ नझर हुसेन यांनी खालील प्रमाणे उपसुचना मांडली.

केंद्र शासनाच्या निर्मल भारत अभियानाच्या धर्तीवर एम.एम.आर.डी.ए. यांनी एम.एम.आर. क्षेत्रामध्ये निर्मल एम.एम.आर. अभियान राबविणेचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या योजनेचा मुख्य उद्देश एम.एम.आर. क्षेत्रातील शहरे हगणदारी मुक्त करणेचा आहे. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये या योजने अंतर्गत सार्व. शौचालये, सार्व. मुतार्‍या व लो कॉस्ट सॅनिटेशन अंतर्गत या बाबतचा सविस्तर तपशिल सादर करणेकामी एम.एम.आर.डी.ए. ने महापालिकेस कळविले आहे.

प्राथमिक सर्वेक्षण अहवाला नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अस्तित्वातील जिर्ण झालेली ए.पी. युनिट पध्दतीचे २,८०० शौचालयांची पुर्नबांधणी प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. तसेच शासनाचे ४० व्यक्ति प्रती सिट या निकषानुसार आवश्यक असलेल्या सिटची संख्या सुमारे ५०० नविन शौचालये बांधण्याची आहे. सदर योजने अंतर्गत सार्व. शौचालय बांधणे कामाचा संपूर्ण खर्च एम.एम.आर.डी.ए. मार्फत होणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने जमिन, वीज पुरवठा व पाणी पुरवठा द्यावयाचा आहे. सदरची शौचालये पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्तीसाठी एन.जी.ओ. मार्फत चालवायची आहेत. महानगरपालिकेच्या माध्यमातून अस्तित्वात असलेली सर्व शौचालये व आवश्यक नविन ठिकाणी सार्वजनिक हितास व रहदारीस बाधा येणार नाही. अशा जागांवरती ही योजना राबवावी.

तसेच सन्मा. सदस्य श्री. राजेश शंकर वेतोस्कर व श्री. अनिल सावंत यांनी खालील उपसुचना मांडली

१.) सदर शौचालये ज्या ठिकाणी झोपडपट्टी आहे, दलित वस्ती आहे तसेच चाळी आहे त्या ठिकाणीच करावी.

२.) रेल्वे स्टेशन समोर नसावीत.

**सुचक :- सौ. कल्पना महेश म्हात्रे अनुमोदन :- श्रीम. शेख नुसरत बानो ईब्राहीम**

**उपसुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

49 (१९२०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००८

**प्रकरण क्र. ३० :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲण्ड पार्क (वाहन तळ) बाबत.

**(सदर विषय मा. महापौर सो. यांच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

५० (४९)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००८

(उप प्रस्ताव)

**प्रकरण क्र. ३१ :-** सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंग यांचे दिनांक १३/०२/२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- भाईंदर (पूर्व) जेसलपार्क भुयारी मार्गासाठी सबवे सन २००८-०९ अर्थसंकल्पामध्ये तरतुद करणेबाबात.

**(मा. महापौर सो, यांच्या आदेशाने सदर प्रस्तावाची सुचना घेण्यात आली.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

५१

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००८

(उप्रस्ताव)

**प्रकरण क्र. ३२:-** सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंग यांचे दिनांक १३/०२/२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- मिरा भाईंदर महानगरपालिका फंडातून व आमदार निधीतून बांधण्यात आलेले हॉस्पीटल सुरु करणेबाबत.

**(मा. महापौर सो, यांच्या आदेशाने सदर प्रस्तावाची सुचना घेण्यात आली.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

52

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००८

(उ प्रस्ताव)

**प्रकरण क्र. ३३:-** सन्मा. सदस्य श्री. रामनारायण एस. दुबे यांचे दिनांक १३/०२/२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कमी व्याजदाराने असलेल्या ठेवी तोडून नविन व्याजदराने गुंतवणूक करणेबाबत.

**(मा. महापौर सो, यांच्या आदेशाने सदर प्रस्तावाची सुचना घेण्यात आली.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

५३ ६०

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००८

(ज प्रस्ताव)

**प्रकरण क्र. ३४:-** सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांचे दिनांक १४/०२/२००८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- रिलायन्स कम्युनिकेशन अॅन्ड इन्फो. सर्विसेस लि. ह्यांनी महापालिका क्षेत्रात टाकलेल्या फायबर केबलबाबत.

**(मा. महापौर सो, यांच्या आदेशाने सदर प्रस्ताव फेटाळण्यात आला.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(54) (802)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २०/०२/२००८

**दुःखवटा ठराव २९:-**

थोर समाजसेवक कर्मयोगी आधुनिक संत बाबा आमटे, सन्मा. नगरसेविका ग्रिटा फॅरो के पति श्री. स्टिफन फॅरो, सदस्या सौ. सुनिता कैलास पाटील यांच्या मातोश्री कै. सुमन रघुनाथ पाटील, मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी कै. अनिल भगत, श्री. सदानंद भुरकुंडे यांच्या मातोश्री कै. कमळाबाई को. भुरकुंडे, नगरसेवक श्री. शशिकांत भोईर यांच्या आजी श्रीम. कै. काशिबाई काशिनाथ भोईर, नगरसेवक श्री. मधुसुदन पुराहित यांचे काका कै. श्याम लालजी पुरोहित, गोडदेव येथील रहिवाशी सागर रोहिदास भोईर, यांचे दुःखद निधन झालेल आहे. त्याचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचकः- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. लक्ष्मण जंगम.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(६३)

(५५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०३/२००८.

प्रकरण क्र. ३५ :- दि. १८/०१/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ३० :-

दि. १८/०१/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- जयंत मात्रे पाटिल अनुमोदन :- भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(६४)

(५९)

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १८/०३/२००८**

**प्रकरण क्र. ३६ :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण क्र. २ नियम ५(२)(ब) अन्वये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र २१ एप्रिल २००७ (सुधारीत नियम) नुसार ५ (पाच) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करणे.**

**ठराव क्र. ३५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण क्र. २ नियम ५(२)(ब) अन्वये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र २१ एप्रिल २००७ (सुधारीत नियम) नुसार ५ (पाच) नामनिर्देशित सदस्यांच्या नेमणूकीकरिता सोमवार दि. २५/०२/२००८ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारण्या बाबतचा कार्यक्रम जाहिर करण्यांत आला होता. सदरहू कार्यक्रमानुसार शनिवार दि. ०१/०३/२००८ रोजी सकाळी १२.०० ते दुपारी १.०० वा. या वेळेत पालिका सदस्यांची तौलानिक संख्याबळानुसार मा. आयुक्त यांजकडे एकूण ५ नामनिर्देशन पत्रे दाखल झालेली आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | नांव | फ्रंट/आघाडी/गटाचे नांव |
|---|---|---|
| १ | श्री. पटेल आसिफ गुलाम | राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष |
| २ | श्री. परशुराम दामोदर पाटील | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३ | श्री. अरुण बाबाजी कदम | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४ | श्री. पांगे संजय नारायण | भारतीय जनता पक्ष |
| ५ | श्री. प्रकाश शंकर दुबोले | राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष |

नामनिर्देशित सदस्य नेमणूकीकरीता प्राप्त झालेली नामनिर्देशन पत्र व गटांचे तौलानिक संख्याबळ विचारात घेउन महापालिकेला वरील व्यक्तीच्या नावाची नामनिर्देशित सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केल्यानुसार मा. महासभा वरील व्यक्तीच्या नावाची नामनिर्देशित सदस्य म्हणून पुढील सार्वत्रिक निवडणूकीपर्यंत नेमणूकीस मान्यता देत आहे.

**सुचक :-** जयंत महादेव पाटिल      **अनुमोदन :-** श्री. एस. ए. खान

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**

**मिरा भाईदर महानगरपालिका**

(६५)

(51)

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १८/०३/२००८**

प्रकरण क्र. ३६ :-

**मा. महासभेतील ५(पाच) नामनिर्देशित सदस्यांच्या नेमणूकीची घोषणा**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण क्र. २ नियम ५(२)(ब) अन्वये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र २१ एप्रिल २००७ (सुधारीत नियम) नुसार ५ (पाच) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्याकरिता मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी नियम ५(२) अन्वये शनिवार दि. ०१/०३/२००८ रोजी पालिका सदस्यांच्या तौलानिक संख्याबळानुसार एकूण ५ (पाच) नामनिर्देशन पत्रे स्विकारलेली आहेत. वरील प्राप्त झालेल्या नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्यासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिकेकडे शिफारस करण्यात आलेली आहे.

अधिसुचनेतील नियम २ नुसार ही महानगरपालिका मा. आयुक्त यांनी शिफारस केलेल्या खालील ५ (पाच) सदस्यांची नेमणूक करीत आहे.

| अ.क्र. | नांव | फ्रंट/आघाडी/गटाचे नांव |
|---|---|---|
| १ | श्री. पटेल आसिफ गुलाम | राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष |
| २ | श्री. परशुराम दामोदर पाटील | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३ | श्री. अरुण बाबाजी कदम | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४ | श्री. पांगे संजय नारायण | भारतीय जनता पक्ष |
| ५ | श्री. प्रकाश शंकर दुबोले | राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष |

**पिठासीन अधिकारी / महापौर**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. ३७:- मा. महासभा दि. १८/३/२००८

प्रकरण ३७ → ठराव क्र. ३२

**ठराव** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करण्याची तरतुद आहे. महिला व बालकल्याण समिती ही वैधानीक समिती असून ती तातडीने गठीत करणे आवश्यक आहे. महासभेने हयापूर्वी ठराव क्र. ५ दि. १७/१०/२००७ नुसार पारीत केलेल्या ठरावावर नगरविकास विभागाने दि. १४/११/२००७ रोजीच्या पत्राने महापालिकेच्या कामकाज नियम ( प्रस्थावित ) मध्ये सुधारणे आवश्यक असल्यास विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून प्रस्ताव शासन मान्यता होईपर्यंत महिला व बालकल्याण समितीची संख्या ९ गृहीत धरून समितीची रचना करणे योग्य आहे. त्यानुसार ही महासभा गोषवाऱ्यातील राजकीय पक्षांच्या तौलानिक संख्याबळानुसार संयुक्त लोकशाही आघाडीचे ४, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ३, भारतीच जनता पक्षाचे १, शिवसेना १ असे एकूण ९ सदस्यांची समिती गठीत करण्यात येत आहे. सदस्यांची नावे पुढील प्रमाणे,

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६. | |
| ७. | |
| ८. | |
| ९. | |

वरील सदस्यांची महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात येत असल्याचा ठराव मांडत आहे.

सुचक - सौ. ज्योत्स्ना हसनाळे

अनुमोदक - सौ. वंदना चक्रे

ठराव ~~सर्वानुमते~~ बहुमताने मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

59

६१७

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०३/२००८

**दुःखवटा ठराव ३३ :-**

ठाणे लोकसभा मतदार संघातील दिवंगत खासदार प्रकाशजी परांजपे ह्यांचे नुकतेच निधन झालेले आहे. त्यांचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचकः- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. जयंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(60) (६९)

मा.महासभा दि११/०३/२००८.

**प्रकरण क्र.३८जकात दरामध्ये वाढ करणेस मंजुरी मिळणे बाबत.**

ठराव क्र.३४

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन् २००४-०५ साली काही दरामध्ये वाढ केलेली होती.सद्या आपल्या आजूबाजूच्या महापालिकेमध्ये उदा.ठाणे,कल्याण , उल्हासनगर , मुंबई या महानगरपालिकेचे जकातीचे दर हे आपल्या महानगरपालिकेच्या जकात दरसुची पेक्षा बाहुतांश ॲटमवर जास्त आहेत. जकात दर सुचीतील काही ॲटमवरील जकातीचा भार कंपन्या सोसत आहेत. कंपन्या जकातीचा भार सोसत असल्याने त्याचा ग्राहकांवर बोजा पडत नाही. महापालिकेचे उत्पन्नाचे मार्ग मर्यादित आहे. मर्यादित उत्पन्नामध्ये सर्व शहरांची अत्यावश्यक सेवा व विकास कामे करणे आर्थिक दृष्टया अडचणीचे होत आहेत. नागरिकांना अत्यावश्यक सुविधा देणे हे महापालिकेचे आद्य कर्तव्य असल्याने महापालिकेचे उत्पन्न वाढविणे तितकेच जरुरीचे आहे. इतर करापेक्षा जकात कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. यापूर्वी असलेले जुने जकात दर व सद्या महापालिकेच्या आजूबाजूच्या महापालिका यांनी वाढविलेले जकात दर विचारात घेता सद्याचे महा नगरपालिकेचे दर हे फारच कमी आहेत.

शासनाचे जकात बंद करण्याचे धोरण लक्षात घेता,भविष्यात शासनाकडील मिळणारे अनुदान वाढीव जकात उत्पन्ना नुसार मागणी करता येईल,म्हणुन सद्याच्या जकातदर सूचीतील खालील नमूद केलेल्या ॲटमवर जकात दर वाढविल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. खालील प्रमाणे जकात दर वाढविण्यात प्रस्तावित करीत आहोत.

| ॲटम क्र. | मालाचा तपशिल | सद्या चालु असलेले दर | कमाल दर | किमान दर | नव्याने प्रस्तावित केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | <u>वर्ग ३:इंधनासाठी , प्रकाशासाठी, धुण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तु.</u><br>अ) सर्व प्रकाराची खनिज तेल, डिझेल तेल, पेट्रोल, विमानचालन स्पिरीट, सर्व प्रकाराची , व्हाईट ऑईल, तुर्क तेल (spindle oil) फरनेस आईल, पेट्रोलीयम पदार्थ , माव्याचे तेल शेवसाल ऑईल , सॉल्व्हन्ट ऑईल किटक नाशके म्हणुन उपयोगात आणलेली इतर ज्वलन तेले, नैसर्गिक गॅसलीन , रंग (नोंद ४८खाली येत असतील त्या व्यतिरिक्त) सोल्युशन व कॉम्पोझिशन ,टर्की रेड ऑईल , व खनिज तेलाचे उपपदार्थ , परंतु यापुर्वी अंतर्भुत केलेल्या वस्तुंमध्ये या पोट नोंदीखाली घासलेटचा अंतभात होणार नाही. | १.२५ | ४.०० | ०.५० | ३.०० |
| ४८ | <u>वर्ग ४ : इमारातीची व इतर बांधकामची सामुग्री</u><br>पेन्टस् , डिस्टेंपर व कलर वॉशेस आणि इमारतीस रंग देण्यासयाठी वापरावयाचे साहित्य , वॉर्निश आळशीचे उकळविलेले तेल , टर्पेटाईन , झिंक ऑक्साईड व रेड ऑक्साईड, | २.५० | ४.०० | ०.५० | ३.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४९. | काच, काचेच्या वस्तू ,चिनीमातीच्या वस्तू , एनॅमलच्या वस्तु इमारतीच्या व सॅनिटी फिटिंग्जच्या बांधणीसाठी किंवा सुशोभित करण्यासाठी वापरण्यात येण्यारी सर्व प्रकार क्रोकरी , धातूचे व्हॉल्व , तांब्याच्या तोटया व त्यांची उपकरणे . | २-५० | ४.०० | ०.५० | ३.०० |
| ५१ | इमारती लाकूड , वल्ल्या ,बांबू , बेत व त्यापासून तयार केलेल्या वस्तु, दरवाजे ,खिडक्या , चौकटी , खुटया, जिने, चंदनाचे लाकुड व अशा लाकडापासून तयार केलेल्या वस्तु . | ३.०० | ४.०० | ०.५० | ४.०० |
| ५२ | प्लायवूड, सॉफ्टबोर्डस् , हाडबोर्डस् , मसोनाईट किंवा कोणतेही घटक असलेले व कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासून तयार केलेल्या वस्तू. | ३-०० | ४.०० | ०.५० | ४.०० |
| ५३ | <u>वर्ग ५ : सुगंधी द्रव्ये, प्रसाधने,रंग व घरगुती सामान</u><br>ड) लाकडी, लोखंडी, पोलादी, वेताचे इत्यादीसारखे सर्व प्रकारचे फर्निचर | ३-०० | ४.०० | ०.५० | ४-०० |
| ७० | रबर , रबरी माल , गटापर्चा व त्यापासून (पूर्णत:व अंशत :) बनविलेल्या वस्तू , रबर सोलूशन्स ,कच्चे रबर व लॅटॅक्स पण त्यापासून बनविलेली खेळणी सोडून . | २-०० | ४.०० | ०.५० | ३-०० |
| ७१ | <u>वर्ग ८ : धातु व धातूच्या वस्तू</u><br>लोखंड पोलद<br>(अ) पिग आयर्न (ब) ब्ल्यूम्स बिलेट्स व स्लॅब्स<br>(क) रचना विषक(स्ट्रक्चरल)<br>३. अँगल्स -इक्वल किंवा अनइक्वल ४.बल्ब किंवा टो ५. लाईट रेल्स ६. लाईट रेल्ससाठी फीश प्लेट ७ . शेल , पोलाद इनगॉटस् , ब्ल्यूम, विलेटस् व बार्स ८. ब्लॅक किंवा गॅलव्हनाईज्ड शीटस् प्लेन किंवा कॉरोगेटेड ९. प्लेटस वॉयलर व हाय टेन्साईल शीप बिल्डींग किंवा बुलेट प्रुफ पोलाद धरुन साधारण सौम्य पोलाद १०. गज व सळया ११. बोल्टस् , नटस्, बॉशर्स ब्लॅक गॅलव्हाईजडच्या इतर प्रकारच्या तारा १३. तारेचे खिळे १४. स्प्रींगचे पोलाद, हेक्युलर किंवा फ्लॅटबार्स १५. हुप्स व पट्टया १६. नळ. | २-०० | ४.०० | ०.५० | ३-०० |
| ७३ | लोखंड व पोलाद -विशिष्टरित्या तरतुद करण्यात आलेली नसेल अशी (कटलरी) लोखंडी सामान व यंत्रे किंवा यंत्राचे भाग खेरीज करुन लोखंडी वा पोलाद यापासून बनविलेल्या इतर कोणत्याही वस्तु | २-०० | ४.०० | ०.५० | ३-०० |
| ७४ | यंत्रसामग्री व वितरण यांसाठीची वीज यंत्रयामग्री व मोटर्स व जनरेटर्स , व त्यांचे पूरक व सुटे भाग -अ) १. वीज निर्मिती ; प्रक्षेपण व वितरण यांसाठीची वीज यंत्रयामग्री व मोटर्स व जनरेटर्स व त्यांचे पूरक व सुटे भाग २. सेल्स बॅटरी व पितळी पट्ट्या, हॉर्न इलेक्ट्रीक धरुन वीज माल.३ . वीज जोडणारी सामाग्री व वस्तु ४. वीजेची घरगुती उपकरणे ५. सर्व प्रकाराची वीज यंत्रसामग्रीस, कंट्रोल स्वीच गिअर , जनरेटर्स , अल्टरनेटर्स व डायनॅमो मोटार्स ट्रान्सफॉर्मर्स व टर्बो जनरेटिंग संटस . | ३-०० | ४.०० | ०.५० | ४-०० |
| ८१ | <u>वर्ग ९ : संकीर्ण</u><br>लाकुड , दगड, चिकणमाती किंवा धातु यांवर कोरीद काम केलेल्या वस्तू वा इतर व मातीची भांडी. | २-०० | ४.०० | ०.५० | ३-०० |

६९ ७०

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दरसुची मध्ये नव्याने प्रस्तावित केलेल्या दरा प्रमाणे वाढ केल्यास महानगरपालिकेच्या जकात उत्पन्नामध्ये रुपये - ११.२८ कोटी वाढ होणार आहे ,चालु आर्थिक वर्षातील जकात कराचे उत्पन्न रुपये - ७३.३१ कोटी होणार आहे . त्यामध्ये शासनाच्या नियमा प्रमाणे १० टक्के वाढ रुपये - ७.३३ कोटी होईल हया सर्व बाबी विचारात घेता सन् २००८-०९ करीता जकातीपासुन एकुण रुपये ९२ कोटी उत्पन्न अपेक्षीत आहे .सदरहु जकात वाढीव दर दि.२३/०६/२००८ पासुन लागु करण्यात येतील .सदर प्रस्तावास मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :-** जयंत मतोबा पाटिल

**अनुमोदक :-** श्री. तुकशीदास म्हात्रे

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

63 (०३)

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१९/०३/२००८.

प्रकरण क्र.३९ :- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील जाहिराती बाबत व सुधारीत जाहिरात फी दरपत्रकाबाबत.

ठराव क्र. ३५ :-

मिरा भाईदर क्षेत्रातील जाहिरातीचे (विविध भागात होर्डिंग्ज व अन्य प्रकारच्या जाहिराती) नविन स्तोत्र उपलब्ध करण्याकरीता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने मा.स्थायी समिती दि.२९/२/२००८ ठराव क्र.४३ ने शिफारस केलेल्या प्रस्तावास ही मा.महासभा मंजुरी देत आहे.

सूचक :- ॲड. एस. ए. खान

अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजुर

मा.महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा.स्थायी समिती दि.२९/२/२००६.

(६४)

प्रकरण क्र. — :- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील जाहिराती बाबत व सुधारीत जाहिरात फी दरपत्रकाबाबत.

ठराव क्र. ४२ :-

मिरा भाईदर क्षेत्रातील जाहिरातीचे (विविध भागात होर्डिंग्ज व अन्य प्रकारच्या जाहिराती) सर्वेक्षण करुन जाहिरातीचे नविन स्तोत्र उपलब्ध करण्याकरीता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने जाहिरात विभागामार्फत सर्वेक्षणाचे काम करण्यात आले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ आणि ३९२ अन्वये आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम - २००३ अन्वये जाहिराती व आकाश चिन्ह इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतूद आहे.

महापालिका हद्दीमधील व्यापारी आस्थापना, अन्य संस्था इत्यादींनी प्रकाशित केलेल्या जाहिराती, दुकानाचे फलक, आकाशचिन्ह (होर्डिंग्ज) तसेच महापालिका हद्दीतील विविध भागांमध्ये अन्य प्रकारच्या जाहिरातीं या पासून शहराच्या सौदर्यात भर घालणे व महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरीता खालील सुधारीत दरपत्रक निश्चित करण्यात येत आहे.

## जाहिरात फी चे सुधारीत दरपत्रक

| अ.क्र | जाहिरातीचे प्रकार | मोजमाप | जाहिरातींचे दर | |
|---|---|---|---|---|
| | | | मासिक रुपये (प्रति चौ.फुटास) | वार्षिक रुपये |
| १ | इमारतीच्या भितींवरील जाहिरात (लिखाण) | १० चौ.फुटापर्यत<br>१० चौ.फुटावरील | रु.४/-<br>रु.३/- | रु.४८/-<br>रु.३६/- |
| २ | कापडी फलक (बॅनर्स)/कटाउट | १० चौ.फुटापर्यत | रु.५/- | रु.६०/- |
| | | १० चौ.फुटावरील | रु.३/- | रु.३६/- |
| ३ | कागदी पोस्टर्स | | | |
| | अ) सिनेमा व व्यापारी | १० चौ.फुटापर्यत (एका नगास) | रु.५/- | रु.६०/- |
| | | १० चौ.फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.१०/- | रु.१२०/- |
| | ब) इतर | १० चौ.फुटापर्यत (एका नगास) | रु.२/- | रु.२४/- |
| | | १० चौ.फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.४/- | रु.४८/- |
| ४ | दिव्याचे खांबावरील फलक (किऑस्क) प्रदर्शित दर्शनी आकार | १) १.५X२.५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.२०/- | रु.२४०/- |
| | | २) २.५ X ३.५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.२०/- | रु.२४०/- |
| | | ३) ३.५X ५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.५०/- | रु.६००/- |

(65) (603)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | दुकानांवरील नावाचे फलक | | निरंक | निरंक |
| | | | निरंक | निरंक |
| ६ | दुकानांवरील जाहिरातींचे फलक | १० चौ.फुटापर्यंत | रु.३/- | रु.३६/- |
| | | ११ चौ.फुट ते २० चौ.फुट | रु.४/- | रु.४८/- |
| | | २० चौ.फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| ७ | भिंतीवरील जाहिरात (लिखाण व चित्र) | १० चौ.फुटापर्यंत | रु.५/- | रु.६०/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटापर्यंत | रु.५/- | रु.६०/- |
| | | ३१ चौ.फुटावरील | रु.२/- | रु.२४/- |
| ८ | वाहनांवरील जाहिरात | १० चौ.फुटापर्यंत | रु.१०/- | रु.१२०/- |
| | | ११ ते ३० चॉ.फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| | | ३१ चौ.फुटावरील | रु.२/- | रु.२४/- |
| ९ | होर्डिंग्ज (आकाशचिन्ह)/कमानी (मोठे जाहिरात फलक) | २०० चौ.फुटापर्यंत | रु.४/- | रु.४८/- |
| | | २०० ते ३०० चौ.फुट | रु.३/- | रु.३६/- |
| | | ३०० चौ.फुटावरील | रु.२.५/- | रु.३०/- |
| १० | बस थांब्यावरील जाहिराती | १ चौ.फुटास | रु.४/- | रु.४८/- |
| ११ | रोड शोज | रस्त्यावर १० ठिकाणापर्यंत (प्रति नगास रु.१००) | रु.१००० प्रतिदिन/ प्रती रस्ता | |
| | | आकाशातील प्रदर्शन (एका ठिकाणास) | रु.५००/- प्रती शो | |
| | | एरियल बॅनर्स | रु.५०००/- प्रतीदिन/बॅनर | |
| | | रस्त्यावर हॅंडबिल टाकणे/वाटणे | रु.१२५/-प्रति हजारी नग | |
| | | रस्त्यावरील लिखाण | रु.२/-प्रति चौ.फुट प्रति महिना | |
| १२ | चलत जाहिरात **(Moving advertisement) (having multiple display)** | क्र.६ प्रमाणे (प्रत्येक जाहिरातीस) | जाहिरात फी व जाहिरात फी च्या ३० टक्के रक्कम | |

(66) (608)

टीप :-

१) सदर जाहिरातीचे दर क दर्जाच्या रस्त्यासाठी आहेत. ब व अ दर्जाच्या रस्त्यासाठी या दरावर अनुक्रमे ५०% व १००% अतिरिक्त फी आकारण्यात येईल.

२) वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फीच्या २०% जादा फी आकारण्यात येईल.

३) फक्त खाजगी जागेतील होर्डिंग्ज यांना जाहिरात फीच्या ३०% कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.

मिरा भाईंदर क्षेत्रातील सन २००३-०४ मध्ये पाच वर्षाकरीता दिलेला होर्डिंग्ज ठेक्याची मुदत माहे एप्रिल महिन्यापासून टप्याटप्याने संपत आहे. महापालिकेचे होर्डिंग्ज बाबत सर्वेक्षण करून एकूण जुन्या आणि नविन अशा २१६ ठिकाणी होर्डिंग्ज उभारण्याकरीता व वरील सुधारीत दरपत्रकाला तसेच मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे निविदा मागवून निविदा काढण्यास, तसेच नव्याने होर्डिंग्जची जागा/जाहिरातीचे नविन स्तोत्र उपलब्ध झाल्यास इत्यादी बद्दल निर्णय घेण्यास मा.आयुक्तांस ही सभा प्राधिकृत करते.

उपरोक्त प्रस्तावास ही सभा मंजुरी देउन मा.महासभेस शिफारस करते.

सुचक :- शेख एस. ए. खान

अनुमोदक :- श्री. मिलन व. म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
मा.स्थायी समिती

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/३/२००८

**प्रकरण क्र. ४०** मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००७-०८ चे सुधारित व सन २००८-०९ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ३६

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००७/२००८ चे सुधारित व सन २००८/२००९ च्या मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरण पत्र, अहवाल, मा. स्थायी समिती ठराव क्र.४४ दि. २९/२/०८ विचारात घेउन सविस्तर चर्चा करुन मा. सदस्याचे सूचनेनुसार शासनाकडून मिळालेले रस्ता अनुदान, मे. रियालयन्स, महानगर गॅस, एमटीएनएल, रिलायन्स एनर्जी यांचेकडून रस्ता नुकसान भरपाई पोटी मिळालेली रु. ५ कोटी रक्कम रस्ते दुरुस्ती देखभाल यासाठी वाढीव खर्च या सूचनेसह व आवश्यक त्या दुरुस्तीसह सन २००७-०८ चे सुधारित व सन २००८-०९ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. सुधारित व मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे .

## सन २००७-०८ चे सुधारित अंदाज व सन २००८-०९ चे मुळ अंदाजपत्रक (आकडे लाखात)

| तपशिल | 2007/08 (सुधारित अंदाज) | 2008/09 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+वृक्षप्राधिकण एकूण जमा | **34904.95** | **40346.49** |
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+वृक्षप्राधिकण एकूण खर्च | **34227.68** | **40340.59** |
| अखेरची शिल्लक | **677.27** | **5.90** |

सूचक -
(श्री. प्रफुल्ल का. पाटील)

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक -
(श्री. भगवती शर्मा)

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/३/२००८

प्रकरण क्र ४९ मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००७/२००८ चे सुधारीत व सन २००८/२००९ चे मुळ अंदाजपत्रकासमान्यता देणेबाबत.

महासभा ठराव क्र. ३७ दि. १९/३/२००८

## ठराव क्र. ३७

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००७/२००८ सुधारित व सन २००८/२००९ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ४५ दि. २९/२/२००८ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००७/०८ चे सुधारीत व सन २००८/०९ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

२००८/२००९

| उत्पन्न | |
|---|---|
| "ब" अंदाजपत्रक | 1426.50 |
| "अ" अंदाजपत्रक हस्तांतरण | 75.00 |
| एकूण | 1501.50 |

| खर्च | |
|---|---|
| "ब" अंदाजपत्रक | 1500.50 |
| अखेरची शिल्लक | 1.00 |
| एकूण | 1501.50 |

सुचक:- [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक:- [signature]

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/३/२००८

प्रकरण क्र ४२ = मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००७/२००८ चे सुधारीत व सन २००८/२००९ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**महासभा ठराव क्र.३८ दि. १९/३/२००८**

## ठराव क्र.३८

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००७/२००८ सुधारित व सन २००८/२००९ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ४६ दि. २९/२/२००८ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००७/०८ चे सुधारीत व सन २००८/०९ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**२००८/२००९**

| उत्पन्न | |
|---|---|
| वृक्षप्राधिकरण | 194.50 |
| "अ" अंदाजपत्रक हस्तांतरण | 106.00 |
| एकूण | 300.50 |

| खर्च | |
|---|---|
| वृक्षप्राधिकरण | 299.50 |
| अखेरची शिल्लक | 1.00 |
| एकूण | 300.50 |

सुचक :- [signature]

**ठराव सर्वानुमते मंजूर**

अनुमोदक :- Sharu Gohil

**महापौर**
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. १९/०३/२००८

ठराव क्रमांक (३८ अ)

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने १) भाईंदर (प.) टेंभा येथे हॉस्पिटल इमारत बांधणे २) भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) यांना जोडणारा जेसलपार्क येथील सब वे बांधणे व मिरारोड व भाईंदर स्टेशन दरम्यान रेल्वे खाली कल्वर्ट बांधणे या कामाकरीता महानगरपालिकेच्या निधितून सन २००८-०९ या वर्षात पुरेशी तरतूद केल्याने सदर दोन्ही कामे JNNURM अंतर्गत तयार केलेल्या शहर विकास आराखडयातून (CDP) तून वगळण्यात यावे तसेच दोन्ही कामांच्या तातडीने निविदा मागविण्यात याव्यात.

सुचक :- श्री. मिलन म्हात्रे

अनुमोदन :- श्री. मदन सिंग

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी